



सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २८ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१५ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अमित ठाकरेंवरुन शिवसेनेत गदारोळ; एकनाथ शिंदेंकडून सदा सरवणकरांना २४ तासांचा अल्टिमेटम

मुंबई : माहीम मतदारसंघावरुन महायुतीत गदारोळ सुरु असल्याचं चित्र आहे. मनसेकडून अमित ठाकरे यांना माहीममधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांना पाठिंबा दिला जावा अशी महायुतीची भूमिका आहे. मात्र सदा सरवणकर माघार घेण्यास इच्छुक नाहीत. सदा सरवणकर यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांमध्ये शिष्टाईचे प्रयत्न सुरू असल्याचं समजत आहे. यादरम्यान एक मोठी घडामोड समोर आली असून, एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना २४ तासांचा अल्टिमेटम दिला आहे.

सदा सरवणकर यांना आपली यांना भूमिका ठरवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २४ तासांची मुदत दिली आहे. नुकतीच सदा सरवणकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. महायुती माहीम विधानसभा मतदारसंघात मनसेचे उमेदवार अमित राज ठाकरेंना पाठिंबा देण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचं एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना सांगितलं आहे. राज ठाकरे यांनी लोकसभेला मदत केली होती. यापुढेही त्यांची मदत होईल असं एकनाथ शिंदे यांनी सदा सरवणकर यांना सांगितलं असल्याचं समजत आहे.

### आशिष शेलारांनी मांडली होती भूमिका

अमित ठाकरेंना पाठिंबा देण्यासाठी आशिष शेलार प्रस्ताव पाठवणार असल्याचं समजत आहे. सदा सरवणकरांच्या उमेदवारीला विरोध नाही असंही आशिष शेलार यांनी स्पष्ट केलं आहे. तसंच अमित ठाकरेंना पाठिंबा दिला तर जमणार नाही का? असा उलट सवालही आशिष शेलार यांनी विचारला आहे. दरम्यान अमित ठाकरे २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज भरणार आहेत. सध्याच्या स्थितीनुसार, माहीम मतदारसंघात तिहेरी लढत होणार आहे. शिवसेनेकडून सदा सरवणकर, उद्धव ठाकरेंच्या पक्षाककडून महेश सावंत रिंगणात आहेत.

मी स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार या तिघांनाही विनंती आणि चर्चा करणार आहे. महायुतीत कोणताही मतभेद, दरार नाही. सदा सरवणकर यांच्या उमेदवारीलाही आमचा विरोध नाही. पण असं का होऊ शकत नाही की, महायुती म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन आपल्याच घरातील, राज ठाकरेंचा मुलगा अमित ठाकरे पहिल्यांदा निवडणूक लढवत असेल, तर महायुती आपण सर्वांनी त्याला समर्थन देऊ. आपण सगळेजण त्यांना निवडून देऊ, असं आशिष शेलार म्हणाले आहेत.

राज ठाकरेंनी सर्वांशी संबंध जपले. उद्धव ठाकरेंना वाटत नसलं तरी आम्हाला वाटतं. अमितला समर्थन द्यावं अशी माझी भूमिका आहे. मी तिघांशी बोलेन, मतभेद असेल तर दूर केले जातील, महाराष्ट्राची संस्कृती जपली जावी, असंही आशिष शेलार म्हणाले आहेत.

## रेल्वेमंत्री बुलेट ट्रेनच्या मस्तीतः संजय राऊत

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२७ ऑक्टोबर: मुंबईतील रेल्वेच्या समस्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत मात्र रेल्वेमंत्री महाशय हे बुलेट ट्रेनच्या मस्तीत आहेत. त्यांचे पाय जमिनीवर नाहीत. ते बुलेट ट्रेनच्या मस्तीत देशभर फिरत आहेत, अशी टीका उद्धव ठाकरे गटाचे नेते खा संजय राऊत व विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी रविवारी केली .

वांद्रे रेल्वे स्थानकावर पहाटे झालेल्या चेंगराचेंगरी च्या दुर्घटनेत प्रवासी जखमी झाले त्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारवर कडाडून टीका करताना राऊत म्हणाले की, मोदीं यांचे तिसरे सरकार आल्यापासून देशात गेल्या पाच महिन्यांत २८ मोठे रेल्वे अपघात झाले आहेत. उपनगरीय रेल्वेच्या समस्या वर्षानुवर्षे तशाच आहेत. त्यात सुधारणांची आवश्यकता असताना रेल्वेमंत्री , रेल्वे मंत्रालय त्याकडे ढुंकूनही पाहत नाही. सरकार केवळ बुलेट ट्रेनवर , हाय स्पीड ट्रेनच्या गप्पा मारत आहेत. आमचे लोक चेंगरून मरत आहेत. मात्र रेल्वेमंत्र्यांचं त्याच्याशी काहीही देणे घेणे नाही. आतापर्यंत झालेल्या रेल्वे अपघातांमध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. परंतु, लोकांच्या सुरक्षेसाठी नव्या रेल्वेमंत्र्यांनी काय केलं? हायफाय अधिकारी, आयआयटी मधून शिकलेले आयएएस अधिकारी, मोठे उद्योगपती अशी ख्याती असलेले हे रेल्वेमंत्र्यानी रेल्वेसाठी काही केलं आहे का? अशी विचारणा त्यांनी केली.. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले,’

## वांद्रे रेल्वे टर्मिनसवर प्रवाशांची प्रचंड चेंगराचेंगरी; नऊ जखमी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२७ ऑक्टोबर: येथील वांद्रे स्थानकातील टर्मिनसच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर रविवारी पहाटे प्रचंड चेंगराचेंगरी होऊन नऊ जण जखमी होण्याची घटना घडली. गोरखपुरला जाणाऱ्या एक्सप्रेस पकडण्यासाठी एकाचवेळी हजारो प्रवाशांनी गर्दी केल्याने हा अनर्थ घडला. अनेकजण रुळावर व फलाटावर पडून जखमी झाले. त्यांच्या आरडाओरड व पळापळीमुळे भल्या पहाटे स्थानकात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शबीर अब्दुल रेहमान, परमेश्वर गुप्ता, रविंद्र छुमा, रामसेवक रविंद्र प्रसाद प्रजापती, संजय कांगाय, दिव्यांशू यादव, मोहम्मद शेख, इंद्रजित शहानी आणि नूर शेख अशी जखमी झालेल्या प्रवाशांची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

मुंबई व उपनगरात वास्तव्यास असलेले परप्रांतीय दिवाळी व छटपूजेच्या निमित्त दरवर्षी आपल्या गावी जात असतात. शनिवारी रात्रीही त्यांनी गावी जाण्यासाठी मोठ्या संख्येने जमले होते. मात्र रात्रीची एक्सप्रेस रद्द झाल्यामुळे प्रवाशांची फलाटावर आणखी गर्दी वाढली. पहाटे ५.१० वाजता सुटणाऱ्या वांद्रे - गोरखपूर या एक्सप्रेस रात्री अडीचच्या सुमारास प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर आली . ही रेल्वे अनारक्षित असल्याने डब्यात शिरूर जागा पकडण्यासाठी प्रवाशांची गडबड असते. त्यानुसार गाडी स्टेशनवर पोहोचताच जनरल डब्याकडे सर्व प्रवाशांनी धाव घेतली. मात्र हजारोंवर प्रवासी असल्याने एकच गोंधळ उडाला. गाडीत चढण्यासाठी त्यांनी ढकलाढकली करीत तिकडे धाव घेतली. त्यांच्या प्रचंड रेट्यामुळे स्टेशनवर मोठा गोंधळ उडाला. रेल्वे पोलिसांनाही त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले नाही. सौम्य लाठीमार करत त्यांनी जमावाला बाजूला घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. ज्यादा पोलीस बोलाविण्यात आले. अखेर १५ मिनिटा नंतर जमावाला दूर करून रेल्वे रवाना झाली .मात्र या गडबडीत अनेक जण खाली पडून जखमी झाले. त्यांना तातडीने भाभा रुग्णालयात नेण्यात आले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.









## किनवट विधानसभेत उमेदवारी फेरबदलाने नविन ट्वीस्ट वंचित कडून प्रा.खुपसे यांचे तिकीट कापून, डॉक्टर आमले यांना उतरविले निवडणुकीच्या रिंगणात



तसा वृत्तसेवा
माहूर,दि.२७ ऑक्टोबर

किनवट विधानसभा निवडणुकीत नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जेमतेम दोनच दिवसांचा अवधी शिल्लक राहिला असताना उमेदवार फेरबदलीचा नवीनच राजकीय ट्विस्ट आला असून,वंचित कडून उमेदवारी जाहीर झालेले माहूर तालुक्यातील प्राध्यापक विजय खुपसे यांचे वंचित प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर यांनी तिकीट कापून नव्याने त्याजागी किनवट तालुक्यातील डॉ.पुंडलिक आमले माळबोरगावकर यांना उमेदवारीचे तिकीट दिले असल्याने किनवट विधानसभा निवडणुकीत उमेदवार निश्चितीत मोठी राजकीय उलथापालथ होऊन नाट्यमय घडामोड झाली आहे.

किनवट विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्यामध्ये इतर राजकीय पक्षाकडून त्यांच्या उमेदवाराचे नाव जाहीर होण्याआधी वंचित बहुजन आघाडीने प्रा.विजय खुपसे यांचे नाव सर्वात आधी जाहीर करुन निवडणुकीच्या मैदानात प्रस्थापितांशी दोन दोन हात करत टक्कर देण्यासाठी आपण तैय्यार असल्याचा ओपन चॅलैंज रुपाने बाँब फोडला होता.तो आता दिवाळीपूर्वीचा फुसका बार निघाला असून, पेटवण्याआधीच (नामनिर्देशन पत्र भरण्याआधीच) बाँबचा धमाका होणार नाही याची पश्चातबुद्धी प्रचिती आल्याने आंध या आदिवासी जमाती मधील प्राध्यापक उमेदवाराऐवजी आता नव्याने त्याच समाजातील एका डॉक्टर महाशयांना वंचितच्या प्रदेश अध्यक्षा रेखाताई ठाकुर यांनी उमेदवारी जाहीर करुन नाट्यमय राजकीय उलथापालथ करुन निवडणुकीस वेगळे वळण दिले आहे.

प्राध्यापक उमेदवाराच्या अभ्यासपूर्ण बोलभाषणाने मतदार वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराकडे वळणार नाहीत असा महाभारतातील दिव्यदृष्टी लाभलेल्या संजय प्रमाणे बहुधा वंचितच्या प्रदेश अध्यक्षांना लवकरच साक्षात्कार झाला असावा आणि म्हणून त्यांनी जनसामान्यांच्या आजारावर इलाज करणाऱ्या एका डॉक्टर ला उमेदवारी देऊन यावर रामबाण उपाय आणि इलाज दोन्ही साधण्याचा नवीनच राजकीय डावपेच आखला असल्याचे दिसून येत आहे. आपल्या वैद्यकीय व्यावसायादरम्यान भल्याभल्यांच्या आजाराचे निदान करत इलाज व उपचार करणारे डॉक्टर पुंडलिक आमले हे स्वत:च 'राजकारणीया' नावाच्या राजकीय रोगाने झपाटल्यावर वंचितचे उमेदवार म्हणून निवडून येण्यासाठी मायबाप मतदार जनता आता मतदानरुपात दस्तुरखुद्द डॉक्टरांनाच कोणती औषधी प्रिस्क्रिप्शन देतात यावर त्यांचे राजकीय भविष्य अवलंबून आहे. तर याउलट ते निवडून न आल्यास याचे परिणामाने ते कोणत्या प्रस्थापीत उमेदवारास विजयसंजिवनी देतात आणि कोणाला सलाईन लावतात हे पाहणे राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे ठरणार आहे.

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च



तभा वृत्तसेवा
माहूर,दि.२७ ऑक्टोबर

विधानसभा निवडणुकीच्यापार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबर पासून राज्यात लागलेल्या आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलीस ठाणे हद्दीतील वाई बाजार परिसरामध्ये कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये य यासाठी खबरदारी म्हणून, सिंदखेड पोलिसांच्यावतीने महत्त्वाचे पाऊल उचलत अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रूट मार्च काढण्यात आला. यावेळी नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या ठाणे हद्दीतील वाई बाजार परिसरात पोलिसांच्या वतीने रुट मार्च काढण्यात आला. यावेळी बोलताना सपोनी जाधवर यांनी कायदा सुव्यवस्थेचे पालन करत प्रशासनाला सहकार्य करावे, कोणतीही व्यक्ती जातीय व सामाजिक तेढ निर्माण करणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. सोशल मीडियावर एखादा मेसेज येत असेल व त्या मेसेजला एडिटिंग वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर लाऊन आचारसंहितेचा भंग करून कायदा सुव्यवस्था बिघडण्याचा प्रयत्न करत असेल तर त्वरित नागरिकांनी सिंदखेड पोलिसांशी संपर्क साधावा तसेच नागरिकांनी कोणत्याही मोहाला बळी न पडता कायद्याचे पालन करत कोणत्याही प्रकारचे कायद्याचे उलंघन होणार नाही याची दक्षता घेत आदर्श आचारसंहितेचे पालन करत १०० टक्के मतदान करावे!असे नागरिकांना सूचना वजा आवाहन केले. नांदेड पोलिस अधीक्षक यांच्या आदेशाने सिंदखेड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या सदरील रुटमार्चमध्ये बी एस एफ च्या काही तुकड्या, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता.हा रूट मार्च वाई बाजार बस स्टॉप ते वाई बाजार गावातील मुख्य बाजारपेठ असा आयोजित करण्यात आला होता.

## लेखी परीक्षेत २७ जण नापास; दोघांनी घेतले पैकीच्या पैकी गुण ८२५ कर्मचाऱ्यांनी जिंकली लेखी परीक्षेची 'निवडणूक'

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण पारपडल्यांतर लागलीच प्रशिक्षणावर आधारित लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये सव्वा आठशे कर्मचाऱ्यांपैकी २७ कर्मचारी नापास झाले. तर दोघा जणांनी पैकीच्या पैकी गुण घेतले. विधानसभा निवडणुकीसाठी सध्या नामनिर्देशनपत्र भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रत्यक्ष मतदान येत्या २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यासाठी निवडणूक विभागाकडून मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात पहिले प्रशिक्षण घेण्यात आले. प्रशिक्षणासाठी १३०० जणांना बोलावण्यात आले होते. त्यापैकी ८२५ जण हजर झाले. सुरुवातीला मतदान प्रक्रियेबाबत पॉवर पॉईंट प्रझेन्टेशन देण्यात आले. नंतर प्रत्यक्ष ईव्हीएम हाताळणीचे प्रशिक्षण दिले गेले. शेवटी हे प्रशिक्षण कितपत समजले केले याची तपासणी करण्यासाठी लगोलग ३० गुणांची परीक्षा घेण्यात आली. गुगलवरुन सर्वांच्या मोबाईलवर लिंक शेअर करण्यात आली. त्यावरील प्रश्न सोडविण्यासाठी ३० मिनिटांचा अवधी देण्यात आला. परीक्षेनंतर लगेच निकालही घोषित केला. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी ५० टक्के गुणांचा निकष ठेवण्यात आला होता. त्यानुसार २७ जणांना यापेक्षा कमी गुण मिळाले. त्यांना नापास ठरविण्यातआले. तर २ जणांनी शंभर टक्के गुण मिळविले. नापासांना पुन्हा एकदा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. पश्चिम मतदारसंघातील आणखी १३०० कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण बाकी असून त्यांना रविवारी (दि. २७) बोलावण्यात आले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी यांनी सांगितले की, मतदान प्रक्रियेबाबत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. मात्र, ते प्रशिक्षण ते किती ग्रहण करतात हे सांगता येत नाही. ते तपासण्यासाठी आम्ही लगेचच प्रशिक्षणावर आधारित ३० गुणांची लेखी परीक्षा घेतली. त्यात बहुसंख्य कर्मचाऱ्यांची कामगिरी उत्तम राहिली, याचा प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत फायदा होईल.

# मुखेडमधील जांब सर्कलचा बालाजी खतगांवकरांना पाठिंबा

### भव्य रॅलीचे आयोजन करत केले शक्तिप्रदर्शन!

तभा वृत्तसेवा
नांदेड,दि. २७ ऑक्टोबर

राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची सर्वपक्षीय नेते आणि कार्यकर्ते जोरदार तयारी करताना दिसत आहेत. मुखेड आणि कंधार मतदारसंघात भाजपने विद्यमान आमदार डॉ. तुषार राठोड यांना उमेदवारी जाहीर केली आहे. याच मतदारसंघात शिवसेनेकडून इच्छुक असलेले उमेदवार बालाजी पाटील खतगांवकर यांनी आपण अपक्ष निवडणुक लढवणार असल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे त्यांनी जनसामान्यांचा कल जाणून घेत मतदार संघात भेटीगाठींचे सत्र वाढवले असल्याचे पाहायला मिळत आहे. जनतेचा देखील त्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मुखेड तालुक्यातील लोखंडे चौकापासून ते शिवसेना पक्ष कार्यालयापर्यंत जांब सर्कलमधील ग्रामस्थांनी भव्य अशी रॅली आयोजित करून पाठिंबा दिला. बालाजी पाटील खतगांवकर यांच्या समर्थनार्थ घोषणा देत आपण आगामी निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने त्यांना निवडून आणू, असा निर्धार



केला. त्यामुळे आगामी काळात नक्कीच या भागात परिवर्तन होऊ शकते, हे जवळपास निश्चित झाले आहे. ही विजय संकल्प रॅली आहे. २० तारखेचा मतदान आणि ते २३ तारखेचा निकाल आत्ताच जनतेने दाखवून दिला आहे. तुमचे प्रेम कधीच विसरणार नाही. उमेदवारी कोणाला द्यायची याचा अधिकार संबंधित पक्षांना आहे, पण कोणाला निवडून आणायचा याचा अधिकार फक्त जनतेला आहे. रॅलीला मिळालेला हा प्रतिसाद पाहून उद्याचा गुलाल आपणच उधळू. या भागाचा अपेक्षित असा विकास झाला नाही, ही खंत आहे. त्यामुळे ही लढाई विकासासाठी, या समाजासाठी, गोरगरिबांसाठी आहे. या लढाईत सर्वपक्षीय नेत्यांनी आणि जनतेने मला पाठिंबा दिला आहे. तुमच्या प्रत्येक सुख-दुःखामध्ये, विकासकामांमध्ये सावलीसारखा तुमच्या सोबत राहील. शरमेने मान खाली जाईल, असे कार्य कधीही करणार नाही, असा शब्द बालाजी पाटील खतगावकर यांनी रॅलीला संबोधित करताना दिला.

यावेळी बालाजी पाटील खतगांवकर (खासगी सचिव, महाराष्ट्र राज्य), अण्णाराव शिंदे (तंटामुक्ती अध्यक्ष), श्याम शिंदे, . उत्तम सोनकांबळे (सेवानिवृत्त अधिकारी), . शंकर पाटील लुटे (शिवसेना ज्येष्ठ नेते), सय्यद सुभानी (ऑल इंडिया उन्मा बोर्ड तालुका अध्यक्ष), जावेद शेख (ऑल इंडिया उन्मा बोर्ड शहराध्यक्ष) गजानन पाटील (जांभळी सरपंच), बालाजी मॅचेवार,. माणिक उमाटे, काशी पाटील हाक्के, गौस सलगरकर, शंकर श्रीरामे, कपिल कपाळे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेड दक्षिण मतदार संघ अजूनही थंडच

### कार्यकर्ते अजूनही संभ्रमात

तभा वृत्तसेवा
सोनखेड,दि. २७ ऑक्टोबर

नांदेड दक्षिण मतदार संघात अखेर काँग्रेस कडून मोहन अण्णा यांची उमेदवारी जाहीर झाली तरी या वेळेस मोहन अण्णा यांना ही निवडणूक अवघडच जाणार आहे कारण काँग्रेस च्या कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह फारसा दिसत नसल्याने सोनखेड सर्कल सामसूम झाले आहे तर दुसरीकडे शिंदे गटाने अजुन उमेदवार जाहीर न केल्याने शिवसेनेच्या बाले किल्यात शांतता दिसत आहे मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिके मुळे तरुण पिढी सह नागरिक कमालीचे आक्रमक असून सोनखेड सर्कल मध्ये कोणताही उमेदवार आज आचार संहिता जाहीर झाल्यापासून फिराकलाच नाही कारण मराठा समाजाची धास्ती घेतल्याने भेटी तरी कशा द्याव्यात हा प्रश्न उमेदवार जाहीर झालेल्याना पडला आहे. मागील विधानसभा निवडणूक मध्ये भाजप ने बंडखोर उमेदवार दिल्याने शिवसेनेला पराभव पहावा लागला होता आता मात्र शिवसेना आपला बालेकिल्ला परत ताब्यात घेण्यासाठी प्रचंड ताकतीने कामाला लागला असून पाच वर्षात नाराज झालेल्या मतदार यांच्या भेटी घेऊन त्यांना विश्वासात घेण्याचे काम मागील पंधरा दिवसापासून शिवसेना (शिंदे गट) करीत आहे

मनोज जारांगे मुळे कोणाचा फायदा आणी नुकसान होणार ?

सध्या काँग्रेस ने मराठा चेहरा उमेदवार दिला आहे तर अजुन तीन मराठा उमेदवार यांनी जर उमेदवारी दाखल केली तर मराठा समाजाच्या मताचे विभाजन होईल व प्रतिस्पर्धी उमेदवारास ओबीसी एससी मुस्लिम चे एकगाठ्ठा मतदान मिळेल त्यामुळेच भाजपा नांदेड दक्षिण मतदार संघ आपल्या कडे घेण्यासाठी अडून बसला आहे भाजप ने जर हा मतदार संघ ताब्यात घेतला तर उमेदवार हा ओबीसी नक्कीच असेल आणी ओबीसी समाजाचे एक गाठ्ठा मतदान घेऊन उरलेल्या मराठा व इतर मताचे विभाजन होणार आणी त्याचा फायदा भाजप ला होणार असे समीकरण अगोदरच पक्के केले आहे परिणामी जरांगे यांनी अगोदरच पाच जणांना उमेदवारी दाखल करण्याचे सांगितले असून ऐन वेळेस कोणते चार अर्ज उचलायचे आणी कोणता एक ठेवायचा व कोणता पाडायचा आणी कोणता आणायचा ते त्याच दिवशी सांगणार असल्याची मिळत आहे.

सध्या तरी नांदेड दक्षिण व सोनखेड सर्कल मध्ये काँग्रेस शिवसेना (शिंदे गट) भाजप यांची कुठलीच चर्चा नाही ना कुणाचे वातावरण नसल्याचे चित्र दिसत आहे कारण नांदेड दक्षिण च्या विजयी आमदाराची वाट ही सोनखेड सर्कल मधूनच जात असून सोनखेड सर्कल हा अगोदरच विजयाचा केंद्र बिंदू असून सोनखेड सर्कल ज्या उमेदवाराच्या पाठीशी असते त्याचा विजय निश्चित मानला जातो आज पर्यंत चालत आले आहे व एकच आमदार पुन्हा निवडून आलेला नाही हे आज पर्यतचे चित्र असून यावेळेस हे चित्र पलटनार की तेच राहणार हे उत्सुकतेच ठरणार आहे

# १६८२०४४७६० कोटी रुपयांच्या हिऱ्यांची पावडर करुन पृथ्वीच्या वातावरणात सोडण्याचा मास्टर प्लॅन!

मुंबई : ग्लोबल वॉर्मिंग म्हणजेच पृथ्वीचं वाढणारं तापमान हा मानवजाती समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. मानवासमोर उभ्या असलेल्या नैसर्गिक आव्हांनामध्ये ग्लोबल वॉर्मिंगचं नाव आवर्जून घ्यावं लागेल. ग्लोबल वॉर्मिंगचा परिमाण मागील काही वर्षांपासून प्राकर्षाने जाणवू लागला आहे. दिवसोंदिवस हा परिणाम अधिक दाहक होत असून यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी धोक्यात येईल असं सांगितलं जात आहे. त्यामुळेच सध्या वैज्ञानिक पृथ्वीचं तापमान कसं नियंत्रणात ठेवता येईल यासाठी प्रयत्न करत आहे.

नेमकी काय माहिती समोर आली आहे?

नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स'मध्ये असं सांगण्यात आलं आहे की, पृथ्वीच्या वातावरणामध्ये हिऱ्यांची पूड सोडल्यास ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढलेलं तापमान कमी करण्यासाठी मदत होईल. वेगवेगळ्या संस्थांमधील हवामान अभ्यास तज्ञ, मेट्रोलॉजिस्ट आणि अर्थ सायंटीस्टने आधुनिक थ्री डी मॉडेल्सच्या मदतीने पृथ्वीच्या वातावरणाच्या वरच्या थरात हिऱ्यांची पावडर सोडण्याने काय परिणाम होतील याचा अभ्यास केल्यानंतर हा सल्ला सुचवलं आहे. वातावरण बदलानुसार पृथ्वीचं तापमान चिंताजनक स्तरावर आहे. त्यामुळेच आपल्या ग्रहाचं वाढलेलं तापमान कमी करण्यासाठी वैज्ञानिक नवीन नवीन मार्गांचा शोध घेत आहेत.

हवेतील कार्बन शोषून

घेणारं तंत्रज्ञान वापरण्याचा सल्ला अनेक संशोधकांनी दिला आहे. पृथ्वीचं तापमान चिंताजनक स्तरावर असल्याने अधिक परिणाम कारण उपाय योजना करणं आवश्यक आहे. यासाठी



सुर्यप्रकाश परावर्तित करुन पुन्हा अंतराळात पाठवण्यासाठी काही करता येईल का यावर अभ्यास करण्यात आला. त्यावेळेस अशा सात गोष्टींवर संशोधकांचं एकमत झालं त्यांच्या माध्यमातून हे साध्य करता येईल. यामध्ये कॅसीट, ॲल्यूमिनियम, सिलिकॉन कार्बाईट, सल्फर डायऑक्साइड या पदार्थांचा समावेश आहे. मात्र या एकूण सात पदार्थांपैकी हिऱ्यांची पूड ही सर्वात परिणामकारक असल्याचं दिसून आलं. हिऱ्यांची पूड पृथ्वीच्या वातावरणामधील उच्च स्तरावर सोडली तर तिच्या मदतीने जास्तीत जास्त सुर्यप्रकाश आणि सूर्याची उष्णता परावर्तित करता येईल, असं संशोधकांना संशोधनानंतर दिसून आलं.

हिऱ्यांची पूड अधिक सोयीस्कर कारण

आजपर्यंत संशोधकांच्या दाव्यानुसार सल्फर डायऑक्साइड वातावरणामध्ये सोडण्याचा प्रस्ताव होता. मात्र यामुळे ॲसिडचा पाऊस पडू शकतो आणि ओझोनच्या स्तरावर सल्फर डायऑक्साइडचा दुष्परिणाम होऊ शकतो. मात्र हिऱ्याची पूड ही नैसर्गिकरित्या रासायनिक दृष्ट्या निष्क्रिय असते. त्यामुळे सल्फर डायऑक्साइडपेक्षा हिऱ्यांची पूड वापरणं अधिक फायद्याचं ठरु शकतं. हिरा रासायनिक दृष्ट्या निष्क्रिय असल्याने त्याचा वातावरणावर फारसा परिणाम होणार नाही.

वर्षाला ५००००००००० किलो हिऱ्यांची पूड

वातावरणातील बदलासंदर्भात अभ्यास केल्यानंतर समोर आलेल्या माहितीनुसार, वर्षाला ५ मिलियन टन म्हणजेच ५००००००००० किलो सिंथेटीक हिऱ्यांची पूड वातावरणाच्या वरच्या स्तरात सोडायला हवी असा वैज्ञानिकांचा सल्ला आहे. त्यामुळे ४५ वर्षांमध्ये पृथ्वीचं तापमान १.६ अंश सेल्सिअसने कमी होईल.

सगळ्यात मोठी चिंता खर्चाची

मात्र हा उपाय परिणामकारक असला तरी यासाठी फारच मोठ्याप्रमाणात खर्च करावा लागेल. यासाठीच्या खर्चाचा आकडा पाहून तुम्हाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. दरवर्षी ५००००००००० किलो हिऱ्यांची पूड वातावरणाच्या वरच्या भागात सोडण्यासाठी २०० ट्रिलियन अमेरिकी डॉलर्स इतका खर्च येईल. रुपयांमध्ये सांगायचं झाल्यास हा खर्च १६८२ कोटी ४ लाख ४७ हजार ६० कोटी रुपये इतका आहे. आकड्यांमध्ये सागायचं झालं तर हा आकडा १६,८२,०४,४७, ६०,००,००,००० इतका मोठा आहे.

# २३३ परळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक२०२४ करिता परळी येथे मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

परळी / प्रतिनिधी : परळी विधानसभा मतदारसंघातील ३६३ मतदान केंद्राकरिता नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व ईतर मतदान अधिकारी यांचे विधानसभा मतदान प्रक्रियाबाबतचे प्रशिक्षण मुक्ताई लॉन्स व परळी वै येथे तर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत क्लासरूम निहाय प्रशिक्षण विद्यावर्धिनी विद्यालय औष्णिक विद्युत केंद्र परळी वै येथे यशस्वीपणे संपन्न झाले.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, व्यंकटेश मुंडे सहा निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार परळी वै, तेजस्विनी जाधव सहायक निवडूक निर्णय अधिकारी,त्रिंबक कांबळे सहायक निवडणूक अधिकारी ,नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , अण्णा वंजारे,मिलींद गायकवाड, परविन पठाण, ढगे यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर तसेच मंडळ अधिकारी व महसूल विभागाचे व शिक्षण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

परळी विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर रविवार दिनांक २७.१०.२०२४ रोजी सर्व कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न झाले.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता कोणत्याही प्रकारचा विस्कळीतपणा न येता सुलभ पद्धतीने प्रशिक्षण संपन्न व्हावे यासाठी प्रशिक्षण सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात दोन वेगवेगळया ठिकाणी संपन्न झाले. सकाळच्या सत्रात व दुपार सत्रात १५४८ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण स्वतंत्रपणे देण्यात आले.



या प्रशिक्षणाची सुरुवात ही राष्ट्रगीताने करण्यात आली. तद्नंतर माननीय जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा या प्रशिक्षणास उद्बोधन करणारा व मार्गदर्शन करणारा व्हिडीओ संदेश प्रथम दाखवण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना निर्णय अरविंद लाटकर निनिअ यांनी नियुक्त मतदान अधिकारी यांना ईव्हीम व साहित्य व विविध अहवाल याबाबतीत सविस्तर माहिती व मार्गदर्शन करून निवडणूकीचे कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच वाचन व पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले .

यावेळी व्यंकटेश मुंडे सनिनिअ तहसिलदार यांनी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना परळी विधानसभा मतदारसंघात होणारे मतदान साहित्य वितरण केंद्र व स्विकृती केंद्र व त्याचे नियोजन , मतदानाचे आदल्या दिवशी व मतदान दिवशी करावयाची महत्वाची कामे , ईव्हीम मॉक पोल, सिलींग , विविध घोषणापत्र , लिफाफे ईत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक नायब तहसिलदार मिलींद गायकवाड व बालाजी कचरे अवल कारकुन यांचे नियोजनाखाली सर्व झोनल अधिकारी व मास्टर ट्रेनर यांनी विद्यावर्धिनी विदयालय येथे खोलीनिहाय करण्यात आले . मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व खुल्या वातावरणात पार पाडण्यास सहाय करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य व जबाबदारी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावी असे आवाहन केले.

प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट मशीन याचे प्रात्यक्षिक पाहून मतदान यंत्रे स्वतः हाताळनी करून पहिली.या प्रशिक्षणाच्या प्रस्ताविकातून नायब तहसीलदार बाबुराव रुपनर व पुरवठा निरीक्षण अधिकाकी ढगे यांनी सर्व कर्मचारी यांची भोजन व चहापाणी नियोजन पाहीले .

सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी श्री आर फी कुमटकर,श्री उडते,गणेश फड ,मंगल मुंडे,श्री धनराज भाडेकर ,महसूल सहाय्यक, श्री पंकज दहातोंडे व मुसळे लिपिक नगर परिषद परळी, व ईतर शिक्षक वसीम शेख , श्री अनिल गवळी, श्री दिगंबर शिनगारे महसूल सहाय्यक तसेच सर्व तलाठी , मंडळ अधिकारी , कोतवाल व शिपाई यांनी परिश्रम घेतले.

# साहित्योत्सव जश्न-ए-आदब सांस्कृतिक कारवाँ संस्कृती आणि साहित्याचा वारसा नटलेला मेळावा

पुणे : भारतीय संस्कृती, कला आणि साहित्य यांचा संगम असलेला जश्न-ए-अदब सांस्कृतिक कारवाँ हेरिटेज फेस्टिव्हल पुण्यात साजरा करण्यात आला. भारतभरातील दिग्गज कलाकारांनी दिलेल्या विविध सादरीकरणावर संपूर्ण पुणे नाचले. नव्या पिढीचा सांस्कृतिक उपक्रमांबद्दलचा आवेश आणि उत्साह पाहण्यासारखा होता. नॅशनल फिल्म आर्काइव्ह ऑफ इंडिया (एनएफएआई) सभागृह, एनएफडीसी, लॉ कॉलेज रोड येथे आयोजित दोन दिवसीय महाकुंभात शास्त्रीय गायन, गझल गायन, पॅनल डिस्कशन, नाटक, मुशायरा आणि कवी संमेलन, वाद्ये, वाद्ये यांचा समावेश होता. शास्त्रीय नृत्य आणि लोकनृत्य यांचा समावेश होता. कार्यक्रमात प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला होता, ज्याचा मुख्य उद्देश भारतीय संस्कृती आणि साहित्याला प्रोत्साहन देणे आणि तरुण पिढीला त्याचे महत्त्व पटवून देणे हा होता.

या कार्यक्रमाविषयी बोलताना कुंवर रणजीत चौहान, संस्थापक, साहित्योत्सव जश्न-ए-आदब सांस्कृतिक कारवाँ म्हणाले, पद्मभूषण पं. साजन मिश्रा यांच्या मान्यवर उपस्थितीने आणि हृदयस्पर्शी सादरीकरणाने साहित्योत्सव 'जश्न-ए-आदब' सांस्कृतिक कारवाँ बनवला. २०२४ चा वारसा मोठ्या संख्येने तरुणांच्या उपस्थितीने वाढला आहे. पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमात कविसंमेलन, काव्य मंचन, पॅनल डिस्कशन, विनोदी नाटक, शास्त्रीय संगीत



आणि बासरीवादन यासारखे उपक्रम विशेष आकर्षणाचे केंद्र होते. सुप्रसिद्ध भारतीय शास्त्रीय गायक पद्मभूषण पं. साजन मिश्रा यांच्या उपस्थितीत भव्य उद्घाटन करण्यात आले. यावेळी भारतातील अनेक नामवंत कलाकार आणि साहित्यिक उपस्थित होते. यानंतर मराठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून त्यात नामवंत कवींनी मराठी भाषेतील प्रसिद्ध कविता सादर केल्या. यानंतर 'अज्ञात ते ज्ञातापर्यंत...' या सत्रात प्रसिद्ध अभिनेते, चित्रकार, लेखक आणि दिग्दर्शक पंकज झा यांनी आपल्या कवितांमधून सर्वांना मंत्रमुग्ध केले. सर्व कविता जीवनाच्या विविध पैलूंवर आधारित होत्या. यानंतर 'द स्वर्लिंग वर्ल्ड ऑफ थिएटर' या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये पंकज झा, प्रसिद्ध अभिनेता सुमीत व्यास आणि कुंवर रणजीत चौहान यांच्यात महत्त्वपूर्ण संवाद झाला. या सत्रात नाट्यविश्वातील विविध पैलूंवर होणारी चर्चा हे विशेष आकर्षणाचे केंद्र होते. तारिक हमीद यांच्या 'इन मेमरी ऑफ मरहूम की याद में' या विनोदी नाटकाच्या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह हास्याने गुंजले. यानंतर 'सूर-साधना'मधील पद्मभूषण पं. साजन मिश्रा यांच्या शास्त्रीय संगीतावरील सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. पद्मविभूषण पं. हरिप्रसाद चौरसिया यांच्या बासरी वादनाने कार्यक्रमाची सांगता झाली.दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमात मुशायरा, कथा वाचन, कथ्थक नृत्य आणि पॅनल डिस्कशनचा समावेश होता. पहिला उपक्रम 'मुशायरा- नौ बहार' हा होता, ज्यात दखत रावल मिजाझ, जव्वाद सय्यद फैसल खान, अदनान शेख, शोएब फिरोजी आणि पूनम खत्री यांनी आपल्या अप्रतिम काव्याने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यानंतर 'अपनी कहानी के अपनी किरादार' सत्राचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये प्रसिद्ध अभिनेते आणि लेखक मनु ऋषी चड्ढा यांनी त्यांच्या हृदयस्पर्शी कथा वाचून दाखवल्या.

## धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी उभारणार ६०० कोटींचा अतिरिक्त प्रकल्प
### स्थानिकांना मोठ्या प्रमाणात मिळणार रोजगार



परळी वैद्यनाथ - बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे.

या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे.

त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत.

## जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या मूकबधिर विद्यालयात दिवाळी फराळ वाटप



माजलगाव, प्रतिनिधी : जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील मूकबधिर विद्यालयात श्री. सिद्धेश्वर जीनियस इंग्लिश स्कूलच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका मिटकरी मॅडम, उपमुख्याध्यापिका अनघा देशमुख मॅडम तसेच स्कूलचे अर्थसमिती चे सदस्य कलंत्री सर व मूकबधिर निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक थळपती व त्यांचा सर्व सहकारी वर्ग उपस्थित होता. यावेळी थळपती यांनी मधील विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या तसेच मुलांना कशा पद्धतीने शिक्षण दिल्या जातं, त्यांच्यासाठी घेतले जाणारे उपक्रम, मुलांमधील विशेष कौशल्ये इत्यादी विषयी माहिती दिली. उपमुख्याध्यापिका अनघा देशमुख मॅडम यांनी मुलाची असलेली शिस्त ,त्यांच्यातील नाविन्य याचे भरभरून कौतुक केले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुलांना दिवाळी फराळाचं वाटप करण्यात आले.

## अष्टविनायक दर्शन यात्रा, श्रीक्षेत्र पोहरादेवी दर्शन यात्रा भाविक संमेलन व मावंद्याचा कार्यक्रम संपन्न



खुलताबाद प्रतिनिधी - जेव्हा आपण तल्लीन होऊन सप्ताह , प्रवचन, मंदिर आदी ठिकाणी होणाऱ्या ध्यानरुपी प्रवचनातून मनातील सर्व आकाश द्वेष इच्छा बाजूला सारून जेव्हा आपण देवाचे नामस्मरण करतो तेव्हा आपल्या तेव्हा आपल्या जीवनाला कलाटणी देणारा तो क्षण असतो काही माझ्या जन्माच्या पुण्याई असतील असे आई वडील आजी आजोबा व मतदार संघातील तुम्ही सर्वश्रेष्ठान मुळे मला तुमची सेवा करण्याची संधी मिळाली. निस्वार्थ भक्ती भवाने नागरिकांच्या, जेष्ठांच्या दर्शन यात्रा घडविल्यास त्याचे कंपन तयार होतात. आणि हे कंपन आम्हा राजकारण्यांना मतदारसंघात चांगली कामे करण्यासाठी सदसद्विवेकबुद्धी प्रधान करतात व त्या माध्यमातून आमच्या हातून चांगली कामे करण्यास व मतदार संघाचा विकास करण्यास भाग पाडत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी वेरूळ येथे केले.

आमदार बंब यांच्या वतीने ज्येष्ठांसाठी सुरू करण्यात आलेल्या दर्शन यात्रेत दर्शन घेऊन आलेल्या भाविकांच्या वतीने आयोजित अष्टविनायक दर्शन यात्रा, श्रीक्षेत्र पोहरादेवी दर्शन यात्रा भाविक संमेलन व मावंद्याचा कार्यक्रम रविवार (दि.२७) वेरूळ या ठिकाणी पार पडला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

दरम्यान विविध तीर्थस्थळावरून आणलेल्या पवित्र जलाचे व कशाचे पूजन यावेळी ११ जेष्ठ जोडप्यांच्या उपस्थितीत आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलताना बंब म्हणाले की, शिक्षणामुळे सर्वात जास्त ऱ्हास होत आहे. शिक्षकांनी प्रत्येकांच्या जीवनाची माती केली आहे. प्रत्येकाचे शिक्षण हे चांगले झाले पाहिजे. ज्याचे प्राथमिक शिक्षण जर बरोबर झाले तर त्याचे उत्पन्न तो पदवी घेईपर्यंत लाखो रुपयांचे होते. परंतु आज राज्याचे दुर्दैव आहे. प्राथमिक शिक्षण बरोबर नाही. त्यामुळे येणाऱ्या पिढ्या बरबाद होत आहे. परंतु मी त्यांना आमदार म्हणून शिक्षणाचा दर्जा वाढ व्हायलाच लावेल आणि म्हणून मी आता विडा उचलला आहे. जिल्हा परिषद शाळेत खाजगी शाळेचे विद्यार्थी लाईन लावून ऍडमिशन घेतील इतका चांगला दर्जा सुधरून दाखवणार असल्याचे त्यांनी सांगून आगामी काळात बालवाडी ते पदवी पर्यंत मोफत शिक्षण झाले पाहिजे यावर काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान आमदार बंब यांचे आलेल्या भाविकांनी अष्टविनायक पोहरादेवी यात्रा घडवल्याबद्दल आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मित्रमंडळी व गंगापूर खुलताबाद तालुक्यातील भाविक उपस्थित होते.

# होम पिचवर आ.संग्राम जगतापांची जोरदार बॅटिंग, नागरिकांकडून उत्स्फूर्त स्वागत

## सारसनगरची वाटचाल आदर्श नगरच्या दिशेने : आ.संग्राम जगताप



नगर - एकेकाळी कोणत्याच सुविधा नसलेल्या सारसनगरचा आता सर्वांगीण विकास झाला आहे. जेथे चांगल्या सुविधा मिळतात तेथेच नगरीकांना रहावयास आवडते. त्यामुळे चांगल्या सोयीसुविधा मिळत असल्याने या भागात झपाट्याने लोकवस्ती वाढत आहे. सारसनगर मधील रस्ते, पाणी, पथदिवे, आरोग्य या मुलभूत गरजा पूर्ण करण्याबरोबरच या भागात आता नगर मधील पहिले सर्व सोयीसुविधांयुक्त स्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यात येत आहे. तसेच उद्यान, सर्व समाजांसाठी सभामंडप, ९० टक्के अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण, सुशोभीकरण आदी विकास कामांमुळे सारसनगरची वाटचाल आता आदर्श नगरकडे झाली आहे. येथील नागरिकांना सर्वोत्तम नागरी सुविधा मिळत असल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहेत, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यावर महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. शहरातील विविध भागांमध्ये आ.संग्राम जगताप यांनी प्रचारास सुरवात केली असून सर्व ठिकाणी त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सारसनगर मध्ये झालेल्या प्रचार फेरीस परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी आ.संग्राम जगताप यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. जेसीबी मधून पुष्पवृष्टी करत क्रेनच्या सहाय्याने भलामोठा पुष्पहार त्यांना घालून जल्लोषात स्वागत युवा प्रतिष्ठान, स्वराज्य युवा प्रतिष्ठानच्या वतीने करून सत्कार करण्यात आला. यावेळी स्वतः च्या हक्काचा असलेल्या या होम पिचवर आ.संग्राम जगताप यांनी जोरदार बॅटिंग केली.

यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे व संजय चोपडा, डॉ.विजय भंडारी, ज्ञानदेव पांडूळे, दत्ता खैरे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा.विधाते, छबुराव कांडेकर, बापूसाहेब ओव्हाळ, विष्णु कलागते, लकी खूबचंदानी, महादेव कारळे, दादा दरेकर, धर्मा कारंडे, बाबासाहेब भगत, राजू ससाणे, देशमुख सर, समीर खडके, अशोक म्हस्के, शरदराव भांबरे, दिपक गांधी, कांतीलाल गांधी, पंकज मेहर, प्रकाश ईवळे, अरुण गाडळकर, झुंबरराव आव्हाड, बबन घुले, अनिल पालवे, आलिशा गर्जे, किरण कटारिया आदींसह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक,महिला उपस्थित होत्या. महात्मा फुले चौका पासून सुरु झालेली ही प्रचारफेरी त्रिमूर्ती चौक, सारस कॉलनी, सचिन नगर, राधाकृष्ण मंदिर, शिवगंगा टॉवर, कपिलेश्वर कॉलनी, राजश्री कॉलनी, भगवानबाबा चौक, मधुबन कॉलनी, राजमाता कॉलनी, चिपाडे मळा, नानाजीनगर आदी भागांमध्ये झाली. यावेळी ठिकठिकाणी उमेदवार संग्राम जगताप यांचे नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले तसेच महिलांनी औक्षण केले.

यावेळी प्रकाश भागानगरे यांनी प्रास्ताविकात आ.संग्राम जगताप यांनी सारसनगरच्या विकासासाठी केलेल्या कामांचा आढावा घेतला. ते म्हणाले, आ.संग्राम जगताप यांनी काही वर्षातच सारसनगरचा कायापालट केला आहे. त्यामुळे हा परिसरातील जवळपास सर्व प्रश्न व समस्या मार्गी लागल्या आहेत. आ. संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून सारसनगर परिसरात अरुणोदय स्पोर्ट कॉम्प्लेक्स हे आधुनिक क्रीडा संकुल पूर्णत्वास येत असून यासाठी ११ कोटी रुपये निधी दिला आहे. स्वामी समर्थ केंद्रासाठी सुमारे २५ लक्ष रुपयांचे सभामंडप दिला आहे. जैनस्थानकाच्या सभामंडपासाठीही २५ लक्ष रुपये निधी दिला. सारसनगरच्या प्रवेशद्वारावर भव्य स्वागत कमान उभारली असून त्याचे नामकरण क्रांतिजोती सावित्रीबाई फुलेनगर असे करण्यात आले आहे. सर्व जातीधर्मासाठी मोठे योगदान आ.संग्राम जगताप यांनी दिले आहे. यामध्ये ख्रिश्चन समाजासाठी सारसनगर मध्ये चर्च व सभामंडप, भगवानबाबा मंदिराला भव्य सभामंडप, परीट समाजाच्या गाडगेबाबा मंदिराला सभामंडप. गवळी समाजातील सिदाजीआप्पा मंदिराला जागा व सभामंडप. नाभिक समाजाला जागा व सभामंडप, तुकाराम महाराज मंदीराला जागा व उपलब्ध करून वॉल कंपाऊंड दिले आहे. सारसनगरचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सात लाख लिटर पाण्याची नवी टाकी उभारण्यात आली आहे. महात्मा फुले चौका जवळ सारसनगरला जाणाऱ्या रस्त्यावर व नानाजीनगरला नवीन पूल भांधाण्यात आला आहे. प्रभागातील ९० टक्के रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण झाले आहे. मधुबन कॉलनीत वाचनालय, राजमाता कॉलनी येथे नवीन आरोग्य केंद्र, त्रिमूर्ती चौक येथे नवीन आरोग्य उपकेंद्र, अनेक ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड तसेच पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभित करण्यात आले आहेत.

## लाखो समर्थकांच्या उपस्थितीत अनुराधाताई चव्हाण दाखल करणार आज उमेदवारी अर्ज

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टीने बहुचर्चित असलेया फुलंब्री मतदार संघामध्ये आतापर्यंत केलेल्या विकास कामाची पावती म्हणून सभापती अनुराधाताई चव्हाण यांना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (ए) मित्रपक्ष प्रणीत महायुतीने उमेदवारी जाहीर केली आहे. अनुराधाताई चव्हाण या आज सोमवार (दि. २८) रोजी महायुतीच्या सर्व पदाधिकारी आणि लाखो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. यावेळी फॉर्म भरण्यासाठी आशीर्वाद देण्यासाठी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सभापती अनुराधाताई चव्हाण आणि महायुतीच्या सर्व पक्षीय नेत्यांनी केले आहे.

सकाळी नऊ वाजता केंब्रीज चौक येथून भव्य पायी मिरवणूक काढण्यात येणार असून चिकलठाणा, मुकुंदवाडी मार्गे मध्यवर्ती प्रचार कार्यालय, इडन गार्डन येथे पोहचेल. यावेळी माजी केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खासदार डॉ. भागवत कराड, माजी मंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे आदींच्या हस्ते मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी या कार्यालयात जाहीर सभा होणार असून या सभेला मान्यवर नेते संबोधित करणार आहे. यासोबतच लोकप्रिय सभापती अनुराधाताई चव्हाण या देखील त्यांच्या स्वप्नातील फुलंब्री मतदार संघ आणि त्याचा विकास कसा करणार याबाबत त्यांची असलेली ध्येयधोरणे उपस्थितासमोर मांडणार आहे. या सभेनंतर गरवारे हायटेक फिल्म लिमिटेड चिकलठाणा येथे सर्वजन उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष सुहासभाऊ सिरसाठ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रमेश पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, भाजप शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अभिजित देशमुख, आरपीआयचे बाबुराव कदम यांनी केले आहे.

## संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील रस्त्यावर दुचाकीने घेतला पेट

सिल्लोड, (प्रतीनीधी) : सिल्लोड येथील छत्रपती संभाजीनगर- जळगाव महामार्गावरील रस्त्यावर सिल्लोडहुन छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या चालू दुचाकीने अचानक पेट घेतल्याने जळून खाक झाली. मात्र दोघेजण बालबाल बचावले.

याबाबत अधिक माहिती अशी की, शनिवारी सकाळी सुमारे १० वाजेच्या दरम्यान माणिकनगर ता. सिल्लोड येथील सिद्धेश्वर साखर कारखान्यासमोर छत्रपती संभाजीनगर- जळगाव महामार्गावरील रस्त्यावर सिल्लोडहुन छत्रपती संभाजीनगरकडे जाणारे जुबेर अमेर शहा (वय ३० वर्ष), रा नाचनवेल ता. कन्नड, जहूर शेख (वय ३२ वर्ष) रा. सिल्लोड हे बांधकाम काम करणारे मजूर दोघेजन एच एफ डिलक्स कंपनीच्या दुचाकी क्र. एम एच २० एफ जे ३४४१ या दुचाकीवर बसून अंधारी येथे बांधकाम कामासाठी जात

असतांना येथील पेट्रोल पंपासमोर रस्त्यावर चालू गाडीने अचानक पेट घेतल्याने या दोघांनी चालू गाडीवरून उड्या मारल्याने हे दोघेजन बचावले. या दरम्यान महामार्गांवर एका बाजूने काही वेळ वाहतूक खोळबली होती. या दरम्यान येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची गर्दी झाली होती. टाकीचा स्फोट होईल या धाकाने या दुचाकीजवळ जाण्यास हिंम्मत होत नव्हती. नंतर काहीवेळाने कर्तव्यतत्पर युवकांनी पाणी आणून हि दुचाकीवर पाणी टाकून आग विझवण्यात यश मिळवले मात्र मात्र गाडीचा काही क्षणात कोळसा झाला. मात्र दुचाकी चालकांनी उड्या मारल्याने हे दोघेजण बचावले.

## नारेगावात चार लाखांचा गुटखा पकडला

छत्रपती संभाजीनगर : गुटख्याचा साठा करून विक्री करणाऱ्या साठेबाजाला अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून तब्बल ४ लाख १० हजार ३०४ रुपयांचा राजनिवास गुटखा, जर्दा आणि पाच लाखाची कार असा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास नारेगाव भागात करण्यात आली. विकी सुनील निंबाळकर (३३, या रा. नारेगाव) असे आरोपीचे नाव आहे.

त्याच्याकडून राजनिवास पान मसाल्याचे ४६२ पाकिटे, जाफरानी जर्दाचे ४५० पाकिटे आणि कार (एमएच-१२-जेएम-२९१६) असा ६ लाख १० हजार ३०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी ज्योत्सना जाधव यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 106 - Phulambri**

**Name of the candidate : ANURADHA ATUL CHAVAN**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | **Criminal antecedents** | | |
| 1. | a. | Nature of the offences | FIR No.141/2023, u/s. 143, 427 of IPC, Sec. 3 the prevention of damages of Public Property Act, 135 of Maharashtra Police Act with M.CIDCO Police Station |
| | b. | Case no. | RCC No.1455/2023 |
| | c. | Name of the Court | 5th JMFC Court, Aurangabad. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | Yes |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | Nil |
| 2. | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Anuradha Atul Chavan** is Senior Social Worker. She has very strong administrative capacity. Looking at her experience she has been chosen. |
| 3. | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 106 - Phulambri**

**Name of the candidate : ANURADHA ATUL CHAVAN** .................... and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Date : 27/10/2024**
**Place : Mumbai**

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# दिवाळीनंतर निवडणूक; मतदारांची करमणूक!

**दखल**

प्रा. अशोक ढगे

निवडणूक आयोगाने आणि सर्वोच्च न्यायालयाने आदर्श आचारसंहितेची कितीही अपेक्षा केली असली आणि रेवडी संस्कृतीला आळा घालण्याची कितीही भाषा केली, तरी प्रत्यक्षात निवडणूक आचारसंहितेची 'ऐसी की तैसी' होत असते. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या खर्चात निवडणूक लढवून ती जिंकणारा अपवादात्मकच म्हणावा लागेल. निवडणूक जाहीर होण्याच्या अगोदरपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांना कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागतो. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या खर्चाची मर्यादा विचारात घेतल्यास हा खर्च कितीतरी जास्त असतो. अतिशय चुरशीच्या लढती असणाऱ्या मतदारसंघात विजयासाठी एक एक मत महत्त्वाचे असते. त्यामुळे उमेदवाराचे कार्यकर्ते मतदानाच्या काही दिवस अगोदरपासून आपल्या विधानसभा मतदारसंघातल्या पण बाहेरगावी राहात असलेल्या मतदारांना निवडणुकीसाठी आणायचे नियोजन करत असतात. त्यासाठी लागणारी वाहन व्यवस्था आणि प्रवासादरम्यान त्यांच्या भोजन व अन्य व्यवस्थाही उमेदवाराच्या खर्चातूनच केली जात असते, हे आता उघड सत्य आहे.

विशेषतः विविध कामांनिमित्त उत्तर महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेलेल्या आणि तिथेच स्थायिक झालेल्या मतदारांना आणण्याची जशी व्यवस्था करावी लागते, तशीच व्यवस्था कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतून कर्नाटक, आंध्र, तेलंगणा आदी राज्यांत वेगवेगळ्या व्यवसाय किंवा कामानिमित्त गेलेल्या मतदारांना आणण्यासाठी करावी लागते. त्याचबरोबर मराठवाडा, विदर्भ आणि नगर या भागामधून पुण्यात रोजगारानिमित्त स्थायिक असलेल्या मतदारांना आपापल्या मतदारसंघामध्ये नेण्याची व्यवस्था करणे, हे एक कुशल निवडणूक व्यवस्थापन असते. काही मतदारसंघातील विजयासाठी उमेदवारांना नवी मुंबई आणि मुंबईमध्ये जाऊन सभा घ्यावी लागते आणि मतदार मंडळींना आणण्याची व्यवस्थाही करावी लागते. कल्याण परिसरातही जामखेड, नेवासे, पाथर्डी, शेवगाव आदी भागांतून मोठ्या प्रमाणात लोक कामानिमित्त स्थायिक झालेले असतात; परंतु त्यांची नावे संबंधित विधानसभा मतदारसंघात तशीच असतात. त्यांनाही आणण्याची व्यवस्था करावी लागते.

निवडणुकीच्या काळात दिवाळी आली तर या काळात मतदारांना काय काय देऊ, कुठे ठेवू असे उमेदवारांना होऊन जाते. पूर्वीच्या काळी तरी सुशिक्षित आणि उच्चभ्रू वर्ग उमेदवारांकडून मतदानाच्या काळात पैशाची अपेक्षा करत नव्हता; परंतु अलिकडच्या काळात मतदानाचा 'दर' मोठ्या प्रमाणात वाढल्याने आता हे पैसे सोडायचे तरी कशासाठी, अशी मतदारांची मानसिकता झाली आहे. लोकशाही व्यवस्थेसाठी हे चांगले नसले, तरी आता सर्वच उमेदवार आणि राजकीय पक्ष मतदारांना लुभावणाऱ्या अनेक गोष्टी करतात. कोणताही प्रतिस्पर्धी उमेदवार अशा पद्धतींना विरोध केला आणि मतदारांना आपल्यामुळे काही मिळाले नाही, तर त्याची नाराजी होऊन आपल्याला फटका बसायचा, या मानसिकतेतून मौन बाळगणे पसंत करतो. उलट जाहीर समारंभांमधून विरोधकांचे पैसे घ्या, मद्य घ्या; परंतु मतदान आम्हाला करा, असे राजरोसपणे सांगितले जात आहे. अशाच प्रकारच्या शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे उच्च न्यायालयाने शरद पवार यांच्यावर ताशेरे ओढताना यशवंतराव गडाख यांची लोकसभेवरील निवड रद्द केली होती; परंतु आता अशी तक्रार करण्याचे धाडस कुणीच करत नाही. त्याचे कारण आता सर्वांचे पाय चिखलाने माखले आहेत. निवडणूक जाहीर झाल्याच्या अगोदरपासूनच मेजवान्या, प्रचाराबद्दल मिळणारा रोज आणि भेटवस्तू यामुळे कार्यकर्त्यांची आणि मतदारांची चंगळ होत आहे.

अलिकडच्या काळात गृहनिर्माण संस्था उमेदवारांकडून इमारतींना रंग लावून घेण्यापासून अनेक कामे करून घेतात. ही एक प्रकारची लाच असते; परंतु लाच देणारा आणि घेणाराही गुन्हेगार असतो, याचे भानच आता कुणाला राहिलेले नाही. दिवाळीच्या काळात निवडणूक आली की आकाश कंदील, पणत्या, सजावट साहित्य, फटाके, फ्लेक्स बोर्ड आदी प्रकारांना महत्त्व येते. १०-११ लोक एकत्र येऊन एक संघटना स्थापन करतात आणि उमेदवारांकडून त्या बदल्यात वेगवेगळ्या वस्तू लाटतात, असे प्रकारही आढळून येतात. भजनी मंडळांना वेगवेगळे साहित्य दिले जाते.



महिला बचत गटांना वेगवेगळी आमिषे दिली जातात. वेगवेगळे साहित्य भेट दिले जाते असे अनेक प्रकार आता निवडणुकीच्या काळात होत आहेत. दिवाळीमुळे घरोघर पॅकेज देण्याची स्पर्धा लागली आहे. त्यात अभ्यंगस्नानाच्या पॅकेजमध्ये सुगंधी तेल, उटणे, साबण, पणत्या, रांगोळी, आकाशकंदील, अत्तर आणि फटाके आदी गोष्टींचा समावेश असतो. महिला बचत गटांशी संपर्क साधून त्यांच्या याद्या घेऊन संस्थेनुसार महिलांना साड्या किंवा अन्य गोष्टींचे वाटप केले जात असते. निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात प्रत्येक मत आपल्यालाच मिळावे, यासाठी उमेदवार व्यूहरचना करत असतात. त्यासाठी उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते प्रभागनिहाय मतदार यादी घेऊनच बसतात. आपल्या हक्काची मते कोणती, विरोधकांची मते कोणती, विरोधकांच्या मतांपैकी कोणती मते आपल्याला मिळू शकतात, हे समजून घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जाते.

निवडणुकीच्या काळातच देवदर्शनाची टूम निघते. वाऱ्या वाढतात. देवदर्शनाची व्यवस्था आप्तस्वकीयांना उमेदवारच करत असतो. फक्त त्याचे नाव कुठेही पुढे येऊ दिले जात नाही. मतदान मात्र त्यालाच मिळेल, याची तजवीज केली जात असते. निवडणुकीच्या काळात गृहोपयोगी वस्तू आणि पैसे वाटपाचे प्रकार छुप्या पद्धतीने सुरू आहेत. साड्या वाटपाचा प्रकार तर आता प्रत्येक ठिकाणी होत आहे. साड्या वाटताना अनेक ठिकाणी चेंगराचेंगरी झाल्याची उदाहरणे कमी नाहीत. आता मतदारांना भेट देण्याचा आणखी एक नवीन प्रकार उघडकीस आला आहे. मतदारांना दिवाळीसाठीचे पॅकेज आणि खरेदीसाठीचे गिफ्ट व्हाऊचर पाठवले जात आहे. दिवाळी हा समृद्धीचा सण असला, तरी त्यातून राजकीय सुबत्ता साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मतदारांना आकर्षित करणे हा यामागचा हेतू आहे. खुलेआम साड्या आणि मिठाईचे वाटप सुरू झाले आहे. साड्यांच्या दुकानात होत असलेली उलाढाल हे त्याचेच लक्षण आहे. एरवी दिवाळी, लग्नसराई आणि अन्य उत्सवकाळात साड्यांची खरेदी वाढत असते; परंतु निवडणुकीच्या काळात ही खरेदी अधिक होत आहे. आचारसंहिता लागू असतानाही भेटवस्तू, साड्या, मिठाई, कपडे आदी खरेदी करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याला दिवाळी भेट असे गोंडस नाव दिले जाते.

काही महिन्यांपूर्वी नाशिक शिक्षक मतदारसंघातील निवडणूक अतिशय गाजली. या निवडणुकीमध्ये मतदारांना पैठण्या आणि दागिने वाटल्याची खुलेआम चर्चा झाली. केवळ चर्चाच झाली नाही, तर साड्या आणि दागिने वाटणाऱ्या काही जणांना ताब्यात घेण्यात आले; परंतु कोणीही तक्रार करण्याच्या भानगडीत पडले नाही. उलट परस्परांचे कार्यकर्ते कसे सुटतील, याचीच व्यवस्था करण्यात आली.

अलिकडच्या काळात तर महिलांना जशा साड्या दिल्या जातात, तसे पुरुष मतदारांनाही शर्ट-पँट देण्याकडे कल वाढला आहे. दिवाळीच्या निमित्ताने कुणामार्फत तरी भेटवस्तू देणे हे उमेदवारांना अधिक सुरक्षित वाटायला लागले आहे. याशिवाय सहकारी गृहनिर्माण संस्था, वसाहती आणि विविध उत्सव साजरे करण्यासाठी वेगवेगळ्या जाती-धर्माची मंडळे अशा सर्वच घटकांना या ना त्या कारणाने खूश करावे लागते. त्यासाठी प्रलोभन दाखवण्याचे वेगवेगळे प्रकार पुढे आले आहेत. एखाद्या धार्मिक स्थळी सभामंडप उभारून देणे, कमान उभारून देणे यासाठी खर्च केला जातो.

पूर्वी लोक कशाचीही अपेक्षा न करता गावातील प्रमुख व्यक्ती सांगेल त्याला मतदान करत; परंतु आता तशी परिस्थिती राहिली नाही. आता मतदारांना मॅनेज करणारे ठेकेदार तयार झाले आहेत. उमेदवार त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून मोकळे होतात. निवडणूक आता सोपी राहिलेली नाही. विधानसभेच्या निवडणुकीच्या खर्चाची मर्यादा काही लाख असली, तरी प्रत्यक्षात प्रभागाची निवडणूकही आता कोटी खर्चल्याशिवाय होत नाही. त्यामुळे विधानसभेची निवडणूक किती खर्चिक झाली असेल, याचा विचार न केलेलाच बरा. काही ठिकाणी निवडणूक अतिशय चुरशीची असेल तर मतदारांना मोबाईलसारख्या वस्तूही वाटल्या जातात. निवडणूक जितकी छोटी, तितका खर्च अधिक असे समीकरण आता तयार झाले आहे. राजस्थान विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मतदारांना मोफत मोबाईल देण्याची घोषणा करण्यात आली होती. तेलंगणामध्ये तर २२० कोटी रुपयांच्या साड्यांचे वाटप करण्यात आले होते. अर्थात वाटणाऱ्यांपेक्षा घेणारे अधिक दोषी आहेत आणि त्यामुळेच लोकशाहीला खरा धोका आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**विश्लेषण**

अजय तिवारी

# नंदनवनातील सरकारपुढील काटे

गेल्या १० वर्षांनंतर जम्मू-काश्मीर या केंद्रशासित राज्यात ओमर अब्दुल्ला यांचे पहिले सरकार सत्तेवर आले. सहा वर्षांनंतर लोकनियुक्त सरकारच्या हाती कारभार आला. काश्मीर आणि अब्दुल्ला कुटुंबीय यांचे नाते अतूट आहे. अब्दुल्ला कुटुंबातील चौथी पिढी सत्तेत आली आहे. जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत भाजपाचे गणित चुकले आणि मतविभागणीच्या खेळीला खोऱ्यातून साथ मिळाली नाही. पंडित नेहरूंपासून अब्दुल्ला कुटुंबाचे गांधी घराण्याशी चांगले संबंध आहेत; परंतु यावेळी काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांची आघाडी असूनही ओमर आणि राहुल यांची एकही एकत्रित सभा झाली नाही. राहुल आणि ओमर यांच्यात काहीसा दुरावा दिसला. जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर राहुल यांनी फारूक अब्दुल्ला यांचे अभिनंदन केले; परंतु ओमर यांचे नाही. त्यांच्या शपथविधीला राहुल आणि प्रियांका हे बहीण-भाऊ उपस्थित राहिले; परंतु काँग्रेस सत्तेत सहभागी झाली नाही. बाहेरून सरकारला पाठिंबा दिला. काँग्रेसने निवडणुकीसाठी जास्त जागा पदरात पाडून घेतल्या; परंतु त्या निवडून आणण्यासाठी जम्मू भागात भाजपाशी ज्या निकराने लढा देणे अपेक्षित होते, तसा दिला नाही. ओमर यांच्या या बाबतच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. असे असले, तरी खोऱ्यात जनतेने ओमर यांच्यावर विश्वास टाकला. ते स्वतः दोन ठिकाणांहून निवडून आले. आता एका जागेचा राजीनामा देऊन तिथूनही ते नॅशनल कॉन्फरन्सच्या उमेदवाराला निवडून आणतील. मात्र या सरकारची वाटचाल नीट होईल का, याची चर्चा धुरिणांमध्ये आहे.

सहा वर्षे काश्मीरची जनता प्रशासकीय राजवटीत होती. तिच्या आशा-आकांक्षा पूर्ण होत नव्हत्या. आपला लोकप्रतिनिधी सरकारमध्ये नसल्याने एकतर्फी सुरू असलेल्या विकासाला काहीच अर्थ नव्हता; शिवाय केंद्र सरकार रंगवत असलेले काश्मीरच्या विकासाचे चित्र आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थिती यात जमीन-अस्मानाचे अंतर होते. लादलेला विकास जनतेला कधीच मान्य नसतो. गेल्या सहा वर्षांमध्ये काश्मीरमधील दहशतवाद्यांना बऱ्यापैकी अटकाव केला गेला असला, तरी दहशतवाद थांबलेला नाही, ही वस्तुस्थिती उरतेच. गुंतवणुकीचे, विकासाचे आकडेही भ्रामक होते. त्यातच आता ओमर यांनी शपथ घेताना त्यांचे पंख अगोदरच छाटण्यात आले आहेत. उपराज्यपालांना जास्त अधिकार आहेत. त्यामुळे तर शपथग्रहण करताच ओमर यांच्या सरकारने जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याचा ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याचे त्यांनी जाहीर केले. एकीकडे भाजपाने दिलेले पूर्ण राज्याचे आश्वासन पूर्ण केले नाही, म्हणून लडाखमधील सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनू वांगचूक यांनी अगोदर लडाखमध्ये आणि नंतर दिल्लीमध्ये आंदोलन केले. भाजपाने जम्मू-काश्मीरलाही पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. आता केंद्राच्या हाती असलेल्या सत्तेच्या काही दोऱ्या भाजपा सहजासहजी सोडेल का, हा खरा प्रश्न आहे.

मित्रपक्ष म्हणून एकत्र निवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसच्या काही अपेक्षा पूर्ण झाल्या नसल्याने कदाचित सत्तेत सहभाग घेतला नसावा. अवघ्या सहा जागा निवडून आणून उपमुख्यमंत्रिपद आणि काही मलईदार खात्याची अपेक्षा केल्यानंतर ओमर यांनी नकार दिल्यानेच कदाचित राहुल-ओमर दरी रुंदावली असावी. पूर्ण राज्याचा दर्जा मिळेपर्यंत सरकारमध्ये सहभागी होणार नाही, असा पवित्रा काँग्रेसने घेतला आहे. पाच अपक्ष आणि 'आप'च्या एका आमदाराने पाठिंबा दिल्याने नॅशनल कॉन्फरन्सला तशीही काँग्रेसची गरज राहिलेली नाही. ओमर यापूर्वी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री होते; पण त्या वेळी ते मोठे राज्य होते. त्यात लडाखही होता; पण आता जम्मू-काश्मीर आणि लडाख हे वेगळे केंद्रशासित प्रदेश झाले आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा आहे आणि लडाखचे लोक सध्या दिल्लीत सहाव्या शेड्यूलबाबत आंदोलन करत आहेत. दिल्लीतील 'आप' सरकारप्रमाणे ओमर यांना अधिकारांसाठी संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल. आतापर्यंत केलेली



सर्व विधाने पाहता त्यांनी परिपक्वता दाखवली आहे, असे म्हणता येईल; पण सरकार चालवताना जनतेमध्ये जातील, तेव्हा त्यांना जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. अशा परिस्थितीत उपराज्यपालांवर त्यांचा दबाव येईल. उपराज्यपाल केंद्र सरकारच्या हातचे बाहुले असल्याने संघर्षाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

काश्मीरला विकासाच्या वाटेवर न्यायचे असेल, तर उपराज्यपालांनी आता पूर्वीच्या अधिकारांना मुरड घालून लोकनियुक्त सरकारला काम करू देण्याची भूमिका घ्यावी लागेल. अब्दुल्ला यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. याला उत्तर देताना ओमर यांनी त्यांचे आभार व्यक्त करत जम्मू-काश्मीरसाठी त्यांच्यासोबत काम करणार असल्याचे सांगितले. ओमर हे नवीन जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत होते, त्याच दिवशी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर पाकिस्तानच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी त्या देशात उपस्थित होते. शांघाय सहकार्य परिषदेमध्ये त्यांनी कोणत्याही राष्ट्राचे नाव न घेता दहशतवादाविरोधात आवाज उठवला आणि नातेसंबंधांमध्ये विश्वासाची गरज असल्याचे सांगितले. ओमर यांचा शपथविधी होत असताना त्यांची पाकिस्तानमध्ये उपस्थिती असणे, हा एक प्रकारे भारताचा मुत्सद्दी विजय म्हणता येईल. सुषमा स्वराज यांच्यानंतर पाकिस्तानामध्ये जाणारे ते दुसरे परराष्ट्रमंत्री ठरले आहेत. त्यामुळे इतक्या वर्षांनंतर त्यांना या दिवशी पाठवण्यामागे काही सुनियोजित मुत्सद्देगिरी होती का हा निव्वळ योगायोग होता, हे तपासावे लागेल.

ओमर यांनी अनुभवी खेळाडूप्रमाणे आपला संघ बांधला आहे. त्यामध्ये सकिना यट्टू या एका महिला मंत्र्यालाही ठेवण्यात आले आहे. छंबमधून विजयी झालेले काँग्रेसचे बंडखोर उमेदवार सतीश शर्मा यांनाही त्यांनी निवडले आहे. शर्मा यांनी भाजपा उमेदवाराचा सुमारे सात हजार मतांनी पराभव केला. काँग्रेसच्या तिकिटावर येथून निवडणूक लढवणारे ताराचंद हे माजी उपमुख्यमंत्री होते आणि त्यांनी या जागेवरून तीनदा विजय मिळविला होता; मात्र शर्मा यांनी त्यांना तिसऱ्या स्थानावर ढकलले. शर्मा हेदेखील राजकीय कुटुंबातून आले असून त्यांचे वडील मदनलाल शर्मा पूंछमधून दोनदा खासदार राहिले आहेत. ओमर यांनी या एका बाणाने अनेकांवर निशाणा साधला आहे. ओमर यांच्यासह सहा मंत्री मंत्रिमंडळाचा भाग असून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा पराभव करणाऱ्या सुरेंद्र चौधरी यांना विजयाची ट्रॉफी म्हणून उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले आहे. यापूर्वीच्या सरकारांमध्ये जम्मू प्रदेशातून उपमुख्यमंत्री देण्यात आला होता. त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या दोन प्रदेशांमध्ये संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. चौधरी हे डोंगरी भागातले. ओमर यांनी पीर पांजाळ क्षेत्राला मंत्रिमंडळात जास्त प्रतिनिधित्व देऊन त्या भागात स्वतःचा विस्तार करण्याच्या विचाराला चालना दिली आहे. ओमरच्या सरकारमधून काँग्रेसने भाग न घेण्याचे कारण असे असू शकते की, काँग्रेसला आपल्या विजयी आमदारांमधील युद्ध टाळायचे आहे. सध्या काँग्रेस जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याशी जोडत आहे. त्यांनी चार मंत्रिपदे रिक्त ठेवली आहेत. भविष्यात ते तत्कालीन राजकारणानुसार उर्वरित पदे भरण्याची शक्यता आहे.

निवडणुकीदरम्यान, नॅशनल कॉन्फरन्सने जनतेला अनेक आश्वासने दिली होती. त्यापैकी कलम ३७० आणि ३५ अ मागे घेण्यासह १९५३ पूर्वीची परिस्थिती परत आणण्याचेही आश्वासन होते; पण ही सर्व आश्वासने जम्मू-काश्मीरला लवकरात लवकर राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीवर उतरली आहेत. हीदेखील एक सकारात्मक बाजू आहे. सध्याच्या काळात ओमर यांना थोडा वेळ द्यावा आणि उपराज्यपालांनी आता थोडी विश्रांती घ्यावी. जम्मू हा काश्मीरच्या सीमेला लागून असलेला संवेदनशील भाग आहे. केंद्र आणि जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेश सरकारला त्यांच्या राजकीय हितसंबंधांवर उठून केंद्रशासित प्रदेशातील लोकांच्या कल्याणासाठी एकत्र काम करावे लागेल; जेणेकरून या सीमावर्ती भागात सीमापार षडयंत्र रचणाऱ्यांचा पूर्णपणे नायनाट करता येईल. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागणार आहे. लोकसभा आणि राज्यसभेतही ते मंजूर करावे लागेल आणि राष्ट्रपतींकडून अंतिम मंजुरी घ्यावी लागेल. त्यानंतरच अधिकृत अधिसूचना जारी होऊन जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळेल. ओमर यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. परिस्थिती पाहता ओमर यांचा मार्ग सोपा नाही हे स्पष्ट होते. जम्मू-काश्मीरमध्ये टप्प्याटप्प्याने सर्व काही लागू केले जाईल, असे मोदी सरकारने आधीच सांगितले आहे. केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये सीमांकन, राज्यांमध्ये निवडणुका आणि त्याला पूर्ण राज्याचा दर्जा देणे ही तीन उद्दिष्टे समोर ठेवली होती. अर्थात ओमर यांच्या नॅशनल कॉन्फरन्सने निवडणुकीपूर्वी जनतेला दिलेली आश्वासने पाहता हा मार्ग अजिबात सोपा नसेल, असे स्पष्ट दिसते.

## रविवारची पत्रे

### सिंथेटिक ट्रॅकवरच स्पर्धा व्हाव्यात!

दरवर्षी विभागीय व राज्यस्तरीय मैदानी स्पर्धा या विविध जिल्ह्यात घेतल्या जातात. यात महाराष्ट्रातील विविध तालुका व जिल्हास्तरीय खेळाडू सहभाग घेतात. प्रत्येक जिल्ह्यात सिंथेटिक ट्रॅक असतोच असे नाही. म्हणून खेळाडू त्यांच्या जिल्ह्यात उपलब्ध असेल त्या ट्रॅकवर सराव करत असतो. मग तो ट्रॅक मातीचा का असो; त्याच्यावर दररोज सराव चालतो. राज्यस्तरीय स्पर्धा या सिंथेटिक ट्रॅक उपलब्ध असलेल्या जिल्ह्यातच आयोजित कराव्या. कारण जे खेळाडू मातीच्या, मडच्या ट्रॅकवर सराव करतात त्यांना सिंथेटिक ट्रॅकचा अनुभव मिळायला हवा. एखादा खेड्यात जिथे सिंथेटिक ट्रॅक नसतोच, पण तो जिल्हा एका नेत्यांच्या, मंत्र्यांच्या अंमलाखाली असल्यामुळे त्याची मनमानी करून ती व्यक्ती त्यांच्या जिल्ह्यात आयोजित करत असतो; मग तिथे सिंथेटिक ट्रॅक्ट आहे का मातीचा ट्रॅक, याचा त्यांना काहीच फरक पडत नसतो. खेळात राजकारण आणू नका. त्यामुळे आजपर्यंत आपल्या देशात एकही रनर ऑलिम्पिक पदक घेऊन आलेला नाही. बरेच खेळाडू गरीब व एक वेळेस जेवणही नीट न मिळणारे असतात. खेळाच्या माध्यमातून एखादी चांगली नोकरी मिळेल या आशेने येत असतात. त्यासाठी जिवाची पराकाष्ठा करत असतात. आपल्या येथील राजकारणामुळे आजपर्यंत भारत देश स्पोर्ट्समध्ये खूपच मागे आहे. स्पोर्ट्समध्ये अधिकारी हा स्पोर्ट्समधूनच आलेला असावा; जेणेकरून त्याला त्याची किंमत कळेल. खेळाडू स्पर्धेसाठी येताना त्यांचे बरेच हाल होत असतात. एक महिला वयात आलेल्या दोन मुलींना घेऊन शेकडो किलोमीटर अंतर प्रवास करत आली. स्पर्धा शहरापासून लांब तालुक्यात असल्याने स्पर्धेच्या ठिकाणी वेळेवर पोहोचता यावे म्हणून पहाटे ३ वाजता वाहन न भेटल्याने कितीतरी किलोमीटर चालत स्पर्धेच्या ठिकाणी पोहोचतात, हे कितपत सुरक्षित व योग्य आहे, याचा विचार करण्यात यावा. असे कितीतरी हालअपेष्टा सोसून स्पर्धेला येतात. का तर स्पर्धेत येऊन एखादे पदक जिंकून भविष्यात भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी. आता भारतात असे अनेक खेळाडू आहेत, त्यांना योग्य मार्गदर्शन व सहकार्य न मिळाल्याने मागे सरत आहेत. या सर्व बाबींचा विचार करून यापुढील सर्व विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा सिंथेटिक ट्रॅकवरच घेण्यात याव्यात. आंतरराष्ट्रीय धावपटू पी. टी. उषा, भाग्यश्री बिले, वंदना शानबाग यांसारख्या दिग्गज खेळाडू ग्रामीण भागातूनच आलेल्या आहेत. त्यांच्यासारखे अनेक खेळाडू आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी अनेक आव्हाने स्वीकारतात. स्पोर्ट्स इज युनिटी. युनिटी म्हणजे एकता आणि या एकात्मतेचे प्रतीक आपण सारे समूळ विश्वात रुजवू या...

**केशव गुंटूक**/९२२५९२५७७७

### लोकप्रतिनिधी कसा असावा?

आपल्या भारतात लोकसभा, विधानसभा तसेच अगदी गाव पातळीवरील सर्व निवडणुका कुठल्याही अडचणी, अडथळ्यांशिवाय शांततेत पार पडतात. प्रत्येक पक्ष जाहीरनामा, वचननामा, संकल्पनामा जाहीर करून आपले उद्दिष्ट मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करत असतात. पण किती आश्वासनं पूर्ण झाली हा संशोधनाचा विषय राहू शकतो. अनेकदा तर जुन्या जाहीरनाम्यातील अनेक आश्वासनांची पुनरावृत्तीच झालेली दिसून येते. आज प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमे उमेदवारांसाठी प्रचारासाठी उपयुक्त साधन ठरले आहे. निवडणुका आटोपल्यानंतर विजयी झाल्यावर त्या लोकप्रतिनिधीचा मतदारांशी अक्षरशः संपर्क तुटला जातो. उमेदवार आपल्या १५ दिवसांच्या प्रचारात अनेक वेळा मतदारांना भेटतो आणि निवडणूक संपली की मतदारांना पुढील पाच वर्षे आपल्या विजयी प्रतिनिधींच्या घरी किंवा संपर्क कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागतात. याचा अनुभव अनेकांना आला असेलच. लोकप्रतिनिधी भेटले तरी कामं (वैयक्तिक कामं सोडून) होतीलच, याची शाश्वती नसते. भेटीत सकारात्मक भाव आणतील, पण कामं काही होत नाही हाही अनुभव आहे. यात कोणताही लोकप्रतिनिधी किंवा पक्ष सुटला नाही. माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यात मी फक्त एकच लोकप्रतिनिधी असा पाहिला, ज्याचा संपूर्ण पाच वर्षांच्या कार्यकाळात मतदारसंघातील बहुसंख्य मतदारांशी व्यक्तिशः संबंध होता, संपर्क होता. मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीच्या सुखदुःखात सहभागी होत होती. ती व्यक्ती आज हयात जरी नसली, तरी त्यांची आठवण मात्र आजही सर्वांना येते. आजच्या लोकप्रतिनिधींना इतकं जरी शक्य नसलं, तरी महिन्यांत, दोन महिन्यांत एकदा तरी मतदारसंघाचा दौरा काढून मतदारांसाठी, मतदारसंघासाठी काही करता येईल का, याचा प्रयत्न केला पाहिजे. जेणेकरून भविष्यात परत निवडणुकीत सामोरे जावे लागले तर आपले अस्तित्व टिकवून ठेवता येणे शक्य होईल. पण त्यासाठी लोकप्रतिनिधीच्या मनामध्ये मतदाराविषयी आत्मीयता, तळमळ, समाजसेवेची आवड, विकासाची दृष्टी, संपर्क असणे, समाजाचे समाजाला देण्याची वृत्ती असणे आवश्यक आहे. मात्र, आजच्या अनेक लोकप्रतिनिधींमध्ये ती दिसत नाही, हे दुर्दैव म्हणायला हरकत नाही. लोकप्रतिनिधींमध्ये दूरदृष्टीचा अभाव जाणवतो. अशा लोकप्रतिनिधींबाबत मतदारांनी काय करावे? महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. या काळात उमेदवारांचा मतदारांशी जो संपर्क होत आहे तो निवडून आल्यानंतरसुद्धा पुढील पाच वर्षांच्या कार्यकाळात तसाच ठेवून नागरिकांच्या, मतदारसंघातील समस्या सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे निवडून आलेल्या उमेदवाराने करावा तसेच आज जे लोकप्रतिनिधी आहेत तेच जर पुन्हा उमेदवार म्हणून निवडणूक लढवत असेल आणि मागील कार्यकाळात त्यांनी संपर्क ठेवला नसेल, कामं झाली नसतील तर त्यांना मतदारांनी विचारणा करावी. मतदारसंघातील विकासासंबंधी विविध प्रकारांचे प्रश्न विचारत हात जोडून येणाऱ्या माजी लोकप्रतिनिधीला मतदारांनी भंडावून सोडले पाहिजे. मतदारांकडून सामूहिकपणे मतदान व्हायला हवे. त्यामुळे आपला मतदार हा खरोखरच जागरूक आहे, विकासाबाबत मतदारांची तळमळ आहे, हे लक्षात येईल. मतदारांनो, जागे व्हा आणि आपल्या मतदारसंघातल्या विकासाची दृष्टी असलेल्या, देशभक्त असलेल्या, समाजाप्रती प्रेम-आस्था असलेल्यांना आपले लोकप्रतिनिधी म्हणून सभागृहात पाठवा.

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५२

### मी वसुंधरा बोलतेय्...!

मला ओळखलं का? मी वसू....! होय... वसुंधरा...!! तुम्हाला माझा विसरच पडला आहे. बरं का? कधीतरी माझे दुःख, वेदना विचारले तरी का? ज्याप्रमाणे जन्म देणारी माता आपल्या लेकराची काळजी घेते, त्याचप्रमाणे मी सर्वांची काळजी घेते! पण आज तुम्हा सर्वांना माझा विसर झालेला आहे. तुम्ही माझा विचारच करतच नाही. माझी काय अवस्था झाली आहे. मी किती वेदना सहन करीत आहे. वातावरणातील बदलामुळे मला किती झळ सोसावी लागत आहे. माझ्या या अवस्थेला आपणच जबाबदार आहात! अरे मानवा, मला तर निसर्गाने दिलेली देणगी ही अमर्याद आहे. पण या नैसर्गिक देणगीला तूच बदलविण्याचा प्रयत्न केलास! अरे, माझ्या या धरेचा सर्वात हुशार आणि बुद्धिमान म्हणून मानवा तुझीच गणना केली जाते. कारण, विचार करण्याची क्षमता फक्त तुझ्यातच आहे. तू इतर सजीव प्राण्यांपेक्षा विकसित आहेस. तुला बोलता येते. तू आपल्या बुद्धिचातुर्याने सकारात्मक आणि नकारात्मक विचार करू शकतोस, पण, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...' म्हणत झाडे तर लावतोस, त्याची निगा मात्र राखत नाहीस. माझ्यातील नैसर्गिक विविधता तूच नष्ट करीत आलास. मी काहीच करू शकले नाही. अनेक दुर्मिळ झाडांच्या जाती, प्रजाती, प्राणी, पक्ष्यांना नामशेष करीत आहेस तू! मुख्य म्हणजे वृक्षतोड करताना विसरलास की, तुला ज्यामुळे जन्मतः प्राणवायू मिळतो, त्यालाच नष्ट करायला लागलास तू. वृक्ष तुला प्राणवायू देऊन तुझ्यातील कार्बन डाय ऑक्साईड घेतो. तुला जिवंत ठेवतो. आज वृक्षतोडीमुळे माझ्या तापमानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. उष्माघाताचे संकट येत आहे. यामुळे हिमालयातील बर्फ वितळायला लागला आहे, सागरातील पाण्याची पातळी वाढायला लागली आहे. खरं तर आज अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जसे की वायू प्रदूषण, पाणी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, जमिनीचे प्रदूषण... या परिणामाला आमंत्रण तूच तर दिलेले आहेस. 'जागतिक वसुंधरा दिवस' आला की माझी आठवण येते. मानवा, तू कधी निरीक्षण केलंस काय, कधीकाळी सुप्रभातीला विद्युत तारेवर चिमण्यांची रांगच रांग असायची; आता हे दृश्य पाहायलाही मिळत नाही. कावळ्यांची काव काव दुर्लभ झाली. विकासाच्या नावाखाली बुद्धिमान मानवाने माझी हिरवीगार वृक्षे तोडली. डोंगर पोखरून मोठमोठे रस्ते तयार केले. माझ्या मोकळ्या जागेवर कारखाने उभारले आणि त्या कारखान्यातून निघणारा धूर माझे वातावरण दूषित केले. अशुद्ध पाणी, नदी, नाले, ओढ्यात सोडून पाण्यालासुद्धा दूषित केले. हे बुद्धिमान मानवा, किती रे माझी अधोगती करतोस! माझा विनाश थांबव जरा! कुठेतरी अतिवृष्टी होते तर कुठे दुष्काळ पडतो, कुठे ढगफुटी तर कुठे महापुराचे थैमान! ही तर विनाशाची सुरुवातच म्हणावं लागेल.

**ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**/कुरखेडा

### न्यायालयाचे 'ते' दोन निर्णय!

आतापर्यंत कायदा आंधळा असतो म्हणून न्यायदेवतेच्या डोळ्यांवर काळी पट्टी अगदी कालपर्यंत सगळ्यांनीच पाहिली. 'अंधा कानून' नावाचा चित्रपटही येऊन गेला आहे. न्याय प्रक्रिया विलंब लावणारी, आपल्या येथील न्यायप्रक्रियेत न्याय मिळत नाही, असा जणू विघातकी आत्मविश्वास निर्माण केला गेला. त्यामुळे न्यायालयाची पायरी सुज्ञ माणसाने चढू नये, असे म्हटले जायचे. भारतीय संविधानानुसार एक अपराधी सुटला तरी चालेल. पण कोणत्याही निरपराधाला शिक्षा होता कामा नये. याच धोरणानुसार आतंकवादी याकूब मेमनला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली असता त्याच्या वकिलाला म्हणणे मांडता यावे यासाठी पहाटे ३ वाजता सर्वोच्च न्यायालय उघडण्यात आले. त्यानंतर तीन वकिलांच्या बेंचने त्याची फाशीची शिक्षा कायम केली. परंतु एक संधी त्यालाही दिली गेली, हे महत्त्वाचे. भारतीय न्याय प्रक्रिया आंधळी असती तर फाशीची शिक्षा सुनावण्यात आल्याबरोबर त्याला फासावर लटकवले गेले असते. सध्याचे सरकार परिवर्तनशील आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह न्याय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नुकतेच सरकारने ब्रिटिशकालीन आयपीसीमधील अनेक कलमांमध्ये बदल केले. आमच्या येथेही न्याय होतो, हा संदेश देण्यासाठी वर्षानुवर्षे न्यायदेवतेच्या डोळ्यांवर असलेली पट्टी काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे आता उघड्या डोळ्यांनी खरे ते पाहून न्यायदेवता न्याय देणार आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी हटविण्याचे महत्कार्य केल्याबद्दल विद्यमान सरकार, विशेषतः सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. चंद्रचूड यांचे अभिनंदन केले पाहिजे. आता देशाला आणि या देशातील जनतेला न्याय मिळणारच, हा विश्वास या निमित्ताने दृढ झालेला पाहावयास मिळत आहे. नुकतीच एक घटना समोर आली.

एका इसमाने पाकिस्तान जिंदाबादचे नारे दिले. मोहम्मद फैजल खान असे त्या इसमाचे नाव. प्रकरण मध्यप्रदेशातील जबलपूर न्यायालयात गेले. न्यायालयाने सदर इसमाला अफलातून शिक्षा सुनावली. शिक्षा अशी- मोहम्मद फैजल खान याने महिन्याच्या पहिल्या व चौथ्या मंगळवारी संबंधित ठाण्यात हजेरी लावायची आणि भारतीय तिरंगा ध्वजाला २१ वेळा सलामी द्यायची आणि भारत माता की जय म्हणायचे. न्यायालयाचा हा निर्णय योग्य की अयोग्य, यावर अनेक मतमतांतरे होऊ शकतात. भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने भारतमातेशी प्रामाणिक राहिले पाहिजे. हा देश सर्वधर्मसमभाव जपणारा असून प्रत्येक नागरिकाचे रक्षण करण्याची जबाबदारी येथील न्याय प्रक्रियेची आहे आणि ती जबाबदारी येथील न्याय प्रक्रिया प्रामाणिकपणे पार पाडत आहे, याबद्दल कुणी शंका घेऊ शकत नाही. दुसऱ्या एका प्रकरणात कर्नाटक न्यायालयाने निर्णय दिला की, मशीदमध्ये 'जय श्रीराम' म्हणणे गैर नाही. येथे सर्व धर्माचे नागरिक गुण्यागोविंदाने राहतात, असे परिसरात राहणाऱ्या नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे मशीदमध्ये जय श्रीराम म्हणणे गैर नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. दोन्ही निर्णयांवर राजकीय खलबते होतीलच. परंतु न्यायालयाची भूमिका डोळ्यांवरून पट्टी हटविल्याची संकेत देणारी आहे, हे मानणे योग्य होऊ शकते.

**आनंद विनायक मोहरील**/७२१८२०२५०२

### पवार खेळी परास्त करतील नानाभाऊ!

काँग्रेस नेते नानाभाऊ पटोले महाविकास आघाडीतील सर्वपक्षीय पवार टोळीच्या दादागिरीला कंटाळून काँग्रेसचा राजीनामा देणार असल्याचे वृत्त वाचून आश्चर्य वाटले नाही. महायुतीतील सर्वपक्षीय पवार टोळीची अनेक वर्षांपासून चालत आलेली दादागिरी देवेंद्र फडणवीसांनी संपुष्टात आणली. केवळ नानाभाऊच नव्हे तर पवार टोळीच्या जाचाला कंटाळून दिवंगत विलासराव देशमुखांचे चिरंजीव अमित देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, दिवंगत वसंतदादा पाटील यांचे नातू विशाल, पतंगराव कदम यांचे चिरंजीव, विदर्भातील विकास ठाकरे, बबलू देशमुख (आणि हो राजारामबापू पुत्र जयंत पाटील) हे महाआघाडीतून बाहेर पडले तर कुणाला आश्चर्य वाटू नये. नाना पटोले २०१४ मध्ये राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांना पाडून खासदार झाले तेव्हा ते जॉयंट किलर म्हणून देशभर गाजले होते. भाजपामधील पवार टोळीतील काही नेत्यांशी मतभेद झाल्यानंतर थेट खासदारकीचा राजीनामा देत ते भाजपामधून बाहेर पडले होते. २०१९ मध्ये नागपुरातून नितीन गडकरींविरुद्ध काँग्रेसचे उमेदवार बनून त्यांनी चांगली टक्कर दिली होती. २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत आमदार व पवार टोळीने विधानसभा अध्यक्षपदासाठी पृथ्वीराज चव्हाण व अनंतराव धोपटे यांचे चिरंजीव यांना विरोध केला म्हणून तडजोडीचे उमेदवार म्हणून नानाभाऊ विधानसभा अध्यक्ष झाले होते. एकदिवस अचानक पवार टोळीला पत्ता लागू न देता, या पदाचा राजीनामा देत, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले, ते नानाभाऊ आजतागत या पदावर आहेत. लोकसभेतील काँग्रेसच्या यशासाठी (१ ते १३ खासदार) नानाभाऊंचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात पुन्हा स्वबळावर काँग्रेसची सत्ता आणण्याची महत्त्वाकांक्षा जागी झाली व त्या दिशेने त्यांची पावले पडू लागली. (जशी देवेंद्र फडणवीसांची भाजपाला स्वबळावर सत्तेत आणण्याची महत्त्वाकांक्षा २०१४ साली पूर्ण झाली व तो क्रम सुरू ठेवण्यासाठी २०१९ च्या विधानसभेत उद्धव ठाकरेंना सोबत घेत त्यांनी मेहनत घेतली) ही नानाभाऊंची स्वबळीय महत्त्वाकांक्षा व लोकसभेतील त्यांचे खाती पडलेले यश पवार टोळीला सहन होणे शक्यच नव्हते म्हणून ही टोळी काँग्रेसमधील पवार टोळी (आठवा यशोमती ठाकूरांचे, उद्धव मुख्यमंत्री चालतील, हे वक्तव्य) व उद्धव-संजय जोडीला हाताशी धरून नानाभाऊंच्या मार्गात काटे अंथरण्याचे काम करीत आहे. याला न जुमानता आपली राजकीय उंची ते वाढवितच आहेत. ते काँग्रेसमध्येच राहतात की वेगळा पर्याय उभा करतात, हे महत्त्वाचे नाही. पण या निवडणुकीत पवार खेळी परास्त करण्याच्या कामात ते सपाटून भिडले आहेत, हे मात्र खरे.

**अरविंद नळकांडे**/९८९०९७०६२८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बीड उमरगा सिमा भागात आरटीओकडून ४० किलो गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**



उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीड येथे कार्यरत असणारे आरटीओ इन्स्पेक्टर संतोष पाटील व त्यांची टीम यांनी सीमा तपासणी नाका उमरगा येथे वाहन तपासणी दरम्यान ४० किलो गांजा जप्त केला असून सदर व्यक्ती कर्नाटक मधून महाराष्ट्र मध्ये हा गांजा राज्य महामंडळाच्या बसने घेऊन येत असताना पकडला गेला.

दिवाळी व आचारसंहिता यामुळे आरटीओ विभागाच्या परिवहन आयुक्त यांच्या आदेशान्वये आंतरराज्य वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून आचारसंहितेचा भंग तसेच अमली पदार्थांची तस्करी होऊ नये म्हणून विशेष तपासणी मोहीम राबवली जात आहे.या मोहिमेत बीड कार्यालयाचे मोटर वाहन निरीक्षक संतोष पाटील यांनी कर्नाटक मधून महाराष्ट्रात येणाऱ्या बसची तपासणी केली असता एका बस मधून अंदाजे ४० किलो गांजा तस्करी करणाऱ्या संशयित व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडे असणाऱ्या बॅगमध्ये ४० किलो गांजा सापडला.सदर व्यक्तीस पुढील कारवाईसाठी व गुन्हा दाखल करणे करता उमरगा पोलीस स्टेशन येथे ताब्यात देण्यात देण्यात आले आहे.आरोपीचे नाव राम विठोबा हिरवे असून त्याच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आरटीओ कार्यालय तर्फे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे

# जिल्हा रूग्णालयात रक्ताचा तुटवडा

**रक्तदात्यांनी रक्तदान करावे-जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.थोरात**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**



बीड जिल्हा रूग्णालयामध्ये रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत असल्याने रूग्णांना तात्काळ रक्ताची गरज असते. मात्र या तुटवड्यामुळे अनेकांची अडचण होत असल्याने रक्तदात्यांनी, समाजसेवकांनी व स्वयंसेवी संस्थांनी रक्तदानासाठी पुढाकार घेऊन रक्तदान करावे असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी केले आहे.

बीड जिल्हा रूग्णालयामध्ये अनेक प्रकारचे रूग्ण उपचार घेत असतात त्यांना बऱ्याच वेळा रक्ताची गरज पडते. मात्र अलिकडे जिल्हा रूग्णालयामध्ये रक्ताचा तुटवडा असल्याने समस्या निर्माण होत आहेत. यासाठी रक्तदात्यानी व स्वयंसेवी संस्थांनी पुढे येऊन मोठ्या प्रमाणात रक्तदानाचे कॅम्प घेऊन रक्त तुटवडा कमी करून रूग्णांचे प्राण वाचवावे असे आवाहन डॉ.थोरात यांनी केले आहे.

# मनोज जरांगे यांची महिला भगिनींनी घेतली भेट

**बीड मधून राजेंद्र मस्के यांना उमेदवारी द्या**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**

बीड विधानसभा मतदार संघ निवडणुकीत मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांना उमेदवारी देण्यात यावी. यासाठी बीड शहरातील घरेलू महिला कामगार संघटनेच्या शिष्टमंडळाने अंतरवली येथे भेट घेऊन, उमेदवारीची मागणी केली आहे.

बीड मधून राजेंद्र मस्के यांनी निवडणूक लढवण्यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली असून, त्यांना निवडणूक लढवण्याची संधी पाटलांनी द्यावी. अशी मनोमन इच्छा बीड मतदार संघातील सामान्य जनतेतून उमटू लागली आहे. राजेंद्र मस्के नेहमी जनसेवेच्या बळावर राजकारण करतात. सर्व जाती, धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन काम करण्याची सवय यामुळे जनसंपर्क दांडगा आहे. बीड शहरातील हजारो घरेलू महिला कामगारांसाठी पुढाकार घेऊन, त्यांच्या न्याय हक्कासाठी झटतात. शासनाच्या विविध योजना मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना लाभासाठी मोफत सुविधा केंद्र उभारून मदत केली. शेतकरी व गोरगरीबांच्या कल्याणसाठी त्यांचा पुढाकार नेहमी असतो. जनतेच्या कामी पडणाऱ्या माणसाला आमदार करणे आवश्यक आहे. संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी राजेंद्र मस्के यांना उमेदवारी देऊन गोरगरीबांची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनंती महिला भगिनींनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे भेट घेऊन केली आहे.आज सोमवार रोजी शेतकरी मित्र राजेंद्र मस्के सकाळी ११.३० वा. अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# मोटार सायकल चोरी करणारा आरोपी पकडून चार मोटार सायकल केल्या जप्त

**दोन गुन्हे आले उघड;स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**

पोलीस अधीक्षक बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहेत. त्यावरून उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिले. त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा,बीड येथील पोलीस हवालदार भागवत शेलार यांना गुप्त बातमी मिळाली की, एक इसम अथर्व सोनवणे याचेकडे चोरुन आणलेली मोटार सायकल असून तो विकण्याच्या तयारीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळताच पो.नि.उस्मान शेख यांनी मार्गदर्शन करुन स्थागुशा पथकास कारवाई करण्याचे आदेश दिले.

दिनांक २६/१०/२०२४ रोजी पोह भागवत शेलार व स्टाफ यांनी संशयीत इसम नामे अथर्व हरिश्चंद्र सोनवणे रा.गिरामनगर बीड याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेजवळ असलेल्या मोटार सायकल बाबत विचारपुस केली असता त्याने माजलगाव येथुन मोटार सायकल चोरी केल्याचे सांगितले. आरोपीजवळ दोन होंडा शाईन, एक युनीकॉर्न व एक पॅशन प्रो असे एकुण चार मोटार सायकल मिळुन आल्या असुन वाहनाचे अभिलेख पडताळणी केल्यानंतर १) पो.स्टे.माजलगाव ग्रामीण गुरनं १३७/२०२४ कलम ३७९ भादंवि मधील होंडा शाईन २) माजलगाव शहर २३०/२०२१ कलम ३७९ भादंवि मधील होंडा शाईन असे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. इतर दोन युनीकॉर्न व पॅशन प्रो चे वाहनाचा मालकाचा शोध चालु आहे. एकुण १,४०,०००/-रु चा मोटार सायकल मुद्देमाल स्थागुशा पथकाने जप्त केला आहे.

सदर आरोपीकडुन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन आरोपी व चार मोटार सायकलचा मुद्देमाल पो.स्टे.माजलगाव ग्रामीण पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास माजलगाव ग्रामीण पो.स्टे.व स्थागुशा बीड करीत आहेत.

सदरची कामगिरी अविनाश बारगाळ पोलीस अधीक्षक,बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोह/भागवत शेलार, युनुस बागवान, देविदास जमदाडे, पोशि/नारायण कोरडे यांनी केलेली आहे.

# शरद पवार गटातून परळीत राजेसाहेब देशमुख तर माजलगावात मोहन जगताप लढणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**



राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी च्या लढती निश्चित होत असून राजकीय पक्षांकडून शेवटच्या उमेदवार याद्या जाहीर होत आहेत.कारण, विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत मंगळवार २९ ऑक्टोबर पर्यंतच आहे.

त्यामुळे, उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी तयारी करण्यास वेळ मिळावा, कार्यकर्ते व पदाधिकारी यांची राजी, नाराजी व बंडखोरी टाळली जावी, म्हणून पक्षांकडून खबरदारी घेतली जात आहे. महाविकास आघाडीमध्ये शिवसेना युबीटी पक्षाने आत्तापर्यंत ८० उमेदवारांची घोषणा केली असून काँग्रेसनेही उमेदवारांच्या नावांच्या ३ याद्या जाहीर केल्या आहेत. तर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षानेदेखील उमेदवारांच्या दोन याद्या यापूर्वीच जाहीर केल्या असून आता तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्या दोन यादीत राष्ट्रवादीने ६७ उमेदवारांची घोषणा केली होती. आता, तिसऱ्या यादीतून उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. परळी विधानसभा मतदारसंघातून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे तर माजलगाव मतदार संघातून मोहनराव जगताप यांचे नाव निश्चित केले गेले आहे. तत्पूर्वी जयंत पाटील यांनी वांद्र रेल्वे स्थानकावर घडलेल्या घटनेवरुन राज्य व केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.

# जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या मूकबधिर विद्यालयात दिवाळी फराळ वाटप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ ऑक्टोबर**



जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील मूकबधिर विद्यालयात सिद्धेश्वर जीनियस इंग्लिश स्कूलच्या वतीने दिवाळी सणाचे औचित्य साधून फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका मिटकरी मॅडम, उपमुख्याध्यापिका अनघा देशमुख मॅडम तसेच स्कूलचे अर्थसमिती चे सदस्य कलंत्री सर व मूकबधिर निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक थळपती व त्यांचा सर्व सहकारी वर्ग उपस्थित होता. यावेळी थळपती यांनी मधील विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या तसेच मुलांना कशा पद्धतीने शिक्षण दिल्या जातं, त्यांच्यासाठी घेतले जाणारे उपक्रम, मुलांमधील विशेष कौशल्ये इत्यादी विषयी माहिती दिली. उपमुख्याध्यापिका अनघा देशमुख मॅडम यांनी मुलाची असलेली शिस्त, त्यांच्यातील नाविन्य याचे भरभरून कौतुक केले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मुलांना दिवाळी फराळाचं वाटप करण्यात आले.

# आज संदीप क्षीरसागर उमेदवारी अर्ज भरणार

**साध्या पद्धतीनेच दाखल करणार अर्ज**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**



बीड विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून आ.संदीप क्षीरसारांच्या नावाची अधिकृत घोषणा होताच दुसर्या दिवशी आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत बैठक घेऊन संवाद साधला. परंतु या बैठकीचे रूपांतर सभेतच झाले. यावेळी, सोमवारी (दि.२८) रोजी साध्या पद्धतीने अर्ज भरण्याचे ठरले आहे. यासोबतच बैठक संपली की आ.क्षीरसागर यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन क्रांतीकारी नेतृत्व मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली.

शनिवारी (दि.२६) रोजी बीड विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून विद्यमान आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांच्या नावाची घोषणा पक्षाच्या वतीने करण्यात आली. त्यानंतर आ.क्षीरसागर यांनी रविवारी (दि.२७) रोजी राष्ट्रवादी भवन येथे मतदारसंघातील कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला. यावेळी उमेदवारी अर्ज भरण्याबाबत चर्चा करण्यात आली. या मध्ये सोमवारी (दि.२८) रोजी साध्या पद्धतीने अर्ज भरण्याचे ठरले आहे. आ.क्षीरसागरांना उमेदवारी मिळाल्याने एकनिष्ठतेचा विजय झाला असून त्यामुळे कार्यकर्ते आणि सामान्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आ.क्षीरसागर यांच्या बैठकीला प्रामुख्याने माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे यांच्यासह बीड विधानसभा मतदारसंघातील पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन दिवसात निर्णय जाहीर करणार-प्रा.टी.पी.मुंडे

**भव्य कार्यकर्ता बैठकीतून घोषणा!**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२७ ऑक्टोबर**



ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा महाराष्ट्राचे ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी दोन दिवसात परळी विधानसभा मतदारसंघ संदर्भात विचार विनिमय करून निर्णय घेणार असल्याची घोषणा केली. आज दिनांक २७ ऑक्टोबर रोजी औद्योगिक वसाहत सभागृह येथे भव्य कार्यकर्ता बैठक संपन्न झाली त्यांनी ही घोषणा केली आहे. सर तुम्ही फक्त निर्णय घ्या आम्ही तुमच्या निर्णयाचे पालन करू अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली तसेच पत्रकारांशी संवाद साधताना महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे नेते आनंदराज आंबेडकर, मा. वामन मेश्राम, प्रकाश अण्णा शेंडगे आदींना सोबत घेऊन आरक्षणवादी आघाडी च्या माध्यमातून महाराष्ट्रातील २८८ मतदार संघातील विधानसभेच्या जागा लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांना मानणारा गावोगावी मोठा वर्ग आहे त्या अनुषंगाने कार्यकर्त्यांची चर्चा करण्यासाठी आणि त्यांची मते जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये परळी विधानसभा निवडणूक प्रा.टी.पी.मुंडे सरांनी लढवावी तर काहींच्या मते विचार विनिमय करून आणि पक्षाच्या कोर कमिटी मध्ये चर्चा करून निर्णय घ्यावा अशी भूमिका मांडली.

त्यावर त्यांनी दोन दिवसांमध्ये विचारविनिमय करूनच निर्णय घेणार असल्याचे जाहीर केले तसेच कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करून निर्णय घेतला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले. गेल्या ३५ वर्षापासून आपण राजकारणामध्ये सक्रिय आहोत तसेच जिथे अन्याय तेथे आपण असे समीकरण तयार झाले आहे. कोणत्याही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी शेतमजूर दलित अल्पसंख्यांक कष्टकरी यांच्या प्रश्नासाठी गेल्या ३५ वर्षापासून आपण लढत आहोत त्यामुळेच आपल्यावर कार्यकर्त्यांचे प्रेम असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. आपण जो निर्णय घेऊ त्यामुळे परळी विधानसभा मतदारसंघाला कलाटणी देणारा असेल असेही त्यांनी सांगितले. यावेळी रफिक कुरेशी, भीमराव मुंडे,विनायक गडदे, कल्याणराव भगत, आप्पाराव पांढरे, सूर्यकांत मुंडे, प्रभू आप्पा तोंडारे,आदीसह कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवा नेते प्रा.विजय मुंडे यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. संदिपान मुंडे यांनी केले.

# माझ्या दहा वर्षाच्या कामाचे मोजमाप करा

**सामान्य माणसाचा तळतळाट लागेल असे वागलो नाही-आ.लक्ष्मण पवार**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑक्टोबर**



मतदारसंघातील रस्ते, पाणी आणि वीज, या तीन महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष देऊन, हे अत्यावश्यक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.दहा वर्षात, ना टक्केवारी घेतली, ना कुणा विरोधकांना जाणीवपूर्वक त्रास दिला. सर्व सामान्य माणसाने दिलेल्या आमदारकीचा उपयोग केवळ मतदारसंघातल्या विकास कामासाठी उपयोगात आणली. कुणाचा ही तळतळाट लागेल, असे एक ही काम मी कधीही केले नाही. त्यामुळे, कार्यकर्त्यांच्या पाठबळावर आणि सर्व सामान्य माणसाच्या पुण्याईवर अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात आहे. आता, मायबाप जनतेनेच न्याय द्यावा, असे भावनिक आवाहन आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केले. दरम्यान, गेवराई मतदारसंघातल्या ग्रामीण भागातील अंधार दूर व्हावा म्हणून, ८८ कोटी रू च्या लाईटच्या योजना मंजुर करून आणल्यात, अशी माहिती ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना दिली. रविवार ता. २७ रोजी गेवराई मतदारसंघात बुथ प्रमुखांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. व्यासपीठावर शामबापु पवार, शिवराज पवार, ज्येष्ठ नेते सुरवसे काका, गंगाधर घुमरे, सतिष पाटील, सुंदर चव्हाण, दुषंत डोगरे, जे.डी. शहा, जान मोहम्मंद बागवान, देविदास फलके, शिवराज पवार, सुशील जवंजाळ, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे,राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, सतिष दाभाडे,यांची उपस्थिति होती.

आमदार पवार म्हणाले की, गेल्या दहा वर्षात गेवराई मतदार संघातील जनतेची सेवा करताना प्रामाणिक प्रयत्न करून ग्रामीण भागातील प्रत्येक गावात विकास कामे केली आहेत. परंतु , राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता मी या राजकारणापासून दूर राहाव म्हणून मी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आपल्या आग्रहाखातर मला पुन्हा या निवडणुकीच्या मैदानात यावे लागले आहे. मागील काळात केलेली विकास कामे प्रामाणिक कार्यकर्ता अन गोरगरीब जनता हीच आपली ताकद असून याच ताकदीच्या जोरावर आपण अपक्ष उमेदवार म्हणून या निवडणुकीच्या मैदानात उतरलो असून येत्या निवडणुकीत पुन्हा एकदा आपण मला संधी देताल असा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला.मी, पक्ष सोडला असला तरी आपल्या तालुक्यातील जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही. गेल्या दहा वर्षात आपण तालुक्यातील गावागावात विकासाची कामे केली. आज तालुक्यातील असे एकही गाव नाही जिथे आपले विकास काम नाही आणि याच विकास कामाच्या जोरावर आपण पुन्हा एकदा पंडित मुक्तीचा नारा देऊन तुमच्यासाठी या विधानसभा निवडणुकीच्या मैदानात अपक्ष उमेदवार म्हणून उतरत आहे. आपण अपक्ष जरी असलो तरी या मतदार संघातील गोरगरीब मायबाप जनता व आनेक अदृश्य शक्ती आपल्या सोबत आसून हा मतदार संघ आपण कोणाच्या ताब्यात जाऊ देणार नाही म्हणून, आपण सर्वांनी पुन्हा एकदा ताकतीने कामाला लागा विजय आपलाच. असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी प्रकाश सुरवसे,गंगाधर घुमरे, युवा नेते शिवराज पवार, देविदास फलके, शिनुभाऊ बेदरे, जेडी शहा, सतीश पाटील, दुशंत डोंगरे, महेश चेके, ॲड.सुरेश पवार, सुंदर चव्हाण, यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून पुन्हा एकदा आ. लक्ष्मण पवार यांना विधानसभेत पाठवू असा विश्वास दिला. या बैठकीला सर्व पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**गंगाधर घुमरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती**

आ.लक्ष्मण पवार यांनी गेवराई विधानसभेच्या मैदानात अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केल्यानंतर त्यांना मतदार संघातून अनेकांचा पाठिंबा मिळत आहे. आज गेवराई येथे झालेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीत पिंपळनेर सर्कलचे माजी जि.प. उपाध्यक्ष गंगाधर घुमरे यांच्यासह सतीश पाटील, सुंदर चव्हाण यांच्यासह अनेक दिग्गजांची उपस्थिती दिसून आल्याने आ.लक्ष्मण पवार यांची ताकद वाढत असल्याचे दिसत आहे.

**प्रामाणिक कार्यकर्ता हीच अण्णांची ताकद**

तळागाळातील प्रामाणिक कार्यकर्ता आणि गोरगरीब जनता हीच अण्णांची खरी ताकद असल्याने आपल्याला कुठल्या पक्षाची गरज नाही. गेल्या दहा वर्षात मतदार संघातील गावागावात विकासाची गंगा आणण्याच काम अण्णांनी केलं आहे. आणि हे सर्व तुमच्या पाठिंब्यावर झालेलं आहे. कारण या मतदार संघातील सर्व सामान्य गरगरीब जनता व प्रामाणिक कार्यकर्ता हीच अण्णांची ताकद आसल्याचा विश्वास युवा नेते शिवराज पवार यांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिकाऱ्यांनी प्रश्न विचारताच निवडणुक कर्मचाऱ्यांची उडाली भंबेरी

## योग उत्तरे न मिळाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ आक्टोबर**

अभिरूप मतदानावेळी बॅलेट युनीट, कंट्रोल युनीट, व्हीव्हीपॅट बिघडले तर काय कराल? केंद्राध्यक्षांनी कोणकोणती रिपार्टींग करायची? टेस्ट मतदान म्हणजे काय? अशी विविध प्रश्न उपस्थित प्रशिक्षणार्थी केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले असता काही कर्मचाऱ्यांना त्याचे उत्तर देता आले नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी गोयल यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना चांगलेच झापले. कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित प्रशिक्षण घेऊन निवडणुकीचे काम चोखपणे करावे अन्यथा कडक कार्यवाही करण्याचा इशाराही यावेळी गोयल यांनी दिला.

येथील आदर्श महाविद्यालयात दि २७ आक्टोबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या पहिल्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे, सहायक निवडणुक अधिकारी सखाराम मांडवडगे, मास्टर ट्रेनर पंडीत अवचार यांची उपस्थिती होती.

सकाळच्या सत्रात केंद्राध्यक्ष आणि सहायक मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी सहायक निवडणुक अधिकारी सखाराम मांडवगडे यांनी सखोल मार्गदर्शन पीपीटीच्या माध्यमातून दिले. निवडणुक साहीत्य घेतल्यानंतर चेकलिस्टप्रमाणे सर्व निवडणुक साहीत्याची तपासणी करणे, मतदान केंद्रावर आदल्यादिवशी गेल्यानंतर मतदान केंद्र उभारणी करणे तसेच मतदान सुरू होण्याच्या ९० मिनीटे आधी अभिरूप मतदान मतदान प्रतिनिधींच्या समक्ष घेणे, यावेळी बॅलेट युनीट, व्हीव्हीपॅट, कंट्रोल युनीटची जोडणी करतांना काय खबरदारी ध्यावयाची याबाबतही सखोल मार्गदर्शन केले तसेच तीनही घटक कशाप्रकारे सील करायचेत. त्यानंतर प्रत्यक्ष मतदानास सुरूवात करावी. चॅलेंज व्होट, प्रदत्त मतदान, टेस्ट व्होट आदीबाबत सखोल माहीती दिली तसेच आव्हानात्मक परिस्थितीमध्ये कशाप्रकारे केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांनी काम करायचे याचेही सखोल मार्गदर्शन केले.

याशिवाय संविधानिक आणि असंविधानीक लिफाफे कसे भरायचे तसेच मतदान पुर्ण झाल्यानंतर कोणती प्रक्रिया करायची याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर केंद्राध्यक्ष आणि सहायक मतदान अधिकारी यांना ईव्हीएम मशीनची प्रत्यक्ष जोडणी कशाप्रकारे करायची याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

प्रशिक्षणावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांनी प्रशिक्षणाला भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी काही उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रश्न विचारले असता काहींना उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच निवडणुक कामात हलगर्जीपणा केल्यास कठोर कार्यवाही करण्याचा इशारा दिला. तसेच कर्मचाऱ्यांनी व्यवस्थितपणे प्रशिक्षण घेवून निवडणुक प्रक्रिया सुरळीत पार पाडावी असे आवाहनही यावेळी गोयल यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांनीच दिले ईव्हीएम मशीनचे प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ आक्टोबर**

येथील आदर्श महाविद्यालयात रविवारी विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रत्येक खोलीत केंद्राध्यक्ष आणि सहायक मतदान अधिकारी यांना ईव्हीएम मशीन हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येत होते. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी या प्रशिक्षणाला भेट देत स्वत: ईव्हीएम मशीनचे प्रशिक्षण तसेच सखोल माहीती प्रशिक्षणार्थींना दिली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चे पहिले प्रशिक्षण रविवारी घेण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी काही प्रशिक्षणार्थींना प्रश्न विचारले असता त्यांना समाधानकारक उत्तरे देता आले नाहीत. त्यानंतर जिल्हाधिकारी गोयल यांनी सर्व प्रशिक्षणार्थींना ईव्हीएम मशीनचे प्रशिक्षण घेण्याचे आदेश दिले. यासाठी प्रत्येक खोलीत बॅलेट युनीट, ईव्हीएम मशीन तसेच व्हीव्हीपॅट ची व्यवस्था करण्यात आली होती.तसेच प्रत्येक खोलीत केंद्राध्यक्ष आणि सहायक मतदान अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याचे काम चालू असतांना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी पुन्हा या प्रशिक्षणाला भेट दिली. प्रत्येक खोलीत प्रशिक्षण चालू आहे का याची खातरजमा करीत त्यांनी एका खोलीत प्रवेश केला आणि त्याठिकाणी प्रत्यक्ष ईव्हीएम मशीनची माहीती उपस्थित प्रशिक्षणार्थींना देत त्यांच्या समस्यांचे निराकरण करीत ईव्हीएम मशीन कशाप्रकारे जोडायची, सील करायची, अभिरूप मतदान कसे घ्यावयाचे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवत प्रशिक्षणार्थींना पुन्हा काही प्रश्न विचारीत त्यांना योग्य प्रकारे ईव्हीएम मशीनचे प्रशिक्षण घेण्याचे आवाहन केले. यावेळी प्रशिक्षणार्थींनीही प्रतिसाद देत योग्य प्रकारे प्रशिक्षण घेतांना दिसून आले. त्यानंतर प्रत्येक खोलीत जाऊन जिल्हाधिकारी गोयल यांनी प्रशिक्षणाचा आढावा घेतला.

# बासंबा येथे शेतकऱ्यांना किड रोगाबाबत मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ आक्टोबर**



येथील तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या वतीने हिंगोली तालुक्यातील बासंबा व परिसरातील गावात कापूस व हळद पिकांची पाहणी करुन कीड व रोग या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी तोंडापूर कृषि विज्ञान केंद्राचे किटक शास्त्रज्ञ (पिक संरक्षण) अजयकुमार सुगावे यांनी पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी सद्य परिस्थितीत हळद पिकाच्या पानावरील ठिपके (करपा) रोगाची लक्षणे दिसताच बुरशीनाशकाची फवारणीसाठी मॅन्कोझेब (७५ डब्ल्यूपी) २ ते अडीच ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम (५० डब्ल्यूपी) १ ते २ ग्रॅम किंवा प्रोपीकॉनॅझॉल (२५ ईसी) १ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करुन व्यवस्थापन करण्याची शिफारस करण्यात आली.

खोड किडीबाबत पानावर एका ओळी रांगेत छिद्रे पडलेली दिसतात. त्या संदर्भात हळद पिकाबाबत आधीच शिफारशीत किटकनाशकाची फवारणी शेतकऱ्यांनी केली असल्याचे आढळून आले. नव्याने लक्षणे आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस (२५ टक्के) २० मि.ली. प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी, असे मार्गदर्शन केले. कपाशीबाबत पिकात पानावरील ठिपके या रोगासाठी कार्बेन्डाझिम ३.३ ग्रॅम किंवा अक्झोक्सीस्ट्रॉबीन+डायफेनोकोनॅझोल या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. तसेच लाल्या या विक्रृतीसाठी शिफारशीत अन्नद्रव्य मॅग्नेशियम सल्फेट यांची फवारणी सांगितली. तसेच गुलाबी बोंडअळीसाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन संदर्भात संपूर्ण माहिति दिली तसेच यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी तालुका कृषि अधिकारी शिवसंदीप रणखांब, मंडळ कृषि अधिकारी कमलाकर सांगळे, कृषि पर्यवेक्षक गणेश पवार, राजीव हुलेकर, कृषि सहायक रेखा पिंपरे, छाया ठोंबरे, पुजा मकासरे व गावातील सर्व शेतकरी वर्ग उपस्थित होते.



**हिंगोली– दोन दिवसांवर दिवाळी सण आल्यामुळे दिवाळीनिमित्त येथील बाजारपेठेत फटाक्यांची खरेदी करण्यासाठी बच्चेकंपनीसह पालक खरेदीसाठी येत आहेत. तसेच बाजारपेठेत आकर्षक आकाश दिवे विक्रीसाठी आले आहेत. दिवाळीनिमित्त हिंगोलीची बाजारपेठ फुलून गेली आहे. मोबाईल, लॅपटॉप तसेच इतर सामान खरेदीसाठी नागरिक आता बाजारात गर्दी करीत असतांना दिसत आहेत.**

## प्रसार माध्यमांना कळमनुरीत प्रशिक्षण

हिंगोली– विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या निवडणूक कार्यक्रमानुसार हिंगोली जिल्ह्यातील ९३–कळमनुरी विधानसभा मतदार संघासाठी तहसील कार्यालय, कळमनुरी जि.हिंगोली येथे स्थापन करण्यात आलेल्या प्रसार माध्यम कक्षातील अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकारांना आज प्रशिक्षणामध्ये पेड न्यूज व इतर अनुषंगिक बाबींची माहिती देण्यात आली. यावेळी माध्यम व प्रमाणन समितीची रचना, पेड न्यूज, मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक माध्यम, सोशल मिडीया यासाठी जाहिरातीचे प्रमाणन करणे तसेच त्याअनुषंगाने पाठवावयाचे अहवाल व त्यांच्या नमुन्याची माहिती, सोशल मिडिया व मुद्रीत माध्यमातील पेड न्यूज शोधणे व त्यावर कार्यवाही करणे आदी बाबींची माहिती या प्रशिक्षणामध्ये दिली. तसेच पेड न्यूजबाबत वसमत येथील पत्रकारांनाही यावेळी या प्रशिक्षणात जिल्हा माध्यम व प्रमाणन सनियंत्रण समितीचे पथक प्रमुख तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते आणि जिल्हास्तरीय प्रशिक्षण समितीचे दीपक कोकरे यांनी सादरीकरणाद्वारे दिली. यावेळी वसमत विधानसभा प्रसार माध्यम कक्षाचे रविंद्र पुंड, राजेश पांडे, जिल्हास्तरीय माध्यम कक्षातील कैलास लांडगे तसेच कळमनुरी येथील सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# नारायणा इंटरनॅशनल स्कुल बंद करण्याचे शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ आक्टोबर**

शिक्षण विभागाने शहरातील अनधिकृत नारायणा इंटरनॅशनल स्कूल बंद करण्याचे आदेश दि १५ आक्टोबर रोजी दिले असून या शाळेला ९ लाख ४० हजारांचा दंड भरण्याचे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

शहरातील तिरूपती नगर येथे नारायणा इंटरनॅशनल स्कूल सुरू करण्यात आली होती. सदरील शाळा ही अनधिकृतपणे चालू असल्याचे सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी माहीतीच्या अधिकारात उघडकीस आणले. त्यानंतर शिक्षण विभागाने सदरील शाळेला भेट देत पाहणी केली असता सदरील इंग्रजी शाळेला मान्यता व युडायस शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक या कार्यालयाकडून देण्यात आलेले नाही. यासंदर्भात शिक्षण विभागाने शाळा व्यवस्थापनाला वारंवार भेटी देत नोटीस बजावल्या परंतु व्यवस्थापनाने सदरील शाळा सुरूच ठेवली. शिक्षण विभागाच्या आदेशाला केराची टोपली दाखवली. शिक्षण विभागाच्या समितीने शाळेला भेट दिली तसेच शाळा अनधिकृत असल्यामुळे या शाळेत पालकांनी पाल्यांना प्रवेश देऊ नये असे जाहीर आवाहनही केले होते.

परंतु अद्यापही शाळा नियमित सुरू ठेवण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी माहीतीच्या अधिकारात शिक्षण विभागाला जाब विचारला असता शिक्षण विभागाने नारायणा इंटरनॅलशल स्कुलच्या व्यवस्थापनाला १५ आक्टोबर रोजी नोटीस बजावली. परंतु आतापर्यंत या शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय होणार हा अनुत्तरील प्रश्न आहे.

दरम्यान शिक्षण विभागाने दिलेल्या नोटीसमध्ये अनधिकृतपणे शाळा सुरू ठेवल्यामुळे आरटीई अ‍ॅक्टनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. अनधिकृतपणे शाळा सुरू ठेवल्याबाबत एकलाख रूपयांचा दंड तसेच प्रतिदिन १० हजार याप्रमाणे दंड आकारला असून ऑगस्ट ते आक्टोबर पर्यंत ८४ दिवसांचे ८ लाख ४० हजार रूपये आणि पूर्वीची दंडात्मक १ लाख रूपये असे एकूण ९ लाख ४० हजार भरण्याचे आदेशात नमुद करण्यात आले आहे. तसेच अनधिकृतपणे सुरू असलेली शाळा तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. की. अर्ज क्र.२४४/२०२४
पुढील तारिख १६–११–२४

अर्जदार : १) श्रीमती उषाबाई भ्र. अर्जुन चव्हाण, वय ७४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद.. २) श्री. अंबालाल पिता अर्जुन चव्हाण वय ३५ वर्षे, धंदा–शेती, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद.. ३) श्री. रविंद्र पिता अर्जुन चव्हाण वय ३४ वर्षे, धंदा–शेती, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४) श्री. जितेंद्र पिता अर्जुन चव्हाण वय ३३ वर्षे, धंदा–शेती, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५) श्री. अशोक पिता अर्जुन चव्हाण वय ३० वर्षे, धंदा–शेती, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ६) श्री. साजन पिता अर्जुन चव्हाण वय २१ वर्षे, धंदा–शेती, रा. शिवतांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ७) सौ. सविताबाई भ्र. अरुण राठोड वय ३१ वर्षे, धंदा–शेती, रा. पळसवाडी तांडा, ता. जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे: जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अ‍ॅड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं १ ही मयताची पत्नी आसुन अर्जदार क्रं २ते ७ मयताचे मुलं आहेत, मयत नामे अर्जुन मानसिंग चव्हाण हे अर्जदार क्रं. १ चे पती होते व अर्जदार क्र २ ते ७ चे वडिल होते ते दिनांक १९/०७/ २०२४ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्रं. १ते ७ हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक. १/१०/२०२४

आदेशावरून

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्हि. एन. काटकर दिवाणी न्यायाधीश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि. की. अर्ज क्र. २७८/२०२४
पुढील तारिख १०/१२/२०२४

अर्जदार : १–श्री. हरि पिता भावसिंग राठोड वय ७० वर्षे, धंदा–शेती, रा. हरसवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद २–श्री. जवरिलाल पिता भावसिंग राठोड वय५५वर्षे, धंदा–शेती, रा.हरसवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३–सौ.झमुबाई भ्र.थाऊ चव्हाण वय ७५ वर्षे, धंदा–शेती, रा. हरसवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४–सौ. कलाबाई भ्र. काशीनाथ पवार वय ७२ वर्षे, धंदा–शेती, रा.हरसवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५–१) श्री. जगदीश पिता तात्यासलतान पवार वय ३० वर्षे, धंदाशेती, रा. वाघले ता.४०गाव, जि. जळगाव. ५–२) सौ. पिनीबाई भ्र. रविंद्र राठोड वय ४२वर्षे, धंदाशेती, रा. गंगाआश्रम ता. चाळीसगाव, जि. जळगाव. ५–३) सौ. बेबीबाई भ्र. गोरख राठोड वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. मोल्डा तांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार:– : महाराष्ट्र शासन तर्फे: जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज:–

वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अ‍ॅड. अनिल जी. राठोड यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहे. अर्जदार क्रं १ व २ हे मयताचे मुले व ३ ते ५ हे मयताची मुली आहेत, व अर्जदार क्रं. ५–१ हा मयत अर्जदार क्रं. ५ चा मुलगा आहे. व ५(२) व ५ (३) हे मयत अर्जदार क्र.५ ची मुली आहे. मयत नामे भावसिंग सक्नु राठोड हे अर्जदार क्रं. १ ते ५ चे वडिल होते व ते दिनांक २२/०२/ २०१२ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयातून वारस प्रमाणपत्र घेऊन या असे सांगितल्यावरून सदरील प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे. अर्जदार क्रं. १ते ५(३) हे मयताचे वारस असून अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. तसेच वारस प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार त्याआ प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास कुठल्याही स्वरूपाचा उजर अक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून तिस (३०) दिवसांच्या आत आपला उजर आक्षेप असरल्या न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर अक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र वृण्यात येईल त्यानंतर आलेला उजर अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक. २५/१०/२०२४

आदेशावरून

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी स्वयायाधिश क. स्तर कन्नड.

## जाहिर प्रगटन

**मा.व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ, अर्ज. क्र. ३०६/२०२४.
पुढील तारीख ०६/१२/२०२४.

अर्जदार : १. काशीनाथ पिता जालम राठोड, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखेडा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. रमेश पिता जालम राठोड, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. बेलखेडा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ३. सरदार पिता जालम राठोड, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखेडा तांडा, ता. कजड जि. औरंगाबाद. ४. गोरख पिता जालम राठोड, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखेडा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. कावेरीबाई भ्र. विक्रम चव्हाण, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सांगवी, ता. चाळीसगांव जि. जळगांव. ६. निलाबाई भ्र. शंकर पवार, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. वसंत वाडी, बोळे तांडा, ता. पारोळा जि. जळगांव,

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज: बॉम्बे रेग्यूलेशन अ‍ॅक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अ‍ॅड. एस. आर. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत जालम सकू राठोड व मयत ताईबाई भ्र. जालम राठोड यांचे लग्नसंबंधातून झालेले मुले असून अर्जदार क. ५ व ६ हे मयताचे विवाहित मुली आहे. अर्जदार क. १ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत जालम सकू राठोड व मयत ताईबाई भ्र. जालम राठोड यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क. १ ते ६ यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील नामे जालम सकू राठोड हे बेलखेडा ता. कन्नड येथील रहिवाशी होते. मयत जालम सकू राठोड हे दि.१९/११/२०१९ रोजी व अर्जदारांची आई मयत ताईबाई भ्र. जालम राठोड ही दिनांक १४/०२/२०११ रोजी मौजे बेलखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे वृद्धपकाळाने मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांना मयत जालम सकू राठोड यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार के. १ ते ६ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. मयत जालम सकू राठोड हे मौजे बेलखेडा, ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक २०/०९/२०२४ रोजी मौजे बेलखेडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१०/२०२४.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर

## जाहीर नोटीस

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.३२७/२०२४

अर्जदार १) नितीन पि. काशिनाथ चव्हाण, यप. ३० वर्षे, धंदा– शेती, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) विक्रम पि. काशिनाथ चव्हाण, वय ४१ वर्षे, धंदा– शेती,रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) रामेश्वर पि काशिनाथ चव्हाण, वय ३८ वर्षे, चंदा शेती,रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद प्रल्हाद पि. ४) काशिनाथ चव्हाण, वय– २४ वर्षे, धंदा– शेती, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ५) जितेंद्र पि. काशिनाथ चव्हाण, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ६) सोमनाथ पि. काशिनाथ चव्हाण, वय २२ वर्षे, धंदा. शेती, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ७) सचिन पि. काशिनाथ चव्हाण, वय २० वर्षे, धंदा शेती, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ८) सुनिता भ गोरख राठोड, वय. ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. रेल्वे तांडा नायडोंगरी, ता. नांदगाव जि. नाशिक ९) कलाबाई भ. काशिनाथ चव्हाण, वय ७५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. शिवतांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

ज्या अथी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. आर. शिंदे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार क्र. १ ते ७ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. ८ ही त्यांचो बहीन आहे, तसेच अर्जदार क्र. ९ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांचे वडील तसेच अर्जदार क ९ यांचे पतो नामे काशीनाथ सुपड्डू चव्हाण हे होते ते दिनांक ११/०६/२०२४ रोजी मौजे शिवतांडा ता. कन्नड येथे मयत झालेले असुन त्यांचा अंत्यविधी शिवतांडा येथेच झालेला आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच तहसिल कार्यालयात, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, ग्राम पंचायत कार्यालयात, सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन या असे सांगीतल्यावरुन सदर अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ९ हे मयताचे एकमेव वारस असुन अर्जदार क्र. १ ते ९ शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक २५/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२



# स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या तेजी बच्चन



भारतात 'बच्चन' म्हटले की अमिताभ बच्चन हेच नाव कोणाच्याही ओठावर येणार. शतकातील महानायक अशा या अमिताभ बच्चन यांचे वडील हिंदीतील ख्यातनाम साहित्यिक हरिवंशराय बच्चन होते. तेही तितकेच आदरणीय आणि लोकप्रिय व्यक्तिमत्व. नवरा एक प्रथितयश कवी आणि मुलगा चित्रपटातील सुपरस्टार असतानाही तेजी बच्चन यांनी स्वत:ची एक ओळखी निर्माण केली होती, हे विशेष. बहुतांशवेळा भारतीय स्त्रीसाठी तिचे वडील, भाऊ, नवरा, मुलगा हे ओळख बनतात. मात्र, तेजी बच्चन या आदर्श पत्नी, प्रेमळ आई यासोबतच स्वत:ची ओळख बाळगून होत्या. त्या सामजिक कार्यकर्त्या आणि मानसशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून प्रसिद्ध होत्या. कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर त्यांनी आपली ओळख कायम जपली.

तेजी बच्चन यांचे नाव तेजवंत कौर सूरी होते. त्यांचा जन्म ब्रिटिश भारताच्या पंजाब प्रांतात झाला होता. लायलपूरमधील पंजाबी शीख खत्री कुटुंबात १२ ऑगस्ट १९१४ रोजी त्या जन्माला आल्या. सुरुवातीपासूनच त्या अभ्यासात अतिशय हुशार होत्या. तितकीच त्यांना साहित्यातही आवड होती. त्या काळातही त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेत लाहोरमधील खूबचंद डिग्रीज कॉलेजमधून मानसशास्त्राचा अभ्यास केला. सोबतच त्या उत्तम गायिका आणि रंगमंच कलाकारही होत्या. त्या लाहोरच्या कॉलेजमध्ये शिकवण्याचे काम करत असताना त्यांची भेट अलाहाबाद विद्यापीठात इंग्रजी शिकवणाऱ्या हरिवंशराय बच्चन यांच्यासोबत एका सहकारी प्राध्यापकाच्या घरी झाली. त्यावेळी हरिवंशराय विवाहित होते आणि पहिल्या बायकोच्या निधनामुळे खचलेले होते. त्याच दु:खात त्यांनी एक कविता ऐकवली होती. ती कविता ऐकून तेजी यांना अश्रू अनावर झाले आणि त्या रडू लागल्या. तेव्हा त्या मित्राने दोघांना त्याच स्थितीत एकटे सोडले. अवघ्या काही तासात दोघांमध्ये सहवेदनेचा असा बांध निर्माण झाला की तेजी यांनी हरिवंशराय यांचे दु:ख जणू स्वत: अनुभवले होते. दोघांमध्ये भेटीगाठी वाढल्या आणि १९४१ मध्ये दोघांनी अलाहाबादमध्ये लग्न केले. त्यांना दोन मुले झाली. अमिताभ आणि अजिताभ! तेजी बच्चन नेहमी सांगायच्या की, कदाचित त्यांचे दु:ख कमी करण्यासाठीच देवाने आमची भेट घालून दिली होती. त्यावेळी त्यांचे लग्न अलाहाबाद कोर्टात झाले आणि लग्नात त्यांना ८०० रुपये खर्च आला. त्या काळातही त्यांनी अर्धा खर्च वाटून घेतला होता.

### आंतरजातीय विवाह

हरिवंशराय आणि तेजी सूरी यांचा विवाह त्या काळात आंतरजातीय प्रकारातील होता. तेव्हा समाजात या गोष्टींना अतिशय संवेदनशील मानले जायचे. हरिवंशराय जेव्हा तेजी यांना अलाहाबादेत घेऊन आले तेव्हा त्यांना बराच सामाजिक विरोध झेलावा लागला. मात्र, ते आपल्या निर्णयावर ठाम होते. एक मुलगी असूनही तेजी यांनीही अतिशय कणखरपणे या विरोधाचा जोडीदारासह सामना केला. जेव्हा आपला हेतू उदात्त, चांगला आणि पवित्र असतो तेव्हा परमेश्वरही त्यात साथ देतो. त्यावेळी या जोडप्याच्या मदतीला सरोजिनी नायडू धावून आल्या. त्यांनी जाहीरपणे या लग्नाचे कौतुक केले. त्यामुळे, सामाजिक विरोधाची धार बऱ्याच अंशी बोथट झाली. सरोजिनी नायडू यांनी हरिवंशराय आणि तेजी बच्चन यांची थेट पंडित नेहरुंशी भेट घडवून आणली होती. तेव्हा त्यांनी ओळख करून देताना म्हटले होते, हे आहेत कवी आणि ही आहे त्यांची कविता...!

### रणरागिणी होत्या तेजी बच्चन

अमिताभ बच्चन हे नाव संपूर्ण जगाला माहिती आहे. मात्र, या नावाचा इतिहास फारच वेगळा आहे. मुळात, अमिताभ यांच्या जन्मानंतर त्यांचे नाव इन्कलाब ठेवण्यात आले होते. १९४२ मध्ये जेव्हा भारतात मोठे आंदोलन सुरू होते तेव्हा तेजी बच्चन आठ महिन्यांच्या गरोदर होत्या. त्यांच्या घरासमोरून एक मोर्चा गेला आणि त्यांनी ज्या जोशात 'इन्कलाब जिंदाबाद'चे नारे दिले, ते ऐकून आठ महिन्यांच्या गर्भवती असलेल्या तेजी बच्चन हातात लाठी घेऊन रस्त्यावर उतरल्या. हरिवंशराय आणि त्यांचे मित्र घरी आले तेव्हा त्यांना तेजी घरात दिसल्या नाहीत. शोधाशोध केल्यावर या चौकात लाठी घेऊन आवेशात दिसल्या. सर्वांनी त्यांना घरी आणले आणि म्हटले की, तुम्हाला इतका आवेश असेल तर मुलगा झाल्यास त्याचे नाव इन्कलाब ठेवा. मुलाचा जन्म झाला त्या क्षणी ज्येष्ठ कवी सुमित्रानंदन पंत यांनी त्याच्याकडे पाहून 'अमिताभ' नाव सुचवले. त्यामुळे हेच नाव ठेवले आणि या अजोड महानायकाने या नावालाही प्रतिष्ठा मिळवून दिली.

### मुलांवरील संस्कार

तेजी बच्चन दोन्ही मुलांच्या बाबतीत अतिशय संवेदनशील आणि तितक्याच कडक शिस्तीच्या होत्या. एकदा अमिताभ यांनी लहानपणी एका दुकानातून खोडरबर उचलला होता. हे कळताच तेजी बच्चन संतापल्या आणि त्यांनी मुलाला चक्क वेताच्या छडीने झोडपले होते. कितीही छोटी वस्तू असली तरी चोरी ती चोरीच असते, असे त्या म्हणायच्या. आईच्या शिस्तीचा आपल्या मनावर आणि जीवनावर कायम मोठा पगडा असल्याचे अमिताभ नेहमीच सांगतात.

### मुलाच्या चित्रपटात झळकले होते जोडपे

अमिताभ बच्चन यांच्यात अभिनयाचे गुण अर्थातच आई तेजी बच्चन यांच्यामुळेच आले होते. त्यामुळे त्यांनी मुलाच्या या करिअर निवडीला भक्कम पाठिंबा दिला. एवढेच नाही तर हरिवंशराय आणि तेजी बच्चन हे जोडपेही एका चित्रपटात झळकले. अमिताभ बच्चन यांच्या 'कभी कभी' या चित्रपटातील नायिका पूजा हिच्या लग्नाच्या दृश्यात तिचे कन्यादान करताना हे जोडपे दिसले. त्यांना त्यात कोणतेही संवाद नव्हते. मात्र, अमिताभ बच्चन यांच्या चित्रपटात त्यांचे माता-पिताही झळकले होते, ही बाब आजही अनेकांना माहिती नाही.

### तेजी बच्चन आणि इंदिरा गांधी

नेहरू आणि बच्चन कुटुंबातील मैत्री जनजाहीर आहे. मात्र, या मैत्रीची बीजं तेजी बच्चन आणि इंदिरा गांधी यांच्या मैत्रीने पेरली होती. दोघी अतिशय घनिष्ठ मैत्रिणी होत्या. याच मैत्रीचा वारसा अमिताभ आणि राजीव गांधी यांनी पुढे नेला. असे सांगतात की, राजीव गांधींनी जेव्हा सोनिया यांच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा इंदिरा गांधींचे मन वळवण्याचे काम तेजी बच्चन यांनीच केले होते. एवढेच नाही तर, सोनिया गांधी कुटुंबात सून म्हणून येताना लग्नातील सोनियाच्या बाजूचे सर्व विधी बच्चन कुटुंबानेच पार पाडल्या होत्या. अशा या तेजी बच्चन हयात असेपर्यंत त्यांनी घराला बांधून ठेवले आणि पतीच्या प्रत्येक पावलावर समर्थपणे सोबत केली. हरिवंशराय हे 'मधुशाला' कवितेसाठी ख्यात आहेत. मात्र, ही कविता लिहिल्यानंतर त्यांच्यावर प्रचंड टीका झाली. अशा कवितेमुळे युवापिढीत मद्यसेवनाला प्रोत्साहन मिळेल, असा आरोप झाला. मात्र, त्याही वेळी तेजी बच्चन नवऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या. मुलाला चित्रपटात जायचे होते, त्याहीवेळी त्यांनी साथ दिली. त्यामुळेच, हिंदी साहित्याला एक महान कवी आणि सिनेसृष्टीला एक महानायक मिळू शकला. शेवटच्या क्षणी जेव्हा डॉक्टर त्यांना वाचविण्यासाठी आटापिटा करत होते तेव्हा अमिताभ म्हणाले, काहीही करू नका. त्यांना आता या जगात राहायचे नसावे, तेव्हा त्यांना शांतपणे जाऊ द्या. त्यांनी आयुष्यात कोणाला त्रास दिला नाही आता बळजबरीने जगवण्याच्या अट्टहासापायी त्यांना आपल्याकडून त्रास नको. अमिताभ यांनी असे म्हणताच डॉक्टर थांबले आणि एक लांब रेषा आली, यंत्रातून आवाज आला...शांत झाला. सोबतच तेजी बच्चन नावाचे महापर्वही शांत झाले. बच्चन पिता-पुत्र या विभूतीसाठी म्हणत असतील.

**तू चाँद और मैं सितारा होता,**
**आसमान में एक आशियाना हमारा होता**
**लोग तुम्हे दूर से देखते,**
**नजदीक से देखने का हक बस हमारा होता...**

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/ ७८२१८१६४८५

# गुणकारी काटे कोहळा

आपल्या आहारातील सर्वच फुले, फळे, भाज्या, शेंगा, पानं गुणकारी आहेत. कारण, त्यांची वाढ निसर्गाच्या सान्निध्यात होत असते. त्यावर कोणत्याही कीटकनाशकांची किंवा रासायानिक पोषक औषधांची फवारणी केली जात नाही. आरोग्यासाठी लाभदायक ठरणाऱ्या या वनस्पतींना गावखेड्यात झाडपत्ती औषधी म्हणून ओळखले जाते. त्यांचे महत्त्व आणि उपाय जाणून आहारात समावेश केला जातो. असेच एक विशेष फळ म्हणजे झाडीबोलीतील काटे कोहळं किंवा काटा कोहरा! सोबतच, गोड भोपळ्यालासुद्धा झाडीबोलीत कोहरा नावाने ओळखले जाते. गावखेड्यात ओसाड जागी या फळाचे वेल दिसून येतात. आदिवासी कंवर समाज या फळाचा आहारात जास्त प्रमाणात समावेश करतो.



काटे कोहळ्याची कोणीही लागवड करत नाही. काटे कोहळा शेणखताच्या ढिगावर जास्त प्रमाणात आढळतो. त्याचा वेल प्रमाणात पसरलेला असतो. त्याची पानं दोडक्याच्या पानासारखे दिसत असले तरी, आकाराने लहान असतात. या वेलाला पिवळी फुले येतात. फुले गळून धरणाऱ्या फळाचा रंग पांढराशुभ्र असतो. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात काटे कोहळे लागलेले दिसतात. त्याचे वेल सुकेपर्यंत फळाला तोडत नाहीत. विशेष म्हणजे काटे कोहळे हे एक टिकाऊ फळ आहे. वेल सुकल्यावर कोहळ्याला तोडून व्यवस्थित जपून ठेवतात.

फळाला चिरून आतला गर काढून घेतात. तो गरसुद्धा पांढराशुभ्र असतो. त्यात उडदाची भिजवलेली डाळ बारीक वाटून टाकतात. मध्यम आकाराचे वडे टाकले जातात. या वड्यांची भाजी चविष्ट लागते. त्याचप्रमाणे, गराला पिळून घेतल्यावरचे पाणी अतिशय गुणकारी असते. बैलाच्या गळ्यातील हे पाणी प्यायल्याने बैल बरा होतो, असे जाणकार सांगतात. एवढेच नाही तर गराला बारीक करून, त्यात साखर, विलायची घालून बर्फी बनवतात. उष्ण प्रवृत्तीचा काटे कोहळा आरोग्यासाठी लाभदायक असून, त्यात भरपूर जीवनसत्वे आहेत. विशेष म्हणजे या फळाचा पांढरा रंग हाताला लागतो. हा रंगाने भरलेला हात डोक्याच्या केसांना लागलं तरी केस पिकतात. म्हणून, थोडी सावधगिरी बाळगली जाते व काटे कोहळा तोडल्यावर लगेच हात धुतात. अलिकडे मात्र हा दिसेनासा होत आहे. आदिवासी कुटूंबामध्ये आवर्जून त्या फळाच्या वड्यांचा भाजीत समावेश करतात. एका वेलाला पन्नास ते साठ काटे कोहळे लागलेले दिसत पण, आज त्याला शोधायला जावे लागते ही खरी शोकांतिका आहे.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# बाय बाय इडियट बॉक्स...



टेलिव्हिजन आता काही नवीन राहिला नाही. तो बहुदा एका कोपऱ्यात सुरू असतो आणि त्याच्याकडे फारसं कुणाचं लक्ष नसते. या टीव्हीने आजवर सगळ्यांना बसवून ठेवले होते पण, आता वस्तूंच्या भाऊगर्दीत टीव्हीला कुठे बसवावे? हा प्रश्न भेडसावू लागलाय ! चालत्या बसमध्ये टीव्ही ही कल्पना खूपच अद्भुत होती. पण, तेही नाविन्य ओसरले. त्याचे दिवाणखान्यातील एकमेव स्थान राहिले नसून, माजघरात, लॉफ्टवर, वऱ्हांड्यात, कारमध्ये, पानटपरी, वेटिंग रूम, रिसेप्शन काऊंटर, सलून, ब्युटी पार्लर, संगणक, लॅपटापवर कुठेही एका दर्शनी कोपऱ्यात सतत वाजणारं एक खेळणं झालंय.

कारण, आता एकूणच परंपरा आणि मापदंड बदलले. दिवाणखान्यात झोकात विराजमान टीव्ही बेडरूममध्ये कधी शिफ्ट झाला? हे त्याचं त्यालाच बिचाऱ्याला कळलं नसावं. कृष्णधवल रूप जाऊन इस्टमन कलर आल्यापासून, जरा जास्तच भाव खाऊ लागला होता. पण, कालौघात आता एलसीडी, एलइडी असे भिंतीला टांगणीच्या अवस्थेत विविध अवतार धारण करून, अगदी मोबाईलच्या चिंचोळ्या जागेतही टीव्ही अंकल आपला संसार थाटू लागलेय. बघा! अरेरे....कोण होतास तू काय झालास तू !

टीव्ही संगे उदरं भरणम् ... जेवताना टीव्ही बघण्यात काही गैर नसून, तो वेळेचा सदुपयोग आहे, असा गोड (गैर)समज करून घेतलेला एक वर्ग आहे. मला कधीकधी गमतीनं म्हणावसं वाटतं की, या मंडळींनी पोटाला एक झिप बसवून घ्यावी आणि सकाळ-संध्याकाळ खाणे लोड करून झिप बंद करत जावी. काय पण नामी युक्ती आहे ना? मुळात बाल असो वा प्रौढ जेवण करताना कधीच टीव्ही बघू नये. जेवताना चर्चा बोलणेसुद्धा करू नये, असं पूर्वसुरी सांगत आले आहेत. जेवण ही निव्वळ अन्न पोटात ढकलण्याची रांगडी प्रक्रीया नसून,'जाणिजे यज्ञकर्म' अशीच आपली संस्कृती आहे. जेवताना एकेक घास पद्धतशीर चावून, चव घेऊन खाला तर ते जेवण आनंददायी आणि पुष्टीवर्धक ठरेल. अन्यथा, ती एक यांत्रिक क्रिया ठरून त्यातून स्थूलता आणि तत्सम अन्य रोगविकार निर्माण होण्याची शक्यताच अधिक! एकीकडे जेवताना, दुसरीकडे टीव्ही किंवा मोबाईल सुरू करणे ही सवय एक विकृती आहे. तेव्हा हा धोक्याचा कंदील ओळखून आजपासून टीव्ही संगे उदारम भरणं नकोच !

अल्पावधीत अधिकधिक कामाचा उरक, खायला फुरसत नाही, पाणी प्यायला सवड नाहीये. परिणामी माणूस एक वर्कोहोलिक मशीन होतोय. नाश्ता जेवण करताना समोर टीव्ही, मोबाईल किंवा दोन्ही परिणामी जेवणाकडे लक्ष नसणे. किती खाऊन झाले, याचे भान नसणे. घरीही तेच आणि ऑफिसमध्येही तेच आणि यामुळे लहान मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढत चालले आहे. ज्याच्यासाठी सारा आटापिटा, ते जेवण जेवायलाच वेळ नाही काय? जेवायला चला... अशी हाळी पण ऐकू येत नाही. मोठ्या हुशारीने आपण हॉटेलमध्ये टेबल मॅनर्स पाळतो. पण, पूर्वसुरींनी सांगितलेले भोजनाचे नियम उदा. जेवताना शांतचित्ताने, घाईघाईने जेवू नये, घास बत्तीस वेळा चावून, अन्य चर्चा न करता, जास्त बोलू नये, खाली बसून गरम जेवण घ्यावे, दिवसाकाठी केवळ दोनदा, पोटात हवा आणि पाण्यासाठी जागा ठेवून, सावकाश जेवणे वगैरे सोयीस्करपणे विसरतो. कादंबरी वाचनात दंग असताना जेवणाची वेळ आली तर, जेवता जेवता वाचण्याची पूर्वीची पद्धत आजच्या टीव्ही बघत जेवणाशी समांतर भासते. तेव्हा जेवताना पुस्तक वाचू नये, असा दंडक होता.

आता टीव्हीसमोर सोफ्यावर बसून जेवणे, दरम्यान मोबाईल कान आणि खांदा यामध्ये धरून बोलणे किंवा समोर ठेवून व्हिडीओ बघणे, वेळ कमी असेल तर घाईघाईने, उभ्याने बोकणे भरणे, प्रसंगी फ्रिमध्ये ठेवलेले थंडगार अन्न किंवा पॅकेट फूड खाऊन वेळ मारून नेणे अशी नवीन टूम झालीय. पूर्वीच्या नाटकांची जागा ज्याप्रमाणे सिनेमाने घेतली त्याप्रमाणे रेडीओची जागा टीव्हीने घेतली, असं म्हणणं वावगं ठरू नये. कारण, जे आपण आजवर केवळ ऐकू शकत होतो, ते आता बघू शकतो ही कल्पनाच अद्भुत होती.

अंदाजे १९८० च्या काळात या टीव्ही बाळाचं नागपुरात आगमन झालं. नूतन बालकाचं व्हावं, तसं कौतुकही बहु झालं. प्रारंभी तुरळक घरी असणाऱ्या या टीव्हीचं लोण घराघरात कधी पोहचलं ते कळलंच नाही. बाजूच्या घरी टीव्ही सुरू झाला की, शेजारी हक्काने येऊन बसत. अनोळखी लोकही आधी हलकेच खिडकीतून डोकावून बघता बघता नंतर हळूच सोफ्यावर येत. पण, ते दृश्य फार कमी काळ टिकलं.

देखण्या लाकडी शटरचा टीव्ही दर्शनी कोपऱ्यात तिरकस ठेवणे, नंतर कृष्णधवल टीव्हीवर तिरंगी स्क्रीन लावून कलर इफेक्ट आणणे, टीव्हीवर मुंग्या दिसू लागल्या की, एन्टीना गच्चीवर जाऊन सेट करणे, हे मोठे सुखाचे सोहळे होते. तेव्हा मोजकेच टीव्ही ब्रॅण्ड होते. त्यातही, काही ब्रॅण्ड प्रतिष्ठेचा बुरखा पांघरून विलक्षण भाव खाऊन होते. दिवसभरातली ताजी दृश्ये दाखवणाऱ्या टीव्हीवरच्या सायंकालीन बातम्या, जाहिराती, मनोवेधक टायटल साँग असलेल्या धारावाहिकांचे वेळापत्रक, हा सगळा कौतुकाचा मामला होता. दुसऱ्या दिवशीसाठी चर्चेचा विषय होता. पण, कालौघात तात्कालीक टिप्पण्या, ताशेरे सारे मागे पडले.

लोकरुचीची नाडी गवसलेली दूरदर्शन ही एकमेव वाहिनी अतिशय जबाबदारीने प्रसारण करीत असताना, ९० च्या दशकात डिश-एन्टीना, केबल टीव्ही बोकाळला आणि सोबतच विविध वाहिन्या उदयास आल्या. नंतर, विषयवार वाहिन्यांचे पेव फुटले. टुकार वाहिन्यांचा सुकाळ झाला. लोकप्रिय कार्यक्रमांच्या गोड आठवणी हळूहळू विस्मृतीत गेल्या. बैठकीच्या खोलीचे आकर्षण असलेला टीव्ही, कुणी कितीही इडियट बॉक्सची वगैरे हेटाळणी केली तरीही सर्वच सदस्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बघण्यास आणि अमूल्य वेळ खर्च करण्यास भाग पाडायचा. आता तोचतोचपणाचा कंटाळा येऊन अतिरंजित कौटुंबिक सिरीयल्स फॉलो करणं हे जाम बोअरिंग काम! योग्य शब्दात सांगायचं झाल्यास, रिकामटेकड्या मानसिकतेचं लक्षण ठरू पहात आहेत. संगणक आणि मोबाईलचा स्क्रीन दिवसभर बघितल्यावर पुन्हा टीव्हीचा स्क्रीन न्याहाळायचा कोणाला आहे उरक? पूर्वी मुलांच्या परीक्षा सुरू झाल्या की, टीव्हीला टाळं लागे. आता मोबाईलची क्रेझ वरताण होऊन टीव्ही गौण होतोय.

टीव्ही बघणे हा टाईमपास म्हणावा की टाईमवेस्ट? या प्रश्नावर मुलभूत चिंतन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. बौद्धिकवर्ग विशेष कारणांशिवाय टीव्ही बघणे टाळत असतो. यात वेळेचा अपव्यय निर्मितीक्षम सृजनशील सुशिक्षिताला परवडणारी नाही. इतर कामं करताना मधूनच विरंगुळा म्हणून नजर टाकण्यासाठी टीव्हीचा उपयोग होतोय, हे खरं की खोटं?

आता टीव्ही लक्षपूर्वक जर कुणी बघत असेल तर ती बालकं! त्यांना त्या चालत्या बोलत्या चौकोनाचे आकर्षण वाटते. परिणामी अनेक माता किरकिरणाऱ्या बाळाला शांत करण्यासाठी टीव्हीच्या हत्याराचा उपयोग करताना आढळतात. यातूनच कधीतरी पुढे जेवताना समोर टीव्ही असण्याची सवय जडते. ती मोठेपणी पर्यंत टिकून असते.

दुपारी आणि संध्याकाळी काही धारावाहिक मालिका बघणारा महिलावर्ग, पेन्शनर्स किंवा क्रिकेटची मॅच किंवा खमंग राजकीय अथवा सनसनीखेज बातमी आली की टीव्ही सुरू होतो खरा पण, ती पूर्वीची क्रेझ लयाला गेली आहे. गूगलच्या जंजाळात टीव्ही हरवून गेला आहे. बाय बाय इडीयट बॉक्स असं म्हणायची वेळ आलीय की काय ? हातात कायम स्थिरावलेला स्मार्टफोन हा मल्टीयुटीलिटी गटात मोडत असल्याने, भविष्यात मोठे मोबाईल कम टीव्ही येण्याचे दिवस दूर नाहीत. दिवाणखान्यात झगमगणारी टीव्हीची ती चौकट बहुदा टीव्ही बंद असल्याने काळीच दिसणार? परिवर्तन जगाचा नियम आहे हे मान्य ! तरी टीव्ही अंकलला (एकूण वयोमान बघता) बाय बाय करावं लागेल, याची कल्पना तरी कुणी केली असावी काय? दिवाणखान्याचा बादशाह म्हणून ख्यातीप्राप्त इडीयट बॉक्स आता रिटायर्ड होणार की काय ?

## ब्रॅण्ड स्टोरी

निकिता गावंडे/९९७०६६३८१३

# ग्रे शेड हिरो

'घी अगर सिधी उंगली से ना निकला, तो उंगली तेढी करनी पडती है,' बाबा अगदी फिल्मी स्टाईलमध्ये म्हणाले. 'बापरे! आज डायलॉग ने सुरुवात, तेही व्हिलनच्या! बाबा आज नक्की कोणाविषयी सांगणार आहात?' 'अगदी व्हिलन नाही पण जरा ग्रे शेड कॅरेक्टरविषयी बोलणार आहोत आपण! साहिल, जगात तऱ्हेतऱ्हेची माणसं असतात. काही नाकासमोर चालणारी, आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेणारी तर, काही स्वत:च्या मर्जीनुसार परिस्थिती बदलण्याची ताकद दाखवणारी! काही अंथरुण पाहून पाय पसरणारी तर, काही मोठ्या अंथरुणासाठी कुठल्याही थराला जाणारी! सिनेमात मोठमोठी व्यापारी कुटूंब दाखवतात. सरळमार्गी, पापभीरू अशा कुटुंबात असे एखादे रत्न निपजते की, जे आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी लाच देणे, ब्लॅकमेलिंग, गुंडगिरी अशा आडवळणांचाही उपयोग करते. हल्दीरामजींच्या कुटुंबात एक असेच पात्र होते, ते म्हणजे त्यांचा लहान मुलगा रामेश्वरलाल यांचा पुत्र, अर्थात हल्दीरामजींचा नातू प्रभूशंकर अग्रवाल! कायद्याला धाब्यावर बसवणारा, पाहिजे ते मिळवणारा, बाय हूक ऑर क्रूक स्वभावाचा प्रभूशंकर म्हणजे असेच फिल्मी कहाण्यांमधील ग्रे शेड पात्र होते.




प्रभूशंकर यांचा जन्म कोलकाता येथे वर्ष १९५९ मध्ये झाला. १९७० च्या आसपास प्रभू धंद्यात मदत करण्यासाठी दुकानात येऊ लागला. धंद्यात लागणारी सर्व कौशल्ये त्याने पिता रामेश्वरलाल यांच्याकडून आत्मसात केली. मसाल्याची ओळख, त्याच्या विशिष्ट चवीचा परिचय आणि उरल्यासुरल्या पदार्थांमध्ये एखादा स्पेशल मसाला टाकून काहीतरी चमचमीत तयार करण्याची कला तर त्याच्या रक्तातच होती. शिक्षण म्हणाल तर ढक्कलगाडी कशीबशी बारावीच्या स्टेशनला लागलेली! दरवर्षी पहिला नंबर पक्का होता पण तो शेवटून! वर्गात लक्ष अपवादानेच दिले पण हिंदी शिक्षक प्रा.आर.डी. यांचे एक वाक्य मात्र पक्के लक्षात ठेवले आणि तेच जीवन ध्येय बनवले. ते म्हणजे कष्ट करणारी व्यक्ती कधीच नुकसानात नसते. कधी ना कधी त्याला आपल्या कष्टाचा मोबदला मिळतोच. करिअरची सुरुवात त्याने दुकानातील कॅश काऊंटरवर काम करण्यापासून केली. गणितात गुण मिळत नसले तरी आकड्यांचे गणित मात्र डोक्यात पक्के होते. धंद्यातील बारकावे हळूहळू आत्मसात केले. हा जातीचा खवय्या होता. वडील रामेश्वरलाल म्हणायचे की, पदार्थांची चव घेऊन त्यातील सामग्री ओळखण्यात याचा हात धरणारा अग्रवाल परिवारात दुसरा कोणी नाही. 'जसं आपली आजी फोडणीच्या निव्वळ सुगंधावरून त्यात मीठ घातलं की नाही हे ओळखते तसं,' साहिल कौतुकाने म्हणाला.'अगदी बरोबर! तो निव्वळ पदार्थांच्या चवीवरून तो पदार्थ फल्ली म्हणजे शेंगदाणा तेलातील आहे की सोयाबीन तेलातील हे सांगत असे.' 'बापरे! याला काय देवी अन्नपूर्णेचा आशिर्वाद वगैरे होता की काय?' नयना हसत म्हणाली. 'नक्कीच, बंगाली लोकांच्या आवडीनिवडी, चवी यांची त्याला सखोल माहिती होती. तो आपल्या कामात अगदी परफेक्शनिस्ट होता. अगदी थंड डोक्याने काम करणारा होता. कामाचा ताण आलेला, चिडलेला असा तो कधीच दिसला नाही. स्वप्नांचे म्हणाल तर जमिनीवरील स्वप्न बघणे त्याला कधीच मान्य नव्हते. स्वप्नांचा पाठलाग करताना जळून राख होणे आणि त्या राखेतूनही फिनिक्सप्रमाणे पुन्हा भरारी घेणे ही त्याची खरी ताकद!

'द भुजिया बॅरॉन' या पुस्तकात त्यांच्या लहानपणीच्या अनेक आठवणी सांगितलेल्या आहे. लहान भाऊ महेश याच्याबरोबर दुकानात काम करताना, त्याला कामाच्या तासानुसार कधी आठ ठाणे तर कधी रुपया मिळत असे. अगदी शाळकरी वयापासून कष्टाचे बाळकडू या परिवाराने मुलांना दिले होते. दमडी कमावण्याची अक्कल नसताना बापाच्या भरोशावर हजारो रुपये उडवणाऱ्या, गरज नसताना महागड्या गाड्या दामटून मेहनतीचा पैसा अक्षरशः फुंकणाऱ्या धनिकांच्या बाळांनी यापासून नक्कीच धडे घ्यायला हवेत. अग्रवाल परिवाराने धंद्यामध्ये अमाप नफा कमवला पण, त्या नफ्याचा उपयोग त्यांनी धंदा वाढवण्यासाठी केला. रामेश्वरलाल यांनी मुलांना, जे हवे ते मिळवा पण, कष्ट करून' ही शिकवण दिली होती.

महेश अग्रवाल त्यांच्या लहानपणीची एक आठवण सांगतात की, वडिलांबरोबर एकदा खेळण्याच्या दुकानात त्यांनी एक लॉटरीचा स्टॉल पाहिला. त्यात हवा तो नंबर सांगून खेळणे मिळवता येत असेल. वडिलांनी सांगितले की, तुला जे खेळणे पाहिजे ते आपण विकत घेऊ. पण, जुगाराच्या भरोशावर आपल्याला काही नको. या अनुभवी मारवाड्याची ही शिकवण केवळ महेश यांच्यासाठीच नव्हती तर आजच्या तरुण पिढीलाही याची नितांत गरज आहे. कॉलेजवयीन मले देखील सध्या जंगली रमीसारख्या ऑनलाईन जुगाराच्या चकात अडकलेली आहे. त्यांनी या परिवाराचे उदाहरण नक्कीच डोळ्यांसमोर ठेवावे. प्रभूशंकर यांच्या आयुष्यात पुढे अनेक चढउतार आले पण, त्याविषयी चर्चा आता करणे शक्य नाही. आपण नक्कीच त्याविषयी बोलू पण पुढच्या वेळी...

# सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवारांचा जाहीर प्रचार; निवडणूक विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २७ ऑक्टोबर**

- सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवाराच्या प्रचारा संदर्भाने निर्बंध घालण्यात आले असले तरी या निर्बंधांना न जुमानता उमेदवार त्यांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जाहीर प्रचार करत आहेत. या प्रचारामुळे व्हाट्सअप, फेसबुक आदी समाज माध्यम हाउसफुल झाली असली तरी निवडणूक विभागाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या निर्बंधानुसार प्रचार करणे बंधनकारक आहे. सोशल मीडियाचा वापर करण्यासाठी निवडणूक आयोगाने निर्बंध घालून दिले आहेत परंतु संबंधित उमेदवारांनी मात्र यातून पळवाट काढली आहे. कार्यकर्त्यांच्या माध्यमातून स्वतःची छायाचित्रे असलेली बॅनर वायरल करण्यात येऊन मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बॅनर बरोबरच व्हिडिओ, ऑडिओ क्लिप, डिजिटल पोस्टरच्या माध्यमातून विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सोशल मीडियावर जाहीरपणे प्रचार करत असल्याने आचारसंहितेचा हा भंग होत नाही का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. व्हाट्सअप, फेसबुक आदी समाज माध्यमावर उमेदवाराचे फोटो, पक्षाचे चिन्ह मोठ्या प्रमाणात वायरल करण्यात येत असून निवडणूक आयोग प्रचाराच्या या पद्धतीवर निर्बंध घालून सदरील खर्च संबंधित उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करेल काय असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचाराला निर्बंध घालण्यात आले असले तरी सध्या स्थितीत सुरू असलेल्या या प्रचारावर निवडणूक विभागाने लक्ष ठेवणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## डॉ. सान्वी जेठवाणी अपक्ष उमेदवारी भरणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**



नांदेड येथील प्रसिद्ध कलावंत व तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता ज्यांनी आपलं नावलौकिक महाराष्ट्र देश विदेशात नाव कमवून आज राजकारणात पदार्पण करत नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून आपली उमेदवारी धनत्रयोदशी २९ तारखेला भरणार असल्याची माहिती दिली आहे.

अनेक राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार स्त्री व पुरुषच दिले आहे तृतीयपंथी म्हणून आणि राजकारणात समाजकारणात अतिशय उत्तम असले तरीही आमचा विचार होत नाही. म्हणून आमच्यासारख्या उच्चशिक्षित असलेले व्यक्तींना राजकारणात येऊन समाज कार्य करण्याची संधी मिळेल या हेतूने जेठवाणी यांनी राजकारणात पदार्पण केले आहे. नांदेड शहराचा विकास व माझ्या भागातील लोकांचं आवाज त्यासोबतच तृतीयपंथींचा विधानसभा सदस्य म्हणून सभागृहात आवाज गुंजवण्याकरिता मी हा मोठा पाऊल उचललेला आहे हा इंद्रधनु हातात घेत असताना अनेक आव्हाने पुढे येतील परंतु आपला निश्चय दृढअसून समाजकार्य करण्याची संधी मला मिळावी म्हणूनच मी आज विधानसभा निवडणुकीत उतरले असे त्यांनी प्रतिपादन केले. नांदेडकरांनी एक मोठी संधी मला द्यावी अशी त्यांना अपेक्षा आहे

## संक्षिप्त वृत्त

### मतदान अधिकारी क्रमांक तीन व चार यांचे प्रशिक्षण

**भोकर**-८५-भोकर विधानसभा मतदारसंघ मधील नियुक्त मतदान अधिकारी क्रमांक तीन व मतदान अधिकारी क्रमांक चार यांचे प्रथम प्रशिक्षण ओम लॉन्स भोकर या ठिकाणी तसेच प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक प्राथमिक आश्रम शाळा, बायपास रोड भोकर या ठिकाणी संपन्न झाले आहे. संबंधित अधिकारी यांना त्यांच्या कर्तव्याबाबत तसेच मतदान केंद्रावर त्यांच्याकडून होणाऱ्या संभाव्य चुका होऊ नये यासाठी पांडुरंग बोरगावकर (अप्पर जिल्हाधिकारी नांदेड) यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी प्रविण मेंगशेट्टी (निवडणूक निर्णय अधिकारी,८५-भोकर तथा उपविभागीय अधिकारी भोकर), रेणुकादास देवणीकर (सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अर्धापूर) विनोद गुंडमवार (सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भोकर), आनंद देऊळगावकर (सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मुदखेड) व इतर मान्यवर. एकूण १०७९ मतदान अधिकारी पैकी १०२८ मतदान अधिकारी प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. अनुपस्थित ५१ मतदान अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे.

### डॉ. माहुरे यांना लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड

**नांदेड**-धन्वतरी जयंती समारोह समिती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, डॉ. सुभाष वाघे हेल्थ फाऊंडेशन, डॉक्टर असोसिएशन, रोगनिदान विकृती विज्ञान, पीजी असोसिएशन, इंटरनॅशनल जनरल ऑफ डायग्नोस्टिक अँड रिसर्च नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयुर्वेद नॅशनल डे चे औचित्य साधून डॉ. विजयकुमार माहुरे यांना महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांच्या शुभहस्ते अवॉर्ड प्रदान करण्यात आला. या प्रसंगी मेंबर ऑफ कल्चरल कमिटी महाराष्ट्र शासनाचे बबन नंदन पवार, डॉ. सुभाष वाघे, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. नितीन वाघमारे, डॉ. राजेंद्र सोनेकर, डॉ. विजय पोतदार, डॉ. उज्ज्वला पवार, डॉ. गजानन ढोले, किशोर खांडेकर, चंद्रसेन डोंगरे व इतर भारतातून आलेले विविध तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. डॉ. माहुरे गेली ३५ वर्षांपासून सातत्याने सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीत काम करीत आहेत. ललितकला व प्रयोगजीवी निकाय स्वामी रामानंद तीर्थ विश्वविद्यालय नांदेडचे ते पहिल्या बॅचचे विद्यापीठात प्रथम आलेले विद्यार्थी होत. यापूर्वीही त्यांच्या नाटकाची नोंद घेऊन दिग्दर्शन व अभिनयाबद्दल दुबई व मलेशियात त्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. लाईफटाईम अचिव्हमेंट अर्वार्ड मिळाल्याबद्दल महाराष्ट्र ऑफिसर्स फोरमचे अध्यक्ष पी.एस. बोरगावकर, कल्चरल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र गोणारकर, उपाध्यक्ष रामदास होटकर, मारोती धुतुरे, श्रावणकुमार शिंदे, शंकर शिरसे, के. आनंद, सम्राट हटकर, सदानंद अंभोरे आदींनी अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांना बौद्धीक फराळाचे वाटप

**नांदेड**- धनगर टाकळी केंद्राअंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव (लिखा) ता. पूर्णा जि. परभणी येथे गेल्या पाच वर्षापासून दीपावली सुट्टीत बौद्धिक फराळ वाटप केला जातो. सदर उपक्रमात पायाभूत साक्षरतेची पार्श्वभूमी समाविष्ठ असलेले उतारा वाचन व त्यावरील अध्ययन निष्पत्तीवर आधारीत जसे प्रश्नोतरे, शब्दकोडी, शुद्ध शब्दाला गोल करणे, गटात न बसणारा शब्द ओळखून त्याला गोल करणे, शाब्दीक सापशिडी, शब्दांचा डोंगर तयार करणे त्याचबरोबर संख्या लेखन अक्षरात अंकात, संख्यावर आधारीत सर्वांत लहान अंकी संख्या तयार करणे, सर्वांत मोठी संख्या तयार करणे, हातच्याच्या बेरजा, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, पाढे पाठांतर, विस्तारीत रूपावरून संख्या ओळखून लिहिणे, स्थानिक किंमत ओळखणे, वर्गमुळ, घनमुळ, पाठांतर करणे इंग्रजीतील शब्दकोष तयार करणे. उदा. ए पासून दहा शब्द ते झेडपर्यंत प्रत्येकी दहा शब्द संकलीत करणे, शब्द कोडी सोडवणे, शब्दांची बाग तयार करून त्यातून विविध प्रकारचे शब्द शोधणे, इंग्रजी राईम्स पाठ करणे, ग्रामपंचायतीची स्थापना ते सरपंच, ग्रामसेवक यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या यावर मुलाखती घेवून प्रकल्प तयार करणे आदी बाबी सदर उपक्रमाच्या अंतर्गत येतात. दिवाळी च्या फराळाचा आस्वाद घेता घेता अभ्यासामध्ये खंड पडून विस्मरण होवू नये म्हणून किमान अध्ययन निष्पतीवर आधारीत वर्गनिहाय दिपावली बौद्धीक फराळ सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थ्यांकरिता वाटप केला जातो.याबरोबरच मूल्यसंस्कार करायचे नसतात तर ते विद्यार्थामध्ये रूजवली पाहिजेत या तत्वानुसार महापुरुषांचे चरित्र, सुविचार संग्रह, इसापनीतीच्या गोष्टी, बालकथा संग्रह, चित्र रंगभरण, बडबड गीते, सामान्य ज्ञानाची पुस्तके, सर्वधर्म समभाव व्यक्त करणाऱ्या गोष्टी, विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी व बौद्धिक क्षमता लक्षात घेवून पुरक वाचन साहित्याचा देखिल बौध्दीक फराळात समावेश केला जातो.

## गोवंश वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**



विमानतळ पोलिसांनी सांगवी परिसरात अवैधरित्या होत असलेली गोवंश वाहतूक रोखून तीन गोवंश जातीचे तीन बैल ताब्यात घेतले आहेत. त्याची किंमत एक लाख ३५ हजार रुपये असून याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अर्धापूर येथून वाहन क्र.एमएच-३८-ई-३१९३ या पिकअपमधून गोवंश जातीच्या बैलांची चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने दि.२७ ऑक्टोबर रोजी सांगवी परिसरातील आसना पुलाजवळ या पिकअप वाहनाला अडविले असता त्यामध्ये गोवंश जातीचे एक लाख ३५ हजार रुपये किंमतीचे तीन बैल आढळून आले. पोलिसांनी बैल व वाहन असा एकूण ३ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी जवळाबाजार ता.औंढा येथील शेख मोहसीन शेख माईन व मुद्दसीर कुरेशी सलीम कुरेशी यांच्याविरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडणूक प्रशिक्षणात ७३ कर्मचाऱ्यांनी मारली दांडी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २७ ऑक्टोबर**



हदगाव विधानसभा मतदार संघाच्या निवडणूकीसाठी काल व आज झालेल्या निवडणूक प्रशिक्षणात निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे , उपजिल्हाधिकारी प्रशांत शेळके, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर आदींनी कर्मचाऱ्यास मार्गदर्शन केले. दोन दिवस संपन्न झालेल्या प्रशिक्षणात ७३अधिकाऱ्यांनी दांडी मारली.

१५ मतदान केंद्राध्यक्ष तर १३ सहायक मतदान केंद्राध्यक्ष प्रशिक्षणाला गैरहजर राहिले तर आज झालेल्या इतर मतदान अधिकारी ८५८ कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे आदेश देण्यात आले होते. यात ८१३ जणांनी उपस्थिती नोंदवली दोन व तीन इतर मतदान अधिकाऱ्यात ४५ इतर मतदान आधिकाऱ्यांनी दांडी मारली आज ९४.७५ टक्के तर काल ९६.५२ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. प्रशिक्षणास दांडी मारणाऱ्यात बी.एल.ओ. तसेच निवडणूक कक्षात असलेल्या कर्मचाऱ्यांना वगळून इतरांना नोटीसा बजावून कारवाई करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कळवले असल्याचे सहायक महसूल अधिकारी किशन गुळगुळे यांनी कळवले असल्याचे मीडिया कक्षातून अनिल तामसकर, अनिल दस्तूरकर यांनी कळवले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा अनुभव



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

लोकसभा पोट निवडणूक तथा ०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात आज इतर मतदान अधिकारी यांचे नागार्जुना पब्लिक स्कुलमध्ये दुसऱ्या दिवशीचे प्रशिक्षण आयोजित केले होते. प्रशिक्षण कक्षाच्यावतीने एकूण दहा कक्षात पीपीटी द्वारे मर्यादित गटास परिणामकारक प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. याचा प्रत्यक्ष अनुभव जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी घेतला.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी प्रत्येक कक्षात जावून स्वतः प्रशिक्षणार्थी होवून प्रशिक्षणाचा अनुभव घेतल्यामुळे इतर प्रशिक्षणार्थींचा उत्साह द्विगुणित झाला. प्रशिक्षण देणाऱ्या मास्टर ट्रेनरला कांही शंका विचारुन शंकेचे समाधान करुन घेतले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत याच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ , तहसीलदार प्रविण पांडे, नायब तहसीलदार नितेश कुमार बोलेलू, प्रशिक्षण टिममधील संजय भालके, मुख्याध्यापक सुनील दाचावार, प्रा.राजेश कुलकर्णी, हनुमंत राठोड, पेशकार राजकुमार कोटुरवार यांची उपस्थिती होती.

## 'स्वारातीम' विद्यापीठात एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील गणितीयशास्त्र संकुलामध्ये दि. २१ ऑक्टोबर रोजी गणितातील अलीकडील विकासावर ऑन सम रिसेंट डेव्हलपमेंट इन मॅथेमॅटिक्स या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन चेन्नई येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस चे वरिष्ठ गणित तज्ञ प्रो. के. श्रीनिवास यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून चेन्नईच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेसचे प्रो. के. श्रीनिवास, बिट्स पिलानी, हैदराबाद कॅम्पसचे (बीआयटीएस पिलानी) प्रो. बी. मिश्रा आणि आयआयआयटीडीएम, चेन्नईचे प्रो. एम. सुब्रमणी उपस्थित होते. प्रो. श्रीनिवास यांनी आपल्या उद्घाटन भाषणात गणित आणि सांख्यिकीमध्ये उपलब्ध असलेल्या विविध संधींबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी कष्टाचे महत्त्व, संशोधनाच्या नव्या दिशा आणि या क्षेत्रातील उज्ज्वल भविष्यासाठी विविध संकल्पना मांडल्या. विविध सत्रांमध्ये गणितातील अलीकडील विकास, तांत्रिक व व्यावहारिक उपयोग यावर माहिती देण्यात आली.

## आदमपूर येथे चौथ्यांदा मन्यार सापास जीवदान

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २७ ऑक्टोबर**



बिलोली तालुक्यातील मौजे आदमपूर, ता.बिलोली येथील आचारी नयुम हैदरसाब शेख यांच्या घरपरिसरात दि.२२ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास मन्यार जातीचा साप आढळून आला. येथील सर्पमित्र सतीश मोरे यास बोलावून हा साप पकडण्यात आला. आतापर्यंत आदमपूर परिसरात चौथ्यांदा हा साप नजरेस पडतो आहे. याआधी सर्पमित्र राजेश मुंडकर, सर्पमित्र सतीश मोरे,वन्य जीव प्रेमी जाफर आदमपूरकर आणि सर्पमित्र माधव कोळनुरे यांनी दिवसा, रात्री अपरात्री, अनेक विषारी व बिनविषारी साप रेस्क्यु करून वनविभागाच्या मार्गदर्शनाने नैसर्गिक अधिवासात मुक्त केले होते. त्याच बरोबर अनेक सापाबंद्दल गैरसमजुती संदर्भात जनजागृती हेतू गाव व शाळेत कार्यक्रम ही घेण्यात आले होते. सदरील सापास मराठीत मन्यार साप तर हिंदीत करैत तर इंग्रजीत कॉमन क्रेत असे म्हणतात.हा साप निशाचर आहे. रात्री हा साप बाहेर पडतो आणि बहुतेक अडचणीच्या ठिकाणी नजरेस पडतो. याचे विष नागापेक्षाही पंधरा पटीत जहाल असते. त्याला नुरोटॉक्सिक असे म्हणतात. बंगारस कुळातल्या या सापाची लांबी दीड मीटरपर्यंत असते. छोटे कीटक, पाल, सरडे, उंदीर, बेडूक असे याचे खाद्य होय. माणसास चावा घेतल्यावर हळूहळू संवेदन प्रणाली बधीर होत जाते. हा चपळ साप रंगाने काळा, मानेवर पांढरे ठिपके, डोके निमुळते, निमुळत्या शेपटीवर पांढरे ठिपके, पाठीवर दोन जोडीत पांढ्या रेषा असतात.नागरिकांनी रात्री अपरात्री बाहेर पडताना योग्य ती खबरदारी घ्यावी. परिसरातील वनरक्षक सहदेव दोसलवार यांच्या मार्गदर्शनाने वरील सापास वनविभाग परिसरात मुक्त करण्यात आले. याबद्दल सर्पमित्रांचे कौतुक होत आहे.

## दीपावलीनिमित्त जि. प. शाळेत 'खाऊ' उपक्रमास प्रारंभ

### २१ दिवसांच्या बौद्धिक फराळाचे चिमुकल्यांना वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

नांदेड - दीपावलीनिमित्त शाळांना २७ ऑक्टोंबर पासून सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. या कालावधीतही अध्ययन सुरू राहावे यासाठी जवळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी अनोखी शक्कल लढवित 'खाऊ' उपक्रम सुरू केला आहे या अतंर्गत विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष घटकार, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, केंद्रप्रमुख संतोष अंबुलगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाध्यायपुस्तिका आणि बौद्धिक फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी सरपंच साहेबराव शिखरे, कैलास गोडबोले, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, मारोती चक्रधर, आनंद गोडबोले, माता पालक संघाच्या अध्यक्षा मनीषा गच्चे, अंगणवाडी कर्मचारी इंदिरा पांचाळ शिक्षक मित्र कविता गोडबोले, हैदर शेख, पांडूरंग गच्चे यांची उपस्थिती होती.

**वाचन संस्कृती जोपासण्यासाठी शिक्षकांचा अनोखा उपक्रम**

विद्यार्थी हा स्वतःच ज्ञानाचा रचियता असतो. परंतु मोबाईलमुळे पुस्तके वाचनाची आवड लोप पावत चालली आहे. शिक्षकांनी ह्या ज्ञानरचनावादाचा पुरस्कार करीत हे तत्व प्रत्यक्षात उतरविले आहे. दीपावलीनिमित्त मिळालेल्या सुट्ट्यांचा सदुपयोग करीत शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज वाचनाची सवय असावी यासाठी शालेय वाचनालयातील विविध पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. तसेच शालेय अभ्यासक्रमावर आधारित स्वाध्याय पुस्तिकाही वाटप करण्यात आल्या आहेत. घरी राहून दररोज दोन तास या उपक्रमासाठी देण्यात येणार आहे. यातून भाषा, गणित, इंग्रजी, परिसर अभ्यासाची उजळणी व्हावी आणि अवांतर वाचनातून नवज्ञानाची निर्मिती व्हावी हा असा या 'खाऊ' उपक्रमाचा उद्देश आहे. हा उपक्रम १८ नोव्हेंबरपर्यंत चालू राहील असे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी सांगितले.



## स्थानिक गुन्हे शाखेने केल्या तीन मोटारसायकली जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून दिड लक्ष रुपयांच्या तीन मोटारसायकली जप्त केल्या आहेत.

स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार मालटेकडी ओव्हरब्रिजच्या खाली तिघेजण संशयास्पदरित्या फिरत असल्याचे कळाले. त्यानुसार पोलिसांनी पांडूरंग बाबाराव जाधव रा.कुदळा ता.उमरी, आनंद नागोराव कदम रा.बेंद्री ता.नायगाव, व्यंकटेश दादाराव जाधव रा.महाटी ता.उमरी या तिघांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या तीन मोटारसायकली चोरल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी सखोल चौकशी केली असता त्यापैकी दोन मोटारसायकली नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तर एक मोटारसायकल शिवाजीनगर हद्दीतून चोरीला गेली होती. पोलिसांनी या तिन्ही आरोपींना ताब्यात घेवून मोटारसायकलीचा ठावठिकाणा जाणून घेतला. चोरट्यांनी लपून ठेवलेल्या या तिन्ही मोटारसायकली स्थागुशाच्या पथकाकडे सुपूर्द केल्या. पोलिसांनी याबाबत या तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

## महिला सफाई कमगारास बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील सफाई महिला कामगार भारतबाई प्रल्हाद लोणे यांना काही कारण नसताना बेदम मारहाण करणाऱ्या पिरबुऱ्हान नगर येथील माथेफेरु सादीक शेख यास तत्काळ अटक करुन कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनचे संस्थापक व अध्यक्ष कॉ. गणेश शिंगे यांनी पत्रकाद्वारे केली आहे. तसेच पिडीत महिलेला न्याय मिळेपर्यंत पिरबुऱ्हाननगर परिसरातील सफाईकामावर बहिष्कार टाकण्यात आल्याचे कॉ. शिंगे यांनी सांगितले.

नांदेड वाघाळा महानगरपालिका अंतर्गत प्रभाग क्र. ५ येथील पिरबुऱ्हाननगर गल्ली नं. २८ येथील सफाई कामासाठी श्रीमती भारतबाई पल्हाद लोणे (वय ५६, रा. श्रावस्तनगर) या आपले दैनंदीन कर्तव्या पार पाडत असताना पिरबुऱ्हाननगर येथील गल्ली क्र. १८ जवळ काम करत असताना आरोपी सादीक शेख हा येऊन आर्वच्च भाषेत व जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करु लागला. सदर महिला कामगारास काही कारण नसताना मारहाण होत असताना सदर महिला भितीपोटी सायराभेरा पळत होती. तेथील कोणत्याही नागरिकाने मारहाण करणाऱ्या व्यक्तीला रोखले नाही. त्यामुळे सदर व्यक्ती महिला कामगारास अतिशय आर्वाच्च व जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण करीत होता. सदरची घटना सोबत असलेल्या महिला कामगारांनी स्वच्छता प्रभारी निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून दिली असता स्वच्छता निरीक्षकांनी काहीही प्रतिक्रिया व्यक्त न करता सदर कामगारास घरी जाण्याचा सल्ला दिला. सदर महिलेने मनपाचे माजी सभापती सय्यद फारुख अली यांना सांगितले असता सादीक शेख याने साली तु हमारा आपस मे झगडा लगाती क्या, असे म्हणत परत तोंडावर व छातीवर लाथाबुक्यांनी मारहाण केली. स्वच्छाता महिला कामगार भारतबाई प्रल्हाद लोणे यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र. ५३०/२०२४ कलम -२९६, ११५ (२), बी.एन.एस.सह कलम ३ (१), (आर) (एस) (अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मतदार जनजागृती निमित्त किनवटमध्ये युवा संसद, संकल्प पत्र व मतदार शपथ

**यतभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ ऑक्टोबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या अनुषंगाने मतदार जनजागृतीसाठी नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात युवा संसद,संकल्प पत्र व मतदार शपथ कार्यक्रम घेण्यात आला.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत , जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीपच्या नोडल अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतील मतदार जनजागृती (स्वीप) अंतर्गतचे उपक्रम सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना यांच्या मार्गदर्शनाखाली गट शिक्षणाधिकारी तथा स्वीप कक्ष प्रमुख गंगाधर राठोड हे आपल्या सहकाऱ्यांसह ८३- किनवट विधानसभा मतदार संघात राबवित आहेत. या अनुषंगाने येथील सरस्वती विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले. नव मतदारांचा युवा संसद कार्यक्रम घेण्यात आला. नवमतदारांची स्वागत करण्यात आले. सर्वांनी आपल्या आई-वडिलांना, काका-काकू, दादा-वहिनी, आदिंना मी मतदान करणारच असे भावनिक करणारे पत्र लिहून घेण्याचे आवाहन करण्यात आले. शिक्षकांसह सर्व नवमतदार युवक युवतींना मतदान शपथ दिली.



याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष प्राचार्य कृष्णकुमार नेम्माणीवार, स्वीप कक्षाचे सर्व सदस्य रमेश मुनेश्वर , शेषेराव पाटील, सुरेश पाटील व प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांचा ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन स्वीप कक्षाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी केले. स्वीप कक्षाचे सदस्य तथा नयाकॅम्प किनवटचे केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे संकल्प पत्र लेखनाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी मुलांनी आपापल्या घरी जाऊन आपल्या मातृभाषेत आई-वडिलांना मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याविषयी संकल्प पत्र लिहावे , मतदान करणे महत्त्वाचे आहे हा विचार सांगावा. यावेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक ,शिक्षिका मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. पर्यवेक्षक प्रा. रेणुकादास पहुरकर यांनी आभार मानले.



# ठाकरे गटाची १५ नावांची दुसरी यादी आली

## बुलढाणा- जयश्री शेळके, दिग्रस- पवन जयस्वाल

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**

ठाकरे गटाने विधानसभा निवडणुकीसाठी आपली दुसरी यादी जाहीर केली असून, त्यात १५ उमेदवारांच्या नावाचा समावेश आहे. पहिल्या यादीत ठाकरे गटाने ६५ जणांच्या नावांची घोषणा केली होती. त्यामुळे आता एकूण ८० उमेदवार जाहीर झाले आहेत. बुलढाण्यातून जयश्री शेळके आणि दिग्रसमधून पवन श्यामलाल जयस्वाल यांना उमेदवारी देण्यात आली.





ठाकरे गटाने दुसऱ्या यादीत अजय चौधरी यांना शिवडीतून उमेदवारी जाहीर केली. त्यांना पहिल्या यादीत स्थान मिळाले नव्हते. वडाळ्यातून माजी महापौर श्रद्धा जाधव यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. भायखळा मतदारसंघ काँग्रेसला मिळावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्याबाबत चर्चाही सुरू होती. काँग्रेसचे मधुकर चव्हाण या मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक होते. मात्र, त्या आधीच ठाकरे गटाने या जागेवर उमेदवार जाहीर केला. तिथून मनोज जामसुतकर यांना उमेदवारी देण्यात आली. या यागेबाबत पक्षस्तरावर समझोता झाला आहे की उबाठाने सांगलीप्रमाणे आपल्या स्तरावर उमदेवार जाहीर केला, याबाबत अद्याप चित्र स्पष्ट झाले नाही.

**दुसरी यादी पुढील प्रमाणे :** धुळे शहर- अनिल गोटे, चोपडा (अज)- राजू तडवी, जळगाव शहर- जयश्री सुनील महाजन, बुलढाणा- जयश्री शेळके, दिग्रस- पवन श्यामलाल जयस्वाल, हिंगोली- रूपाली राजेश पाटील, परतूर- आसाराम बोराडे, देवळाली (अजा)- योगेश घोलप, कल्याण पश्चिम- सचिन बासरे, कल्याण पूर्व- धनंजय बोडारे, वडाळा- श्रद्धा श्रीधर जाधव, शिवडी- अजय चौधरी, भायखळा- मनोज जामसुतकर, श्रीगोंदा- अनुराधा राजेंद्र नागावडे, कणकवली- संदेश भास्कर पारकर ■

याशिवाय धुळे शहर मतदार संघातून अनिल गोटे यांना आणि नाशिकच्या देवळाली मतदारसंघातून योगेश घोलप यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. बहुचर्चीत कणकवली विधानसभा मतदार संघातून संदेश पारकर यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांची लढत भाजपाचे नितेश राणे यांच्याशी होणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### तिसऱ्या यादीत तीन नावे

उबाठा गटाकडून सकाळी १५ नावांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली होती. त्यापाठोपाठ लगेच ३ नावांचा समावेश असलेली तिसरी यादी जाहीर केली. यात वर्सोवा मतदारसंघातून हरुन खान, घाटकोपर पश्चिम मतदारसंघातून संजय भालेराव आणि विलेपार्ले मतदारसंघातून संदीप नाईक यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. ■



विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराकरिता अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या एलईडी व्हॅनचे अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले

# विठ्ठलाच्या दारी बावनकुळे मिटवणार आजी-माजींचा वाद

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**



विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. काही जागांवर अद्याप महाविकास आघाडीसह महायुतीत तिढा कायम आहे. इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे नेत्यांपुढे तिकीट वाटपाचा पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी बंडखोरी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात देखील तिकीट देण्याच्या मुद्यावरून वातावरण तापले आहे. विद्यमान आमदार समाधान आवताडे व माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यात चुरस असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, या दोन्ही नेत्यांमधील वाद सोडवण्यासाठी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे पंढरपुरात येणार आहेत.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी समाधान आवताडे व प्रशांत परिचारक दोघेही इच्छुक आहेत. प्रशांत परिचारक हे तुतारीकडून निवडणूक लढवणार, अशा चर्चा सुरू आहेत. याच पृष्ठभूमीवर या दोन्ही नेत्यांमधील वाद मिटविण्यासाठी आणि तोडगा काढण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे पंढरपूरला जाणार आहेत. मुंबई येथून विमानाने बावनकुळे सोलापुरात पोहोचणार असून, तिथून ते पंढरपूरला येऊन आवताडे व परिचारक यांची बैठक घेणार आहेत. यानंतर पुन्हा बावनकुळे सोलापूर येथे मुक्कामी पोहोचणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)

**मनसेचे ठरले**

# मुख्यमंत्र्यांविरोधात नाही देणार उमेदवार

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्ष उमेदवार याद्या जाहीर करीत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात मनसे उमेदवार देणार नसल्याची माहिती समोर आली आहे. कोपरी-पाचपाखाडी मतदार संघात अभिजित पानसे यांची उमेदवारी निश्चित झाली होती; मात्र आता उमेदवारी न देण्याचा निर्णय पक्षाकडून घेण्यात आला आहे. कोकण पदवीधर मतदार संघातून देखील अभिजित पानसे यांना उमेदवारी मागे घेण्यास सांगण्यात आले होते.

आता ठाणे शहर मतदारसंघातून अविनाश जाधव, ओवळा माजिवडा इथून संदीप पाचांगे आणि कळवा मुंब्रा इथून सुशांत सूर्यराव हे उमेदवार विधानसभा निवडणूक लढणार आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधांमुळे उमेदवार देणार नसल्याची भूमिका मनसेने घेतल आहे. अमित ठाकरे यांच्या विरोधात शिवसेनेने सदा सरवणकर यांनी उमेदवारी जाहीर केली असली, तरी राज ठाकरे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात उमेदवार देणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. याबाबत जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी 'राज ठाकरे दोस्तीचा दुनियेतला राजा माणूस,' अशी प्रतिक्रिया दिली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# 'द्या खोके, उमेदवारी एकदम ओके'चे सूत्र संजय राऊतांनी राबविले

## शरद पवार गटाचे नेते राहुल जगताप यांचा आरोप

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**

जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर झाल्यानंतर आता महाविकास आघाडीमधून नवा वाद समोर येत आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पक्षाचे उपनेते साजन पाचपुते यांच्या मध्यस्थीने श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे तिकीट अनुराधा नागवडे यांना विकले असल्याचा थेट आरोप श्रीगोंद्यातील शरद पवार गटाचे नेते आणि माजी आमदार राहुल जगताप यांनी केला. संजय राऊत यांनी 'द्या खोके आणि उमेदवारी एकदम ओके' असे सूत्र राबविले, असा थेट हल्ला त्यांनी केला.





ठाकरे गटाची दुसरी यादी जाहीर झाली आणि त्यात श्रीगोंदा येथून अनुराधा नागवडे यांना तिकीट दिल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आधीपासूनच दावा करीत आलेले राहुल जगताप यांच्या वक्तव्याला बळ मिळाले. जगताप म्हणाले होते की, दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना सामान्य कार्यकर्त्यांना न्याय देणारी होती. मात्र, आता संजय राऊत यांनी 'द्या खोके, उमेदवारी एकदम ओके' असे सूत्र राबविले आहे, जे लोकशाहीला घातक आहे. शरद पवार माझे राजकारणातील श्वास आहेत. अनेक अडचणी आल्या, पण त्यांची साथ सोडली नाही. शरद पवारांची श्रीगोंद्याच्या जागेबाबत काय अडचण होती, हे मला माहीत नाही. पण, माझा त्यांच्यावर कोणताही रोष नाही. त्यामुळे आता श्रीगोंदा विधानसभा निवडणुकीत काय करायचे, यासंदर्भात कार्यकर्त्यांनी निर्णय घ्यायचा आहे.

'पन्नास खोके एकदम ओके'च्या घोषणा देणारे संजय राऊत आणि त्यांच्या ठाकरे गटाचे तसेच मविआतील घटक पक्षांच्या नेत्यांचे शरद पवार गटाच्या माजी आमदाराने पितळ उघडे पाडले आहे. एकनाथ शिंदेंसोबत गेलेल्या आमदारांनी अनेकवेळा खोके कोण घेते, मातोश्रीवर खोके कसे जातात, याबाबत सूतोवाच केले आहे. पण, यावेळी मविआतील बड्या नेत्याने संजय राऊतांनी खोके घेऊन विधानसभेची जागा विकल्याचा आरोप केल्याने, मविआ आणि ठाकरे गटासाठी अवघड जागेचे दुखणे होऊन बसले आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



# अमित ठाकरेंना महायुतीने समर्थन द्यावे : आशिष शेलार

◆ **मुंबई, २७ आक्टोबर**

हिंदुत्वाची भूमिका घेणारे, आम्हाला मदत करणारे आणि नातेसंबंध जपणारे राज ठाकरे यांचे पुत्र निवडणुकीच्या मैदानात उतरले असतील, तर आपणही नाते जपायला हवे. आपल्याच घरातील अमित ठाकरे निवडणूक लढवत असतील, तर महायुती म्हणून त्यांना समर्थन द्यायला हवे, असे मत मुंबई भाजपाध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी व्यक्त केले. यासंदर्भात मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचे ते म्हणाले.

माध्यमांशी संवाद साधताना शेलार बोलत होते. ते म्हणाले, भले उद्धव ठाकरेंना वाटत नसेल, तरी महायुतीने नाते जपायला हवे, असे मला वाटते. सदा सरवणकर यांना आमचा विरोध नाही. पण, महायुती म्हणून सगळ्यांनी एक चांगली राजकीय भूमिका घ्यावी. त्यातून जनतेत एक संदेश जाईल.

नाना पटोलेंच्या आरक्षणविरोधी भूमिकेवर टीका करताना शेलार म्हणाले, परदेशात राहुल गांधी यांनी अकलेचे दिवाळे दाखवून दिले. त्याला नाना पटोले यांनी समर्थन करून आरक्षणाचा अपमान केला. त्यामुळे पटोले यांनी महाराष्ट्राची माफी मागावी. चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमोर जाऊन नाक घासावे. दुसरे म्हणजे, ज्या जितेंद्र आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला, त्या आव्हाडांनी आरक्षणाच्या विषयावर बोलूच नये, असे टीकास्त्र आशिष शेलार यांनी डागले. ◀(तभा वृत्तसेवा)

### नवाब मलिकांना भाजपाचा विरोधच



नवाब मलिकांना आमचा विरोध आहे. त्यांना तिकीट द्यावे की नाही, याचा निर्णय त्यांच्या पक्षाचे नेते घेतील. परंतु, दाऊदशी संबंधित असलेल्या नवाब मलिक यांचे काम भाजपाचे कार्यकर्ते करणार नाहीत. आमची भूमिक ठाम असल्याचे आशिष शेलार यांनी स्पष्ट केले. ■



# 'सबका साथ, सबका विकास'ची खरी गरज मविआला

## संजय राऊत यांचा आघाडीला टोला

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**

महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरून गोंधळ सुरू असतानाच शिवसेना उबाठाचे नेते संजय राऊत यांनी शनिवारी सांगितले की, 'सबका साथ, सबका विकास'ची खरी गरज विरोधी गट महाविकास आघाडीला आहे.

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी शेतकरी आणि कामगार पक्ष आणि समाजवादी पार्टीसारख्या छोट्या पक्षांनी काही जागांवर उमेदवार जाहीर केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यापूर्वी, मविआचे घटक काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार आणि शिवसेना उबाठा गटाने विधानसभा निवडणुकीसाठी प्रत्येकी ८५ जागा लढवणार असल्याची घोषणा केली होती. त्यानंतर राऊत म्हणाले, २८८ पैकी २७० जागांवर मविआ मित्रपक्षांमध्ये एकमत आहे.

सपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी शुक्रवारी सांगितले की, जर मविआचे लहान पक्षांसोबत एकमत झाले नाही तर ते २०-२५ जागांवर उमेदवार उभे करतील. सपाने आधीच पाच उमेदवार उभे केले आहेत आणि सात जागा मागितल्या आहेत. त्यात धुळे शहरासाठी इर्शाद जहागीरदार यांना उमेदवारी देण्यात आली असून, उबाठाने अनिल गोटे यांना उमेदवारी दिली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# संपत्तीत तीन पटींनी वाढ तरीही डोक्यावर सात कोटींचे कर्ज

◆ **मुंबई, २७ ऑक्टोबर**





महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. परभणीच्या जिंतूर विधानसभा मतदारसंघात भाजपाच्या विद्यमान आमदार मेघना बोर्डीकर यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. मेघना बोर्डीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्या संपत्तीचे विवरणपत्र जाहीर केले.

मेघना बोर्डीकर यांच्या संपत्तीत मागील पाच वर्षांत तीन पटींनी वाढ झाली आहे. तिथेच, त्यांच्यावर एकूण सात कोटी ७४ लाखांचे कर्ज देखील आहे. २०१९-२० मध्ये ६१ लाख ९० हजार रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या मेघना बोर्डीकर यांचे २०२३-२४ मध्ये हेच उत्पन्न तीन पटीने वाढून १ कोटी ७० लाख ४३ हजार रुपये झाले आहे.

मेघना बोर्डीकर यांच्याकडे ९ कोटी ४४ लाख १६ हजार रुपयांची जंगम मालमत्ता आहे. त्यांच्याकडे रोख १ लाख ८५ हजार ९१८ रुपये आहेत. ७ लाख ४३ हजार रुपयाचे सोने असून, ७८ हजार रुपयांचे दागिने आहेत. मेघना बोर्डीकर यांच्या विविध बँक खात्यांत तसेच शेअर्स रोख्यांमध्ये मोठी गुंतवणूक आहे.

आमदार मेघना बोर्डीकर यांच्याकडे स्थावर आणि जंगम मालमत्ता मिळून ३० कोटी रुपयांच्या आसपास आहे तसेच त्यांच्यावर विविध बँकांचे ७ कोटी ७४ लाख १२ हजार रुपयांचे कर्ज आहे. बोर्डीकर यांच्यावर तब्बल १२ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी दहा गुन्ह्यांमध्ये त्यांच्यावर दोषारोप पत्र सिद्ध करण्यात आले आहे. तर, दोन गुन्ह्यांमध्ये अद्याप दोषा सिद्ध करण्यात आला नाही. ज्या दहा गुन्ह्यांमध्ये त्यांच्यावर दोषारोप सिद्ध करण्यात आले, त्यात कोरोना काळात आंदोलन केल्याबाबत गुन्ह्यांचा समावेश आहे. एका गुन्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास निष्काळजीपणे क्रेनमध्ये बसून हार घालून वाहतुकीस अडथळा केल्याचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

# उत्तरप्रदेशात पोटनिवडणुकीच्या सर्व जागा जिंकण्याची भाजपाची व्यूहरचना


**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २७ ऑक्टोबर**

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या कमी जागांची भरपाई करण्याच्या उद्देशाने उत्तरप्रदेशात विधानसभेच्या नऊ जागांसाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीत भाजपा यावेळी पूर्ण तयारीने मैदानात उतरली आहे.

२०१४ पासूनच्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भरधाव निघालेल्या भाजपाच्या विजयरथाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाने काही प्रमाणात झटका बसला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने स्वबळावर ७१ तर, मित्रपक्षांसह ७३ जागा जिंकल्या होत्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा ६२ वर आली होती. २०१४ मध्ये मात्र भाजपा अनपेक्षितपणे ३३ पर्यंत घसरली. दुसरीकडे, समाजवादी पक्ष ५ वरून ३७ तर काँग्रेस एकवरून सहावर पोहोचली. सपा-काँग्रेस आघाडीने ४३ जागा जिंकत भाजपाला धक्का दिला होता.

२०२७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभेची निवडणूक होत आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या आधी नऊ जागांसाठी होत असलेल्या पोटनिवडणुका म्हणजे त्या निवडणुकीची उपांत्य फेरी समजून ती जिंकून राज्यात सकारात्मक संदेश देण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. त्यामुळे भाजपा पूर्ण तयारीने या निवडणुकीत उतरला आहे. भाजपा आठ जागा लढवत असून, मीरापूरची जागा त्याने मित्रपक्ष रालोदला दिली आहे. उमेदवारी देताना झालेल्या चुका हे लोकसभा निवडणुकीत राज्यातील भाजपाच्या पराभवाचे एक कारण होते. त्यामुळे यावेळी भाजपाने उमेदवार जाहीर करताना पूर्ण काळजी घेतली आहे. राज्यातील जातीय आणि सामाजिक समीकरणांचा विचार केला आहे.



लोकसभा निवडणुकीत अखिलेश यादव यांनी पीडीए म्हणजे पिछडा, दलित आणि अल्पसंख्यक धोरणाचा पुरस्कार केला. सपाच्या विजयात या धोरणाचे योगदान मोठे होते. त्यामुळे यावेळी त्याला शह देण्यासाठी भाजपाने पिछडा म्हणजे ओबीसी आणि दलित उमेदवार या पोटनिवडणुकीत उतरवले आहेत. सोबत भाजपाचा हिंदुत्वाचा मुद्दा

# यादव समुदायाला आपल्याकडे वळवण्याचा भाजपाचा प्रयत्न

◆ **नवी दिल्ली, २७ ऑक्टोबर**

समाजवादी पक्षाचा समर्थक समजला जाणाऱ्या उत्तरप्रदेशातील बहुसंख्य यादव समुदायाला आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न भाजपा करीत आहे. याचाच एक भाग म्हणून भाजपाने काही महिने आधी यादव-जाटव जोडो अभियान चालवले होते. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून मोहनलाल यादव यांची करण्यात आलेली निवड हा याच योजनेचा भाग होता. सपाचे सर्वेसर्वा मुलायमसिंह यादव यांना पद्मविभूषण देण्याचा निर्णयही भाजपाने विचारपूर्वक घेतला होता.

यावेळी करहल विधानसभा मतदारसंघात भाजपाने अखिलेश यादव यांच्या घरातील एकाला अनुजेश यादव यांना उमेदवारी दिली. आजगडचे सपा खासदार धर्मेंद्र यादव यांचे अनुजेश यादव हे बहीणजावई आहेत. यातून भाजपाने अखिलेश यादव यांना आपल्या नात्यातील यादव सांभाळता येत नसल्यासोबत सपात आणि यादव कुटुंबातही सबकुछ ठीक नसल्याचा संदेश दिला आहे. त्याचबरोबर यादव म्हणजे समाजवादी पक्ष हे समीकरणही मोडित काढले आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने यादवबहुल कन्नौज, बदायुं आणि फिरोजबाद या तीन जागा जिंकल्या होत्या. यातून यादव भाजपालाही मतदान करतात, हे दाखवून दिले होते.

हरयाणात भाजपाला मिळालेल्या विजयात उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या 'बटोंगे तो कटोंगे' या विधानाचे योगदान नाकारता येणार नाही. या विधानामुळे हिंदू समाज एकवटला. त्यामुळे उत्तरप्रदेशातील पोटनिवडणुकीत भाजपा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या या विधानाचा योग्य उपयोग करून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भाजपाने नऊही मतदारसंघात योगी मंत्रिमंडळातील मंत्र्यांची ड्युटी लावली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जातीने या सर्व मतदारसंघांवर लक्ष ठेवून आहेत. यावेळी निवडणूक जिंकण्यात कोणतीही चूक आपल्याकडून होणार नाही, याची काळजी भाजपा घेत आहे. विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक असल्यासारखी या पोटनिवडणुकीची तयारी भाजपाने केली आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# ठाकरे-पवारांनी दिले एकाच मतदारसंघात उमेदवार

**मुंबई, २७ ऑक्टोबर -**

शरद पवार गटाने विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली असून, दुसऱ्या यादी २२ उमेदवारांचा समावेश आहे. मात्र, परांडा मतदारसंघात ठाकरे गटाने राहुल पाटील यांच्या नावाची आधीच घोषणा केली असताना, शरद पवार गटाने याच ठिकाणी राहुल मोटे यांना उमेदवारी जाहीर केल्याने महाविकास आघाडीत वाद निर्माण झाला आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पक्षाची दुसरी यादी जाहीर केली.

या यादीत आलेले परांडा विधानसभा मतदारसंघाचे नाव आश्चर्यकारक ठरले आहे. कारण, येथे महाविकास आघाडीतील दोन पक्षांनी दोन उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. एकीकडे महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या ठाकरे गटाने परांडामधून राहुल पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. त्यापाठोपाठ आता शरद पवार गटानेदेखील येथे राहुल मोटे यांचे नाव जाहीर केले आहे.

त्यामुळे एकाच मतदारसंघात दोन उमेदवार जाहीर करण्यात आल्याने मविआमध्ये अजूनही समन्वय नसून, गोंधळ उडाला असल्याचे चित्र आहे. दुसऱ्या यादीत सतीश अण्णा पाटील (एरंडोल), सतीश चव्हाण (गंगापूर), पांडुरंग बरोरा (शहापूर), राहुल मोटे (परांडा), संदीप क्षीरसागर (बीड), मयुरा काळे (आर्वी), दीपिका चव्हाण (बागलाण), माणिकराव शिंदे (येवला), उदय सांगळे (सिन्नर), सुनीता चारोस्कर (दिंडोरी), गणेश गीते (नाशिक पूर्व), ओमी कलानी (उल्हासनगर), सत्यशील शेरकर

## शरद पवार गटाची दुसरी यादी जाहीर

(जुन्नर), सुलक्षणा शिलवंत (पिंपरी), सचिन दोडके (खडकवासला), अश्विनी कदम (पर्वती), अमित भांगरे (अकोले), अभिषेक कळमकर (अहल्यानगर शहर), उत्तम जानकर (माळशिरस), दीपक चव्हाण (फलटण), नंदिनी कुपेकर (चंदगड), मदन कारंडे (इचलकरंजी) यांचा समावेश आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अखेर धीरज पाटलांना कॉंग्रेसची उमेदवारी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ ऑक्टोबर -**
तुळजापूर विधानसभा मतदार संघातुन अखेर महाविकास आघाडीतील कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. धिरज अप्पासाहेब कदम पाटील यांना शनिवारी रात्री तिसऱ्या यादीत उमेदवारी जाहीर केली आता तुळजापूर विधानसभा मतदार संघात भाजप व कॉंग्रेसच्या पाटलात लढत होणार आहे.



ॲड. धिरज पाटील हे धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष असुन ते सिंदफळ जिल्हा परिषद गटाचे सदस्य होते. तसेच त्यांनी यापुर्वी धाराशिव जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. ॲड. धिरज पाटील यांचे वडील कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष होते.

कॉंग्रेसकडून माजीमंत्री माजी आ. मधुकरराव चव्हाण इच्छुक होते. तुळजापूर विधानसभा मतदार संघातुन उमेदवारी मिळवण्यासाठी कॉंग्रेसमध्ये प्रचंड चुरस निर्माण झाली होती.



### संक्षिप्त वृत्त...



### दिव्यांगाचा ५ टक्के निधी दिवाळीपूर्वी वितरित करण्याची मागणी

**मंगरूळ, दि.२७ ऑक्टोबर -**
राज्य शासन व केंद्र शासन तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयास प्राप्त होणाऱ्या विविध निधीतुन ५ टक्के निधी दिव्यांग म्हणजे अंध, अपंग व दुर्धर आजाराने त्रस्त बांधवाना खर्च करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तो निधी तात्काळ दिवाळी खर्च करावा अशी मागणी मंगरूळ (ता. तुळजापूर) येथील दिव्यांग बांधवानी ग्रामसेवक लक्ष्मीकांत सुरवसे यांच्याकडे केली आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गावातील सर्व दिव्यांग बांधवाना ५ टक्के निधी वितरित करू असे आश्वासन ग्रामसेवक सुरवसे यांनी दिव्यांग बांधवांना दिले. निवेदनावर मनोज डोंगरे, दिलीप धुरगुडे, महेश गरगडे, सुधीर कोरेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी ग्रामपंचायत सदस्य आदमशा फकीर हे उपस्थित होते.



### नवोदय विद्यालयात करिअर व बोर्ड परीक्षा संदर्भात व्याख्यान संपन्न

**तुळजापूर, दि.२७ ऑक्टोबर -**
पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात शनिवार दि.२६ ऑक्टोबर रोजी एनआयओएस दिल्लीचे संचालक डॉ.के. रमेश यांचे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर व बोर्ड परीक्षेला कसे सामोरे जावे? यासंदर्भात व्याख्यान संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते यांनी दहावी व बारावीनंतर कोण कोणते कोर्सेस असतात हे सांगून कोणत्या क्षेत्रात सध्या सुवर्ण संधी जास्त आहेत हे सांगितले. तसेच सध्या डिजिटल इंडिया असल्यामुळे स्वतःला कसे अपडेट राहिले पाहिजे हे ही सांगितले. त्यानंतर बोर्ड परीक्षेला सामोरे जात असताना वेळ, अभ्यास, लेखन यांचे नियोजन कशा पद्धतीने करावे हे सांगून प्रत्येक विषयाचा अभ्यास कोणत्या वेळी, कशा पद्धतीने करावा हे सांगितले. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल व बुके देऊन स्वागत केले. याप्रसंगी व्याख्यानास दहावी बारावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमास एस.डी. खोब्रागडे, एस.एस. माने, सी.एस. गोमारे, वाय.आर. पाटील, व्ही. एस. राऊत, प्रमोद खरबास, एस.आर. कराड, एच.जी. जाधव यांची उपस्थिती होती.

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून देवदत्त मोरे निवडणुकीच्या मैदानात

**धाराशिव, दि.२७ ऑक्टोबर -**
सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक कसबे तडवळा येथील रहिवासी असलेले देवदत्त मोरे यांना धाराशिव विधानसभा मतदारसंघाचे तिकीट मिळाले आहे. त्यामुळे



मनसेने विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात मोरे यांच्या रूपाने पैलवान उतरविला आहे. धाराशिव कळंब या मतदार संघात महाविकास आघाडीच्याकडून शिवसेनेने विद्यमान आमदार कैलास पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर महायुतीने या मतदारसंघात अद्याप उमेदवाराची घोषणा केली नसल्यामुळे नागरिकांना उत्सुकता लागलेली आहे. असे असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष प्रमुख राज ठाकरे यांनी पाचव्या यादीमध्ये धाराशिव मतदार संघासाठी उद्योजक देवदत्त मोरे यांची अधिकृत उमेदवारी घोषित केली आहे. त्यामुळे मनसेच्या गोठात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गोरे यांच्या माध्यमातून या मतदारसंघात मनसैनिकांना नवचैतन्य मिळून पुन्हा ते जोमाने निवडणुकीच्या कामासाठी लागणार आहेत.

# परंडा मतदार संघात महाविकास आघाडीत जागा वाटपाचा घोळ; आघाडीत झाली बिघाडी

## शिवसेना ठाकरे गटाकडून रणजीत पाटील तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून राहुल मोटे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ ऑक्टोबर -**
राज्यात विधानसभेचे वारे जोरात वाहत असतानाच राज्यासह धाराशिव जिल्ह्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी वेगाने सुरू आहे. राज्यातील प्रमुख महाविकास आघाडी व महायुतीचे उमेदवार जाहीर करण्याची प्रक्रिया महायुती व महाविकास आघाडीतील घटक पक्षाकडून सध्या सुरू आहे. जागा वाटपामध्ये काही ठिकाणी काही मतदारसंघात उमेदवार जाहीर करण्यामध्ये दोन्हीही बाजूने आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. तर काही मतदारसंघात मात्र जागा वाटपाच्या घोळ अद्यापही सुरूच आहे.

धाराशिव जिल्ह्यातील परंडा विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांची महायुतीकडून अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यांच्या विरोधात मात्र महाविकास आघाडीकडून उमेदवारी बाबत मोठा घोळ घातला जात आहे. दोन दिवसापूर्वी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी परंडा मतदार संघातील शिवसेनेचे एकनिष्ठ माजी आमदार कै. ज्ञानेश्वर पाटील यांचे चिरंजीव रणजीत ज्ञानेश्वर पाटील यांना





यांना पक्षाचा ए.बी. फॉर्म देऊन त्यांची उमेदवारी जाहीर केली होती. परंतु आज शनिवारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत परंडा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल मोटे यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी जाहीर केली आहे. राहुल मोटे यांनी शुक्रवारी आपला उमेदवारी अर्ज देखील दाखल केला आहे, महाविकास आघाडीतील दोन प्रमुख पक्षाने वेगवेगळे आपले उमेदवार जाहीर केल्याने या मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी वृत्तवाहिन्याशी बोलताना परंडा मतदार संघाबाबत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करणार असल्याचे सांगितले आहे. मंगळवार दि.२९ ऑक्टोबर हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

तोपर्यंत महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा संभ्रम दूर होतो का? हे पहावे लागेल.

याबाबत महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे वरिष्ठ नेते नेमकी कोणास परंडा मतदारसंघाची महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी जाहीर करतात याकडे परंडा मतदार संघातील व धाराशिव जिल्ह्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## जगदंबा बचत गटाचे कार्य कौतुकास्पद : दत्ता कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑक्टोबर -**
खामसवाडीतील जगदंबा बचत गटाचे कार्य कौतुकास्पद असून अन्य बचत गटांनी बोध घ्यावा असे आहे असे प्रतिपादन सिद्धिविनायक ग्रुपचे सर्वेसर्वा दत्ता कुलकर्णी यांनी केले.



जगदंबा बचत गटाच्या तिसऱ्या वार्षिक बैठकीतील युवकापुढे ते बोलत होते. बचतगट काढणे सोपं आहे. मात्र ते टिकवणे स्पर्धेत राहणे सोपं नाही. बांगलादेशचे विद्यमान पंतप्रधान मोहम्मद शहाबुद्दीन हे जागतिक बचत गटाचे प्रणेते आहेत.

त्यांनी बचत गट काय असतो व प्रेरणा काय असते हे जगाला दाखवून दिले याबद्दलही दत्ता कुलकर्णी यांनी सांगितले. जगदंबा बचत गट हा दरवर्षी त्यांच्या सभासद व बिगर सभासद यांना दिपावली भेट साखर तेल डब्बा देत असतो. या गटाने अनेक गरीब गरजवंत, दवाखाण्यासाठी नडलेलं लोकांना कमी व्याजदरात आर्थिक सहाय्य केलेलं आहे. गत तीन वर्षांपासून हा गट सभासद बिगर सभासद यांना दहा किलो साखर व पंधरा किलोचा तेल डब्बा भेट स्वरूपात वाटप करतात. गटाचे अध्यक्ष महेश शेळके, सचिव अझरुद्दीन मणियार यांनी पाहुण्यांचे स्वागत पुष्पहार देऊन केले.

यावेळी गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच किरण पाटील, सदस्य विश्वास कोकणे, सादिक सय्यद, विजकुमार झोरी, बालाजी शेळके, गणेश शेळके, विश्वनाथ मिटकर, लक्ष्मण तांबारे आदी बचतगट सदस्य गावातील युवक, नागरिक उपस्थित होते.

## निवडणूक खर्चासाठी उमेदवाराचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक : जिल्हाधिकारी ओम्बासे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑक्टोबर -**
भारत निवडणुक आयोगाच्या सूचनेनुसार निवडणूक खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक उमेदवारांचे निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे आवश्यक आहे. उमेदवाराला हे बँक खाते त्याच्या नावे किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी यांच्या संयुक्त नावाने उघडता येते. सहकारी बँक तसेच कोणत्याही बँकेत किवा पोस्ट ऑफीसमध्येही खाते उघडता येते.

उमेदवारांने निवडणुक खर्चासाठी असलेली संपूर्ण रक्कम संबंधीत बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे. निवडणुकीसाठी उघडलेल्या बँक खात्यातुन उमेदवाराने आपला निवडणुक खर्च धनादेश, धनाकर्ष, आरटीजीएस, एनईएफटीद्वारे करणे आवश्यक आहे. उमेदवारांना बँक खाती उघडल्यास तत्पर सेवा मिळावी व निवडणुक काळात संबंधीत खात्यातुन प्राधान्याने पैसे काढण्यास आणि पैसे जमा करण्याच्या उद्देशाने समर्पित काऊंटर उघडणेबाबत सर्व बँकांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी निर्देश दिले आहे.

## जिल्ह्यात विधानसभा मतदार संघासाठी चार निवडणूक निरीक्षकांची नेमणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑक्टोबर -**
भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघासाठी चार निवडणूक निरीक्षकांची नेमणूक केली आहे.

यामध्ये २४०- उमरगा आणि २४१- तुळजापूर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक (सामान्य) म्हणून पंकज कुमार (९७१११ २९०४४) आणि २४२- उस्मानाबाद आणि २४३- परंडा विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चांद (९४१८० ६५९००) यांची निवड करण्यात आली आहे.

तर जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक (खर्च) म्हणून अलूरू व्यंकट राव (८९८५९७२३६१) यांची आणि निवडणूक निरीक्षक (पोलीस) आर. एस. बेलवंशी (९४२५१ ५८८५२) व (६३६३३१२५८४) यांची नेमणूक केली आहे.

## उपपदार्थ प्रकल्पांमुळे नॅचरल शुगरच्या कर्मचाऱ्यांना २६ टक्के बोनस

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ ऑक्टोबर -**
केंद्र सरकारच्या दोलायमान अवस्थेतील निर्णयांमुळे सध्या साखर उद्योग गंभीर आर्थिक संकटात सापडला असतानाही उपपदार्थ निर्मितीमुळे नॅचरल शुगर नफ्यात असल्याचे कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांनी सांगितले. नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. साईनगर रांजणीच्या कामगार संघटना आणि संचालकांची बैठक झाली सदर बैठकी मध्ये बोनस बाबत चर्चा होवून कर्मचाऱ्यांना दिवाळीसण आनंदाने साजरा करता यावा यासाठी कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांनी कर्मचाऱ्यांना २६ टक्के बोनस देण्यात येईल असे सांगताच कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधिंनी जल्लोष करून कारखाना व्यवस्थापनाचे आभार मानले.

यावेळी बोलताना ठोंबरे म्हणाले, मराठवाडयातील साखर उद्योग ऊसाची उपलब्धता व पाणी टंचाई या दोन्ही समस्यांनी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. मागील वर्षाच्या दुष्काळाच्या खाईत सापडलेला मराठवाडयातील साखर उद्योग यशस्वी करून दाखवण्याचे काम नॅचरल शुगरने केले असून तो नफ्यात आणण्याचे कौशल्य साध्य केले आहे आणि ते केवळ साखर कारखान्या बरोबरच उपपदार्थ निर्मिती मधून आणि कर्मचारी व ऊस उत्पादकांचे सहकार्या मधून मला जे कांही द्यावयाचे आहे ते माझ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आणि कर्मचारी बांधवांनाच द्यावयाचे आहे असे त्यांनी यावेळी सभेमध्ये सांगितले. चालू वर्षी चांगला पाऊस झाल्याने मांजरा धरण भरले व त्यामुळे कार्यक्षेत्रामध्ये ऊसाची लागवड मोठया प्रमाणात होत असले मुळे व्यवस्थापनाने निर्धारीत केलेले ७.०० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे आवाहन कर्मचाऱ्यांना केले.

सदर बैठकीस कारखान्याचे सर्व संचालक, जनरल मॅनेजर व कर्मचारी संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

## दिपावलीनिमित्त किल्ले, भेटकार्ड, पणत्या, दिवे, उटणे, आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ ऑक्टोबर -**
लोहारा येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे दि.२६ ऑक्टोंबर रोजी दिपावली पूर्वी प्रा. यशवंत चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्कुलमधिल विद्यार्थ्यांनी शिक्षक व पालक यांच्या मदतीने किल्ले, भेटकार्ड, पणत्या, दिवे, उटणे, आकाश कंदील इत्यादी दिवाळीत लागणाऱ्या महत्वाच्या वस्तू बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.

यामध्ये सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून यावेळी या सर्व वस्तू बनवण्याचा आनंद लुटत एक वेगळा अनुभव घेतला. याप्रसंगी मिस मीरा माने यांनी विध्यार्थ्यांना दिपावली विषयी सविस्तरपणे माहिती सांगितली की, दिपावली हा सण आपल्या देशातील सर्वांत मोठा सण असून दिवाळीमध्ये भारतीय रुढी व परंपरेने साजरा करण्यात येत असलेले दिवस म्हणजे वसूबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दिपावली पाडवा, अभ्यंग स्नान, भाऊबीज, तुलसी विवाह आदी अतिशय उत्साहाने साजरे करतो, म्हणूनच आपण म्हणतो की, दिवाळी सण मोठा नाही. आनंदाला तोटा त्याचबरोबरच घराघरांमध्ये चिवडा, चकली, शंकरपाळी, करंजी, गरा लाडू, बेसन लाडू, मोतीचुर लाडू, बालुशाही, म्हैसूर पाक, असे विविध गोड-तिखट पदार्थ बनवतात, एकमेकांच्या घरी हा फराळ खाण्यासाठी बोलावतात तसेच समाजातील गरीब व गरजू कुटुंबातील लोकांना नविन कपडे व फराळाच्या वस्तू भेट देवून त्यांचीही दिवाळी गोड करतात. दिवाळीनिमित्त बाहेरगावी असलेले सर्व कुटुंबातील लोक म्हणजे आजी-आजोबा, मामा-मामी, काका-काकी, मावशी, आत्या, चुलत बहीण-भावंडे एकत्रित येवून अतिशय उत्साहाने व आनंदाने दिवाळी सण साजरा करतात.

यावेळी सिद्धेश्वर सुरवसे, व्यंकटेश पोतदार, सविता जाधव, सोनाली काटे, अनिता मनशेट्टी, स्मिता कोरे, लक्ष्मी करदोरे, ईश्वरी जमादार, सरिता पवार, अर्चना सोनके, रेश्मा शेख, शीतल बिराजदार, बसवराज पंचभाई आदी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## प्रयाग मल्टीस्टेटच्या सभासदांना १० टक्के लाभांश

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ ऑक्टोबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीच्या सभासदांना १० टक्के लाभांश तर कर्मचाऱ्यांना दीपावली बोनस म्हणून एक महिन्याचा अतिरिक्त पगार देण्यात येणार आहे.

जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेटची या संस्थेची स्थापना दि.८ एप्रिल २०१३ रोजी झाली आहे. संस्थेचे एकूण १७९१ एवढे सभासद आहेत. संस्थेच्या तीन शाखा कार्यरत आहेत. मार्च २०२४ अखेर संस्थेकडे ११ कोटीच्या ठेवी आहेत. सहा कोटी कर्ज वाटप आहे. संस्थेचा एनपीए शून्य टक्के आहे. संस्थेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात तीस लाख रुपयाचा नफा झाला आहे. सभासदांनी संस्थेवर विश्वास दाखवल्याबद्दल चेअरमन सचिन कदम, व्हा. चेअरमन मनोज कदम, तज्ञ संचालक मोहन जाधव व संचालक मंडळ यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनानुसार कर्मचाऱ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामामुळे एवढा नफा संस्थेने मिळवला असल्यामुळे संचालक मंडळाने सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

सभासदांना १० टक्के लाभांश व कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस जाहीर केल्याबद्दल सभासद व कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. सभासद व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शक सुनील कदम, चेअरमन सचिन कदम, व्हा. चेअरमन मनोज कदम, तज्ञ संचालक मोहन जाधव यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## युवा प्रबोधन साहित्य मंचाचे पुरस्कार जाहीर

### मेघराज किलजे, जानवी भोसले, कोल्हे, अंगुले, हंकारे मानकरी....

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ ऑक्टोबर -**
पुणे येथील युवा प्रबोधन साहित्य मंचचे सन - २०२४ चे विविध क्षेत्रातील मान्यवरांना देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील कृषी, पत्रकारिता, सामाजिक कार्य व जनसेवेच्या अतुलनीय कामगिरीबद्दल श्री गणेश कृषी विज्ञान मंडळ व कृषी वाचनालयाचे अध्यक्ष तथा मेघराज किलजे हे युवा महाराष्ट्र आदर्श समाजरत्न भूषण पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

महाराष्ट्र राज्य युवा प्रबोधन साहित्य मंचच्यावतीने दरवर्षी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येत असते. यावर्षीच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये अहमदनगर येथील जानवी भोसले यांना युवा महाराष्ट्र गुणवंत विद्यार्थिनी भूषण पुरस्कार तर चौफेर कवी सूरज अंगुले यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल युवा महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. तर पुणे येथील किरण सामाजिक संस्थेच्या संस्थापिका तेजाबाई हंकारे यांना युवा महाराष्ट्र नारीशक्ती भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर कळंब (जि. धाराशिव) येथील सुप्रसिद्ध कवयित्री संध्याराणी कोल्हे यांना युवा साहित्य



भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

युवा प्रबोधन साहित्य मंचच्या एका खास कार्यक्रमात पुणे येथे नोव्हेंबर महिन्यात हे पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. युवा प्रबोधन साहित्य मंचचे संस्थापक अध्यक्ष सागर वाघमारे व पुणे जिल्हाध्यक्ष सागर वाघमारे यांनी पुरस्कार प्राप्त मान्यवरांना निवडीचे पत्र पाठवले असून, पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले आहे.

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ उपक्रमात गणेश विद्यालय तालुक्यात द्वितीय




**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ ऑक्टोबर -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील खाजगी अनुदानित गणेश विद्यालय शाळेने ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ या अभियानात तालुकास्तरावर दुसरा क्रमांक पटकावला आहे. शासनाकडून २ लाख रुपयांचे पारितोषिक शाळेला देण्यात येणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ हे अनोखे अभियान

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने अभियानाची सुरुवात करण्यात आली होती. सन २०२३-२४ मध्ये अभियानाचा पहिला टप्पा पार पडला. मागील वर्षी अनेक शाळांनी अभियानात सहभाग घेतला.

शासनाने मागील वर्षाचा अनुभव घेऊन यावर्षीदेखील या अभियानाचा दुसरा टप्पा ५ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत राज्यात राबविण्यास सुरुवात केली, असता तेरखेडा येथील खाजगी अनुदानित गणेश विद्यालय शाळेने भाग घेत शासनाने नमूद केलेल्या सर्व



गोष्टींचे काटेकोरपणे पालन केले. याप्रसंगी शासनाकडून नेमण्यात आलेल्या तालुकास्तरीय समितीने शाळेला प्रत्यक्ष भेटी देऊन शाळांच्या कामगिरीच्या आधारे मुल्यांकन करत समितीने गणेश विद्यालय शाळेला तालुकास्तरावर दुसरा क्रमांक देत २ लाख रुपयांचे द्वितीय पारितोषिक जाहीर केले. त्यामुळे गावात शाळेचे कौतुक केले जात असून मुख्याध्यापक अरुण बोंदर यांनी सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला देखील राज्यात मोठा प्रतिसाद मिळाला असल्याचे सांगितले जाते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्याबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, क्रीडा घटकांबाबत जागृती करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना, प्रोत्साहन देणे ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

## घराचे भाडे मागायला गेलेल्या दांपत्याला मारहाण

छत्रपती संभाजीनगर : घराचे भाडे मागायला गेलेल्या दांपत्याला मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी चंद्रहास अपार्टमेंट फ्लॅट बी विंग बेगमपुरा परिसरात घडली. अतीका परविन अब्दुल रहेमान बियाबाणी, अब्दुल रहेमान बियाबाणी, मुत्तसिर उर्फ लईक अब्दुल रहेमान बियाबाणी, आणि इतर एक अशी आरोपींची नावे आहेत. फिर्यादीनुसार नूरजा सय्यद आरिफ (४० रा. गल्ली नं ११ बायजीपुरा) फिर्यादी या आपल्या पतीसह घराचा किराया मागण्यासाठी गेल्या असता आरोपी त्यांना, हम तुम्हे पहचानते नही. तुम कौन हो ? हमको किराया मांगने वाले असे म्हणाले. यावर फिर्यादीचे पती म्हणाले की आम्ही या घराचे मालक आहोत. असे म्हटल्यानंतर आरोपींनी किराया देण्यास नकार देत फिर्यादीला मारहाण केली.

## बसस्थानकात आढळला वृद्धाचा मृतदेह

बिडकीन, (प्रतिनिधी) : बिडकीन येथील बसस्थानक परिसरात ७७ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह शुक्रवारी (दि.२५) दुपारी आढळून आला. बिडकीन पोलिसांनी सुभाष गणपतराव गुंडे (वय ७७, रा. मिरजगाव, ह.मु. विश्वविनायक पार्क, देवळाई, ता. छत्रपती संभाजीनगर) अशी मृतदेहाची ओळख पटवली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरकडून बिडकीन येथे सुभाष गुंडे यांना अचानक चक्कर आल्याने जमिनीवर खाली कोसळले. त्यानंतर गुंडे यांना रक्ताची उलटी झाल्याची माहिती प्रथमदर्शनी प्रवाशांनी पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक अशोक माने, सहायक पोलिस फौजदार निकाळजे, पोलिस कर्मचारी अमोल मगर यांनी घटनास्थळी येऊन त्यांना खासगी रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. बिडकीन पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी प्रा. संतोष बोर्डे यांची नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर पश्चिम चे आमदार संजय शिरसाट यांनी प्रा. संतोष बोर्डे यांची शिवसेना उपजिल्हाप्रमुख पदी नियुक्ती केली. याप्रसंगी सहसंपर्कप्रमुख विकास जैन, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ महीला आघाडी संपर्क प्रमुख प्रतिभा जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहरप्रमुख विजय वाघचौरे, उपजिल्हाप्रमुख संजय बारवाल, प्रा. संतोष बोर्ड, शहर संघटक संतोष मरमट, युगंधर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा हर्षदा शिरसाट, महीला आघाडी जिल्हा संघटक शिल्पा राणी वाडकर, उपशहर प्रमुख राजू राजपूत, प्रसिध्दी प्रमुख अभिजीत पगारे, निखील तिवारी, स्नेहल अब्बड, रखमजी जाधव, पी आर ओ मनोज वडगावकर आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## कास्ट्राईब कर्मचारी संघटनेची जमाबंदी आयुक्तांशी चर्चा

छत्रपती संभाजीनगर : जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महा.राज्य) पुणे येथे आनंद भंडारी (भा.प्र.से.) अप्पर जमाबंदी आयुक्त व कास्ट्राईब भूमी अभिलेख कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य पदाधिकाऱ्यांसोबत नियोजित बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये कर्मचाऱ्यांच्या अनेक वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा झाली. तांत्रिक वेतन श्रेणी लागू करणे, राज्यात नवीन आकृतीबंद मंजूर करणे, कर्मचाऱ्यांचे गट ब गट क व गट ड संवर्गातील पदोन्नती भूमी अभिलेख विभागातील गट ड / वाहन चालक संवर्गातील सरळ सेवा भरती अथवा कंत्राट नुसार नेमणूक करणे गट क व गट ड संवर्गातील कालबध्द, आश्वासित योजना, ३०, वर्ष लाभ मिळने बाबत चर्चा करण्यात आली. संचालक भंडारी यांचा यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार संघटनेचे रविंद्र कांबळे सरचिटणीस महा. राज्य, यांनी केला. या वेळी विभूतीचंद्र गजभिये कार्याध्यक्ष, विकास गोसावी अति. सरचिटणीस,. बनसवाल, संजय भाबड विभागीय अध्यक्ष नाशिक विभाग, नुपूम मेढे मुख्य संघटक सचिव, राहुल राऊत विभागीय सरचिटणीस छत्रपती संभाजीनगर, सागर कांबळे विभागीय सरचिटणीस पुणे, संदिप आभाळे विभागीय उपाध्यक्ष नाशिक विभाग, प्रशांत कोरे विभागीय अध्यक्ष पुणे, दयानंद जोशी नाशिक, अमोल गजरे जिल्हाध्यक्ष पुणे आदी उपस्थित होते..

## भेसळ करणाऱ्यांवर थेट गुन्हे, ग्रामीण भागात पथके सज्ज

छत्रपती संभाजीनगर : दिवाळी सणाच्या निमित्ताने अन्न व औषध प्रशासनाद्वारे शहर तसेच ग्रामीण भागातील मिठाईच्या दुकानांची तपासणी करण्यात येणार आहे. या तपासणीत खाद्यपदार्थ असुरक्षित आढळल्यास थेट न्यायालयात खटला दाखल होऊ शकतो, असे प्रशासनाने सांगितले. दिवाळी तोंडावर आली. या सणाला नागरिकांकडून एकमेकांना मोठ्या प्रमाणावर मिठाई भेट दिली जाते. यामुळे मिठाईच्या बाजारात लाखोंची उलाढाल होते. परंतु, यात भेसळयुक्त मिठाईही बाजारात आणली जाते. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन सतर्क असून, शहरात तीन तर ग्रामीणमध्ये दोन अधिकाऱ्यांमार्फत मिठाई, तेल, तूप, खवा, बेसन, मैदा यांची तपासणी केली जाणार असल्याचे सहआयुक्त (अन्न विभाग) अर्जुन भुजबळ यांनी सांगितले. या टीमला सूचना करण्यात आल्या असून, त्याप्रमाणे कारवाई होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पदार्थांचा नमुना घेणार

या काळात मिठाईचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याने एफडीएचे पथक मिठाईचे सॅम्पल घेणार असून, त्याचे प्रमाणही वाढवणार आहे. त्या बरोबरच खवा, बेसन, मैदा, तेल याचीही तपासणी केली जाणार आहे. यात गुणवत्ता खराब आढळल्यास न्याय निर्णय दाखल होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## गीत ध्वनीमुद्रणाने सामाजिक चित्रपट 'निर्धार'चा मुहूर्त...

छत्रपती संभाजीनगर – एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला आणि ती गोष्ट साध्य करण्याचा निर्धार केला की, अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात. अशाच निर्धाराची गोष्ट 'निर्धार' या आगामी सामाजिक मराठी चित्रपटात पाहायला मिळणार आहे. नुकताच गीत ध्वनीमुद्रणाने 'निर्धार' चित्रपटाचा मुहूर्त करण्यात आला. आज समाज नव्हे, तर संपूर्ण देशाला पोखरणाऱ्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर हा चित्रपट भाष्य करतो. या चित्रपटातील तरुणांनी भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करण्याचा 'निर्धार' केला आहे. हा 'निर्धार' रुपेरी पडद्यावर सादर करण्याचे काम या चित्रपटाद्वारे निर्मात्यांनी केला आहे. देशातील ज्वलंत मुद्द्यावर भाष्य करण्याचा, किंबहुना तो कसा नष्ट होईल हे सांगण्याचा प्रयत्न 'निर्धार' या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि लेखकांनी फार सुंदररित्या केला आहे.

जयलक्ष्मी क्रिएशन या निर्मिती संस्थेअंतर्गत निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. दिलीप भोपळे यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणाऱ्या या चित्रपटाचं लेखन दीनानाथ वालावलकर यांनी केलं आहे. जुहू येथील आजिवासन स्टुडिओमध्ये 'निर्धार'मधील महत्त्वपूर्ण गाणं रेकॉर्ड करून चित्रपटाचा मुहूर्त करण्यात आला. या प्रसंगी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, गायक, संगीतकार, तंत्रज्ञ तसेच सिनेसृष्टीतील काही मान्यवर उपस्थित होते. गीतकार दीनानाथ वालावलकर यांनी लिहिलेलं 'दे ना शक्ती मातरम, वंदे मातरम...' हे गीत स्फूर्तीदायक आहे. गायक ओंकार सोनवणे, लयश्री वेणूगोपाल, मीरा सूर्या, आयुश तावडे, उत्तेज जाधव, प्रज्ञा जामसंडेकर यांनी गायलेलं हे गाणं संगीतकार राज पादारे यांनी संगीतबद्ध केलं आहे.

## नामदेव लक्ष्मण कवडे यांचे दुःखद निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .२७ ऑक्टोबर : नामदेव लक्ष्मण कवडे वय ६५ वर्षं रा.गिरजापूर ( गिधाडा) ता .पैठण यांचे दि .२६ शनिवार रोजी रात्री एक वाजेच्या दरम्यान दुःखद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर आज दि .२७ रोजी सकाळी अकरा वाजता त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आला त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे,गिरजापूर (गिधाडा) परिसरातील सामाजिक कार्यकर्ते म्हणून यांची ओळख होती.

# विदूत शॉर्टसर्किटने गोठ्याला आग; ४.८० लाखांपेक्षा जास्तीचे नुकसान

### पाच जनावरे होरपळून मृत्यू तर कापून जळून खाक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २७ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील निलजगाव येथे विदूत शॉर्टसर्किट झाल्याने गोठ्याला आग लागून जनावरे होरपळून मृत्यू तर कापून खाक झाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याची घटना आज दि .२७ रविवार रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली आहे , सविस्तर माहिती अशी की.निलजगाव येथे शेतकरी भाऊसाहेब मल्हारराव मोगल,वय ६० वर्ष,रा.निलजगाव,ता.पैठण यांची शेतातील गोठ्याला विदूत शॉर्टसर्किट झाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. निलजगाव ते बिडकीन रोडवरील पुलाजवळ यांची शेती आहे. स्थानिक नागरिकांनी आग लागलेली माहिती बिडकीन पोलीसांना दिली असताना कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार महादेव निकाळजे व सहायक फौजदार जगन्नाथ उबाळे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी करत नागरिकांच्या मदतीने आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.या गोठ्यामध्ये असलेले ०२ बैल,०१ जर्सी गाय,०२ पिल्ले, होरपळून मृत्यू झाले आहे व २० क्विंटल कापूस,कडबा चारा,शेती उपयोगी अवजारे असा एकुण ४,८०,००० रुपयांची नुकसान झाली असल्याची माहिती पोलीसांनी व पंचनामा करत असलेल्या महसूल विभाग तलाठी काळे यांनी घटनास्थळावरून पाहणी करत माहिती दिली आहे.या गोठ्यामध्ये कोणीही राहत नसल्याने सुदैवाने मानवी जीवितहानी टळली असली तरी इतर मोठे नुकसान शेतकरी मोगल यांचे झाले आहे. या घटनेचा सविस्तर पंचनामा करून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने,बीट सहाय्यक फौजदार जगन्नाथ उबाळे करीत आहे.

# आर्य चाणक्य शाळेचे चित्रकला स्पर्धेत यश



तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- भारतीय कापूस महामंडळ मर्यादित भारत सरकारचा उपक्रम, वस्त्र मंत्रालयाच्या अंतर्गत सतर्कता जागरूकता सप्ताह २०२४

च्या माध्यमाने भ्रष्टाचार या विषयावर चित्रकला स्पर्धात आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण च्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले . या स्पर्धेसाठी पैठण तालुक्यातून आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर पैठण ची निवड करण्यातआली.

या स्पर्धेत इयत्ता सहावी व सातवी च्या १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.आयोजकांनी या विद्यार्थ्यांना ड्रॉइंग सीट ,स्केच पेन उपलब्ध करून दिले.या स्पर्धेत चे बक्षीस वितरण करण्यासाठी भारतीय कापूस महामंडळाचे डेप्युटी जनरल मॅनेजर स्वप्निल दडमल , व्हिजिलन्स ऑफिसर नवीन रेड्डी , कमर्शियल ऑफिसर महेश बामणे ,सचिव सत्यप्रकाश तिवारी , नितीन विखे , सहसचिव विक्रम भुजंग आदी मान्यवरांच्या शुभहस्ते या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी प्रथम -आशुतोष संतोष पाटील, द्वितीय -आदिराज अविनाश गर्डे. तृतीय -अमृता विष्णू गोरे, उत्तेजनार्थ श्रुतिका प्रवीण फटांगडे,तनुश्री ज्ञानेश्वर नारळे रश्मिता उमाकांत सोळंके,प्रसाद गणेश परसे आदीना यश मिळविले. शाळेचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद काकडे, राखी धोकटे यांनी स्पर्धेचे नियोजन यशस्वी पार पाडले. ट्रॉफी तसेच सर्टिफिकेट देण्यात आले. वर्गातील विद्यार्थ्यांना खाऊचे देखील वाटप करण्यात आले.

# भार्गवी कराड सिल्वर व ब्रांझची मानकरी

छत्रपती संभाजीनगर : सिल्वर व ब्रांझ २ मेडल घेऊन – छत्रपती संभाजी नगर विभागातून भार्गवी कराड ही विद्यार्थिनी प्रथम आली आहे.

२०, २१ सप्टेंबर रोजी विरार पालघर जिल्हा येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र जिल्हा क्रीडा अधिकारी पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय स्केटिंगचे सामने आयोजित केले – होते. –

अमय क्लासिकल ग्राउंड विरार जिल्हा पालघर येथे १७ वर्षाखालील – मुलींमध्ये भाटकर स्केटिंग अकॅडमी चे विद्यार्थिनी भार्गवी नामदेव कराड ५०० मीटर रिंग प्रकारात ब्रांच व १लाप रोड प्रकारात सिल्वर मेडल घेऊन छत्रपती संभाजी नगर विभागाचे नाव उंचावले आहे. या अगोदर विभाग स्तरावर भार्गविने ३ गोल्ड मेड घेऊन छत्रपती संभाजी नगर विभागात सर्वप्रथम येण्याचा बहुमान पटकावला होता. भर्गविनी दोन मेडल घेऊन भाटकर अकॅडमीचे त्याच्या या यशात तिचे कोच अजय भाटकर व सोनिया भाटकर यांनी मोलाचे योगदान दिले. भार्गवी कराड ज्ञानदा इंग्लिश स्कूल या शाळेची विद्यार्थिनी आहे. शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संस्था अध्यक्ष यांनी देखील विशेष कौतुक केले. या यशाबद्दल भार्गवीवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# महाविकास आघाडीच्या घटक पक्षातीलच उमेदवार भरणार अर्ज

### दत्ता गोर्डे, सचिन घायाळ मा. आ वाघचौरे, चाटे यांचा समावेश






तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- पैठण विधानसभा ११० निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उ.बा.ठा शिवसेना विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी दत्ता गोर्डे यांना उमेदवारी सह बी फार्म दिल्याने महाविकास आघाडीत आतापासूनच बिघाडी निर्माण झाली असून घटक पक्षातील शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार संजय वाघचौरे,उ. बा.ठा शिवसेनेचे सचिन भैय्या घायाळ तसेच काँग्रेसचे मराठवाडा अध्यक्ष कांचनकुमार चाटे यांच्यासह आघाडीला ईतर उमेदवार निवडणूक विभागाकडे सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

पैठण महायुतीचे उमेदवार विलास संदीपान भुमरे हे प्रमुख नेत्यांसह मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून भुमरे यांच्या विरोधात महाविकास आघाडीने दत्ता गोर्डे यांना उमेदवारी दिल्याने आघाडीत फाटल्याचे दिसते. निवडणूक विभागाकडे दत्ता गोर्डे हे आपला उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल करणार असतांना आघाडीतील घटक पक्षाचे माजी आमदार संजय वाघचौरे, उ.बा.ठा शिवसेना युवा चेहरा सीए सचिन भैय्या घायाळ, ओबीसी नेते मराठवाडा अध्यक्ष कांचनकुमार चाटे यांच्यासह ईतर नेते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती माजी आमदार संजय वाघचौरे, संत एकनाथ सहकारी साखर कारखाण्याचे चेअरमन सीए सचिन भौय्या घायाळ, ओबीसीनेते डॉ कांचनकुमार चाटे यांनी दिली. निवडणूकी अगोदरच महाविकास आघाडीत बिघाडी निर्माण झाल्याचे चित्र असून याचा फायदा भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाई आठवले गट महायुतीला नक्कीच होणार आहे. मोठया प्रमाणात उमेदवारी दाखल होणार असतांना तसेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २८,आणि २९ ऑक्टोबर हे दोनच दिवस शिल्लक राहिल्याने निवडणूक विभागाची डोकेदुखी वाढणार आहे.

# वैजापूर तालुक्यात चिंचडगावकर चिकटगावकर एकत्र

वैजापूर प्रतिनिधी : चिकटगावकरांचा आमदार बोरनारेंना पाठिंबा निर्धार मेळाव्यात बोरनारेंना निवडुन आणण्याचा निर्धार ऐन विधानसभा निवडणुकीत वैजापुरच्या राजकारणाला वेगळे वळण लावणारी घटना शनिवारी वैजापुरचे माजी आमदार व नुकतेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातुन बाहेर पडणारे भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांनी येथील सुरज लॉन्समध्ये आयोजित कार्यकर्त्यांच्या निर्धार मेळाव्यात घडली. त्यांनी या विधानसभा निवडणुकीत, विकासाचा दृष्टिकोन समोर ठेऊन आतापर्यंत वैजापूर-गंगापूर विधानसभा मतदारसंघात तब्बल तीन हजार कोटींची विकास कामे करणारे महायुतीचे उमेदवार व शिवसेनेचे आमदार रमेश पाटील बोरनारे यांना सक्रिय पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयाचे गच्च लॉन्समध्ये बसलेल्या मतदार नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडात स्वागत केले. त्यामुळे शिवसेनेत उत्साहाचे वातावरण संचारल्याचे दिसुन आले. यावेळी कुठल्याही परिस्थितीत रमेश पाटील बोरनारे यांना आमदार म्हणुन निवडुन आणायचे असा निर्धार कार्यकर्त्यांनी केला. त्यावर मी पुन्हा येईन अशी दाद आमदार बोरनारे यांनी हात उंचावून दिली.

भाऊसाहेब पाटील यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य अभय पाटील चिकटगावकर, अजय पाटील चिकटगावकर, डॉ. राजीव डोंगरे, माजी जिल्हा परिषद




उपाध्यक्ष दिनकर पवार, रिखबशेठ पाटणी, राजेंद्र मगर, प्रशांत शिंदे, सुभाष भराडे, धिरजसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत सुरु झालेल्या निर्धार मेळाव्यात कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.

चिकटगावकर म्हणाले, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातुन मी तालुक्याला आमदार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, पंचायत समिती सभापती, उपसभापती, बाजार समिती अशी विविध महत्वाची राजकिय पदे देऊन पक्ष वाढवला. मात्र हे पाहवले न गेल्याने कॉग्रेस पक्षातील काही मंडळींनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करुन पक्ष व त्यासोबत माझे राजकिय अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न केला असा आरोप पंकज ठोंबरे यांचे नाव न घेता भाऊसाहेब चिकटगावकर यांनी केला. त्यानंतर मतदारसंघातील मतदारांची मते जाणुन घेऊन मी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यावेळी जिल्हा प्रमुखांनी मला विधानसभा उमेदवारी देण्याचे स्पष्ट संकेत दिले होते. पण त्यानंतर त्यांनी उमेदवारी नाकारल्याने आपण चिकटगावकर घराण्यावर प्रेम करणाय़ा कार्यकर्त्यांच्या हितासाठी तसेच विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा आणण्यासाठी महायुतीचे उमेदवार व शिवसेनेचे आमदार रमेश पाटील यांना २० नोव्हेंबर रोजी होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार रमेश पाटील बोरनारे, बाबासाहेब जगताप, साबेर खान, राजेंद्र साळुंके, खुशालसिंह राजपूत, पारस घाटे, संजय बोरनारे आदींसह अनेक कार्यकर्त्यांनी सभास्थळी दाखल होत चिकटगावकर यांच्या निर्णयाचे स्वागत करत त्यांचे आभार मानले. यावेळी आमदारांनी भाऊसाहेब चिकटगावकर यांचा सत्कार केला. तसेच आमदार बोरनारे यांचेही स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रशांत शिंदे यांनी केले.

# उपासनेतून चिंतन तर ध्यानाने आरोग्य सुधारते - भंते सचित्त बोधी



तभा वृत्तसेवा,

गंगापूर दि.२७ ऑक्टोबर: वाळूज येथे वर्षावास समारोहाची उत्साहात सांगता वाळूज येथील संघमित्र बुद्ध विहार या ठिकाणी विपश्य साधक सामाजिक कार्यकर्ते अविनाश गायकवाड व सौ ज्योती गायकवाड यांच्या तीन महिन्याच्या वर्षावास उपासनेतून वर्षावास समारोह आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रवचन आयोजित करण्यात आले होते. सर्वप्रथम बुद्ध धम्म संघ वंदना कार्यक्रमाची सुरुवात झाली बुद्धांच्या अष्टांगिक मार्गाचा पण त्यांनी आवर्जून उल्लेख करत मोलाचे मार्गदर्शन केल्याने संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता प्रसंगी एडवोकेट विलास पठारे यांनी श्री अविनाश गायकवाड यांना सर्व समाजाच्या वतीने समाज गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले यावेळी भोजनदान व खेळ दान देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला उपस्थितांचे आभार अविनाश गायकवाड यांनी व्यक्त केले यावेळी पंचक्रोशीतील उपासक उपासिका लोकप्रतिनिधी विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३७५७ किलोमीटर अंतराच्या रेस अक्रॉस इंडिया शर्यतीत पटकावला तिसरा क्रमांक

छत्रपती संभाजीनगर : श्रीनगर ते कन्याकुमारी अशी रेस अक्रॉस इंडिया शर्यतीत छत्रपती संभाजीनगर जिल्हा सायकल संघटनेचे अध्यक्ष सीए निखिल कचेश्वर यांनी तिसरा क्रमांक पटकावला. आगामी काळात आयर्नमॅन किताब पटकावण्याचा मानस असल्याचे निखिल कचेश्वर यांनी सांगितले. श्रीनगरपासून या शर्यतीला सुरुवात झाली आणि कन्याकुमार या ठिकाणी शर्यतीचा समारोप झाला. ३७५७ किलोमीटर अंतराची ही शर्यत अतिशय आव्हानात्मक मानली जाते. निखिल कचेश्वर यांनी ही शर्यत १० दिवस आणि सात तासांमध्ये पूर्ण केली. या शर्यतीत त्यांनी तिसरा क्रमांक मिळवला. पहिले दोन सायकलपटू हे व्यावसायिक सायकलपटू आहेत.

या शर्यतीविषयीचा अनुभव सांगताना सीए निखिल कचेश्वर म्हणाले की, या शर्यतीत मी दुसऱ्यांदा सहभाग घेतला होता. यापूर्वी २०२३ मध्ये रिले शर्यतीत भाग घेतला होता. त्यावेळी शर्यतीचे अंतर ३६५१ किलोमीटर होते. यावेळी शर्यतीचे अंतर ३७५७ किलोमीटर इतके होते. श्रीनगरपासून शर्यतीला सुरुवात झाली.

त्यानंतर हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाड या राज्यातून प्रवास करत कन्याकुमारी गाठले. सलग दुसऱ्या वर्षीही आव्हानात्मक शर्यत यशस्वीपणे पूर्ण केल्याचा मोठा आनंद आहे. या शर्यतीत थंड, कडक ऊन याचा सामना करावा लागला. काही राज्यांत पावसाचा सामना केला. वेगवेगळ्या हवामानात सायकलिंग करावे लागत असल्याने ही शर्यत कमालीची आव्हानात्मक ठरली. निर्धारित वेळेत शर्यत पूर्ण करावयाची असल्याने झोप फारसी घेता येत नव्हती. वेळेची बचत व्हावी म्हणून प्रत्येक ठिकाणी पेट्रोल पंपावरच झोप घेतली. होसूरला प्रचंड पावसामुळे एक रात्र तेथेच थांबावे लागले. अन्यथा एक दिवस अगोदरच शर्यत पूर्ण केली असती असे निखिल कचेश्वर यांनी सांगितले.

या प्रवासात नेहमीचे जेवण असे नव्हतेच. ज्युस, पाणी, प्रोटीन यावर भर दिला होता. या शर्यतीपूर्वी मी पॅरिस, डेक्कन क्लीपहँगर (पुणे ते गोवा) या शर्यतीत सहभाग घेतला होता. त्यानंतर या शर्यतीसाठी खास सराव देखील केला. दररोज फिटनेसवर भर देत होतो. या शर्यतीच्या तयारीसाठी डॉ. मंजिरी कुलकर्णी, जिम ट्रेनर अतुल देशमुख, नितीन घोरपडे, निखिल मिसाळ यांच्यासह सायकल संघटनेचे सचिव चरणजित सिंग संघा, अमोघ जैन, अतुल जोशी, मनीष खंडेलवाल, उन्मेष मारवाडे यांचे सहकार्य लाभले. आगामी काळात आयर्नमॅन हा किताब मिळवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## शस्त्रास्त्रे बाळगणाऱ्या दोघांवर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : गंगापूर तालुक्यातील नबाबपूरवाडी शिवारात तीन तलवारी तर जुने कायगाव शिवारात गावठी कट्टा जप्त करून आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

नवाबपूरवाडी येथील विकास मुरलीधर चव्हाण (वय २४) याच्याकडे तलवार असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यावरून पोलिसांनी छापा टाकला असता आरोपीचे शेत गट क्रमांक ५१ शेतवस्ती समोरील जनावरांसाठी बनवलेल्या मुरघासच्या आडोशाला सुमारे तीन फूट लांबीच्या तीन तलवारी एकूण किंमत ९००० रुपये मॅन सह आढळून आल्या. जिल्हाभरात जमावबंदी व शस्त्रबंदीचे आदेश असतांनाही आरोपी विकास मुरलीधर चव्हाण याने विनापरवाना बेकायदेशिरीत्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने बाळगतांना मिळुन आला. म्हणुन आरोपी विरोधात गुरनं. कलम ४/२५ भारतीय शस्त्र अधिनियम सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसरी घटना छत्रपती संभाजीनगर- पुणे महामार्गावरील जुने कायगाव शिवारात एका हॉटेलवर दारुच्या नशेत असलेल्या आरोपीकडे गावठी कट्टा असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यावरून पोलिसांनी तात्काळ सदर ठिकाण गाठले. या ठिकाणी आरोपी योगेश कल्याण नागे (वय २७ वर्षे राहणार भिवधानोरा, ता. गंगापूर) हा दारुच्या नशेत विनापरवाना अवैधरित्या अग्निशस्त्र (लोखंडी गावठी कट्टा) ताब्यात बाळगतांना मिळून आला. पोलिसांनी सदरील २५००० रुपये किंमतीचा कट्टा व दोन जिवंत काडतूस किंमत २००० रुपये एकूण २७००० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेवून आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला